Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २८३ * * नागपूर * शुक्रवार, दिनांक १० जानेवारी २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## एक देश एक निवडणूक : जेपीसीची पहिली बैठक

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९:
एक देश-एक निवडणुकीसाठी सादर करण्यात आलेल्या 129व्या घटना दुरुस्ती विधेयकावर संयुक्त संसदीय समितीची (जेपीसी) पहिली बैठक बुधवारी संसदेत झाली. कायदा मंत्रालयाने बैठकीत उपस्थित खासदारांना 18 हजार पानांचा अहवाल दिला.

बैठकीत कायदा मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी प्रस्तावित कायद्यातील तरतुदींचे सादरीकरण केले. हे विधेयक राष्ट्रहिताचे असल्याचे सांगत भाजपने या विधेयकाचे समर्थन केले. त्याचवेळी काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी याला संविधानाच्या मूलभूत रचनेच्या विरोधात आणि लोकशाही अधिकारांचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे.

# तिरुपतीमध्ये टोकन घेण्यासाठी प्रचंड गर्दी

# चेंगराचेंगरीत ६ भक्तांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, तिरुपती, दि. ९:
आंध्र प्रदेशातील प्रसिद्ध तिरुपती मंदिरापासून २२ किमीवरील विष्णू निवासम येथे झालेल्या चेंगराचेंगरीत सहा भाविकांचा मृत्यू झाला. तर ४० वर भाविक जखमी झाले. मृतांत ५ महिला आहेत. यातील एका महिलेची ओळख पटली असून ती तामिळनाडूची मल्लिका असल्याचे पुढे आले आहे.

वैकुंठ एकादशी आणि वैकुंठद्वार दर्शनाचे टोकन घेण्यासाठी सुमारे चार हजार भाविक येथे जमले होते. हे टोकन दरवर्षी चालणाऱ्या भगवान तिरुपतीच्या नऊ दिवसांच्या विशेष उत्सवासाठी दिले जातात, जेणेकरून दर्शन व्यवस्थेत अडथळा येऊ नये. हा महोत्सव १० जानेवारीला पहाटे ४.३० वाजता सुरू होणार असून १९ जानेवारीपर्यंत चालणार आहे.

सध्या दर्शनापूर्वीच या दुर्घटनेने तिरुमला तिरुपती देवस्थानम बोर्डाच्या (टीटीडी) व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी जखमींना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे. या दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती





टीटीडीचे प्रमुख बी.आर. नायडू यांनी दिली.

रांग लावण्यासाठी धावले, एकमेकांना चिरडत गेले

टीटीडी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, टोकनसाठी वैकुंठ गेटवर गर्दी जमलेली होती. दरम्यान, पोलिसांनी भाविकांना बैरागी पट्टिडा पार्कवर रांगा लावण्यास सांगितले. वैकुंठ गेटबाहेरून जमाव उद्यानाकडे धावला. त्यामुळे एकच धावपळ सुरू झाली.

लोक एकमेकांवर पडले. यामुळे अनेकांचा श्वास गुदमरला. मल्लिका नावाच्या महिलेचा जागीच मृत्यू झाला. काही जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दर्शनापूर्वीच या दुर्घटनेने तिरुमला तिरुपती देवस्थानम बोर्डाच्या (टीटीडी) व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी जखमींना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे. या दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती टीटीडीचे प्रमुख बी.आर. नायडू यांनी दिली.

टीटीडीचे कार्यकारी अधिकारी जे. श्यामला राव यांनी वैकुंठ उत्सवाच्या तयारीसंदर्भात बैठक घेतली होती. वैकुंठद्वार येथे प्रत्येक व्यक्तीला सहज दर्शन होईल, असा दावा त्यांनी केला होता. पण, दुसऱ्याच दिवशी त्याच गेटवर चेंगराचेंगरी झाली. दर्शन टोकनसाठी अपेक्षेपेक्षा जास्त लोक पोहोचल्याने ही दुर्घटना घडल्याचे श्यामला राव म्हणाले.

## अग्राग्रलेख खरीखरी...

# स्फोटावर स्फोट

बीड मधील सरपंच देशमुख यांच्या हत्येचे पडसाद सध्या सर्वत्र उमटत आहेत. धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांची सलगी आमदार सुरेश धस धनंजय मुंडे यांचे नाव न घेता इतर सर्व सहभागी नावानिशी जाहीरही करीत आहेत. आजही वाल्मीक कराड याची बेनामी मालमत्ता ज्या निकटवर्तीयांनी धारण केलेली आहे. त्यांच्या नावानिशी त्या मालमत्तेची किंमत आणि मालमत्तेची ठिकाणे जाहीर केलेली आहेत. आजच्या आमदार धस यांनी आरोपांमध्ये जे मुद्दे मांडले. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या लोकांच्या नावावरच्या मालमत्ता आहेत. जी नावे आहेत, ती जगजाहीर केली. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडालेली आहे. आमदार धस यांनी आरोपांमध्ये ज्या गोष्टींचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये सुशील पाटील या बिल्डर्सच्या पूर्ण होत असलेल्या प्रकल्पात पुण्यातील एफसी रोडवर वैशाली हॉटेलच्या बाजूला सात व्यावसायिक गाळे म्हणजेच सात दुकाने (शॉप) छोटा आका काढत आहे. म्हणजेच वाल्मीक कराड यांच्या नावावर ही मालमत्ता आहे. त्याची किंमत प्रत्येकी पाच कोटी आहे. ही प्रॉपर्टी सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी विष्णू चाटेची बहिण आणि वाल्मीक कराड यांची दुसरी पत्नी ज्योती जाधव यांच्या नावावर या एकाच ठिकाणी चाळीस कोटींची मालमत्ता आहे. विशेष म्हणजे धस यांनी त्या बिल्डरची भेट घेऊन आलो असेही सांगितले. त्या बिल्डरकडे या छोट्या आकाने म्हणजेच वाल्मीक कराड याने 35 कोटींचे टेरेस मागितले होते. त्या ठिकाणी एका फ्लॅटची किंमत 15 कोटी आहे आणि या ठिकाणचा एक संपूर्ण मजला वाल्मीक कराडच्या ड्रायव्हरच्या नावावर आहे. त्याची किंमत 75 कोटी आहे. याच ड्रायव्हरच्या नावावर त्याच ठिकाणची जवळपास पंधरा ते वीस एकर शेती आहे. त्या ठिकाणी कधीही राहण्यासाठी वाल्मीक कराड याने विशेष करारनामा त्या ड्रायव्हरकडून करून घेतलेला आहे, असाही खळबळजनक आरोप आहे. आज जवळपास 115 ते 120 कोटीच्या मालमत्तेच्या कागदोपत्री मालक असलेल्या व्यक्तींची नावे सुरेश धस यांनी जाहीरपणे तेथील बाजार मूल्याच्या किमती आणि पुराव्यासह दिलेली आहेत. अर्थात हे सुरेश धस यांचे म्हणणे आहे. त्यासोबतच वाल्मीक कराड यांना 2022 मध्ये ईडीची नोटीस आली होती. हेही त्यावेळी त्यांनी सांगितले. सुरेश धस म्हणतात त्याप्रमाणे मोठे आका आणि त्यांचा छोटा आका म्हणजे वाल्मिक कराड यांचे दोघांचेही वेगवेगळे उद्योग आहेत. परळी शहरात या दोन्ही आकांच्या सांगण्यावरून हवी तशी खंडणी जमा करण्याचे काम केले जाते. या ठिकाणी इराणी टोळ्या या दोन आकांच्या जीवावर अवैध धंदे करतात. पिस्तुलाचे परवाने घेतात आणि मोठमोठ्या उद्योगांच्या कार्यालयात जाऊन हप्ते मागतात. यांच्या हप्त्याला कंटाळून एका सिमेंट कंपनीने परळी मधून गाशा गुंडाळलेला आहे. ती कंपनी का सोडून गेली, याचे उत्तर बाहेर असणाऱ्या आकाने द्यावे, असे आव्हान सुरेश धस करायला विसरले नाहीत?. त्याचबरोबर प्रतिमोर्चे काढणाऱ्यांना सरपंच संतोष देशमुख यांच्या मुली आणि त्यांच्या डोळ्यातील पाणी दिसत नाही का? असाही त्यांनी प्रतिप्रश्न केला. आता एवढे गंभीर आरोप असलेल्या या कराड नामक महनीय व्यक्तीचे काय करावे, हा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. या प्रश्नाला घेऊन सरकारमध्येही तणावाचे वातावरण निर्माण झालेले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या घटनेची अत्यंत गंभीरपणे दखल घेतलेली आहे. सरपंच संघटनेपासून अनेक संघटनांनी केवळ कराड यांच्यावरच आरोप केले नाहीत. तर धनंजय मुंडे यांच्या राजीनामाची मागणीही केलेली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अजून तरी धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितलेला नाही. काल अजित पवार आणि अमित शहा यांची भेट कशाकरता होती. हे अद्याप तरी गुलदस्त्यातच आहे. संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणा ?या सरपंच देशमुख यांची हत्या केवळ बीड जिल्हा, केवळ मराठवाडा केवळ, महाराष्ट्र किंवा केवळ राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यापुरता मर्यादित विषय आता राहिलेला नाही. दररोज नवे नवे स्फोटावर स्फोट होत आहेत. जाहीरपणे आरोपांच्या फैरी झडत आहेत. त्याचप्रमाणे आरोप करणारे जाहीरपणे पुरावे दाखवीत आहेत. पण अजूनही अटक होण्याच्या पलीकडे कराडच्या केसालाही धक्का लागलेला नाही. त्यासोबतच धनंजय मुंडे यांनाही जाब विचारलेला नाही, अशी तक्रार सर्वसामान्यांची आहे. आपल्या महाराष्ट्राचे राजकारण कोणत्या थराला गेलेले आहे. याचा हा मोठाच पुरावा आहे. महाराष्ट्र अत्यंत सभ्य राजकारणी पुढाऱ्यांचा, नेतृत्व करणाऱ्यांचा प्रदेश आहे. असा जो काही आपला लौकिक होता. हा लौकिक आजही कायम ठेवणे खूप गरजेचे आहे. त्यासाठी आता या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय खून झालेल्या सरपंचाच्या आत्म्याला शांती कशी मिळेल. राजकारणाच्या वाटेवर अशी अपघाती वळणे आली. तर सभ्य लोक राजकारणात कसे येतील. आजही अनेक जिल्ह्यात अत्यंत सुसंस्कृत राजकारण करणारे अनेक नामवंत पुढारी आहेत. राजकारणातील मतभेद अशा घातक स्तरावर जाऊ नयेत, असे महाराष्ट्रातील जनतेला नेहमीच वाटते. क्षुद्र राजकीय लाभासाठी आपण आपली पातळी किती खाली घेऊन जावी. याचाही विचार करणे अतिशय गरजेचे आहे. एकूणच हे प्रकरण कोणत्या थराला जाईल, त्याचा सामाजिक काय परिणाम होईल. पुढे जाऊन सरकारला काय उत्तरे द्यावे लागतील. ते कुणालाच सांगता यायचे नाही. आपण केवळ जे जे होत आहे. ते ते बघावे आणि तोंडावर चिकटपट्टी लावून गप्प बसावे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## कोणत्याही जिल्ह्यातून दस्तनोंदणीची सुविधा


### फडणवीस सरकारचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९:
राज्यातील कोणत्याही भागातील नागरिकास इतर जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करण्याची सुविधा महाराष्ट्रात उपलब्ध होणार आहे. यासाठी वन स्टेट वन रजिस्ट्रेशन संकल्पना राबविण्यात येणार आहे.

तसेच घरबसल्याही दस्त नोंदणी करण्यासाठी महसूलविषयक काही दस्त नोंदणीसाठी फेसलेस प्रणाली राबविण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

विविध विभागांच्या 100 दिवसांच्या आराखड्याच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत मुख्यमंत्र्यांसमोर महसूल आणि मुद्रांक शुल्क, वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्यासह विविध विभागातील नियोजन आराखड्याचे सादरीकरणही झाले. या ऑनलाईन सेवांमध्ये वाढ करण्याचे निर्देश फडणवीस यांनी राज्य सेवा हक्क आयोगाच्या आढावा बैठकीत दिले.

## ज्येष्ठ पत्रकार, माजी खासदार प्रितीश नंदी यांचे निधन



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९:
ज्येष्ठ पत्रकार, चित्रपट निर्माते, कवी, माजी राज्यसभा सदस्य प्रितीश नंदी यांचे बुधवारी मुंबईत निधन झाले. ते 73 वर्षांचे होते. दक्षिण मुंबईतील निवासस्थानी त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांच्यावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

प्रतिष्ठित इलेस्ट्रेटेट विकलीच्या व्यवस्थापकीय संपादकपदाची त्यांची कारकिर्द प्रभावी ठरली होती. सन 1998 मध्ये ते शिवसेनेच्या तिकिटावर राज्यसभा सदस्य म्हणून निवडून आले होते. प्रितीश नंदी कम्युनिकेशन्सच्या बॅनरखाली त्यांनी कुछ खट्टी, कुछ मिठी, चमेली, कांटे, शादी के साइड इफेक्ट्स सारख्या चित्रपटांनी निर्मितीही केली होती.

## 'मस्साजोग' आरोपींवर पक्ष न पाहता कारवाई

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ९:
उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे येथे अधिकाऱ्यांची बैठक घेत पुण्यातील विकासकामांचा आढावा घेतला आहे. या बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पुण्यातील मुद्यांवर भाष्य केले आहे. याचसोबत त्यांना मंत्री धनंजय मुंडे यांच्याविषयी देखील काही प्रश्न विचारण्यात आले. यावर देखील त्यांनी उत्तर दिले आहेत.

अजित पवार म्हणाले, आज एसआयटीची चौकशी सुरू आहे, सीआयडीची चौकशी सुरू आहे, या सर्व चौकशी सुरू असताना त्यात मुख्यमंत्र्यांनी सुद्धा सांगितले आहे की या सगळ्यात जो कोणी दोषी आढळून येईल त्यावर कठोर कारवाई केली जाईल.

यात मी देखील मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटलो, तेव्हा त्यांना सांगितले की कोणीही कोणत्याही पक्षाचा असला आणि जर तो दोषी आढळला तर कारवाई करा, यावर त्यांनी मी देखील याच मताचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

या सगळ्यात कोणावर देखील अन्याय होणार नाही याची देखील आम्हाला खबरदारी घ्यावी लागते. तसेच जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही.

### दादांची ग्वाही



अजित पवार म्हणाले, विरोधकांना उद्देशून बोलताना अजित पवार म्हणाले, नुसते आरोप करण्यापेक्षा तुम्ही पुरावे द्या, पोलिसांना द्या, एसआयटीला द्या, सीआयडीला द्या, यातून चौकशीसाठी मदत होईल. पुराव्याशिवाय आरोप करणे चुकीचे आहे.

आरोप करण्यापेक्षा तपास यंत्रणेला पुरावे द्या. यात आम्ही कुठलेही राजकारण आणणार नाही. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होणार, असे त्यांनी स्पष्ट केले.

## इंडिया आघाडी संपवा : ओमर अब्दुल्ला



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ९:
जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी गुरुवारी इंडिया आघाडी संपवण्याची चर्चा केली. लोकसभा निवडणुकीनंतर याबाबत कोणतीही बैठक झाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

ही युती लोकसभा निवडणुकीपर्यंतच असेल तर ती संपुष्टात यायला हवी. त्याचा ना कुठला अजेंडा आहे, ना कुठले नेतृत्व, असेही ते म्हणाले.

दिल्लीत काय चालले आहे, याबाबत मी बोलू शकत नाही, दिल्ली निवडणुकीशी काहीही संबंध नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## मनपा निवडणुका स्वबळावर



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९:
भाजप खासदार नारायण राणे यांनी आम्ही भविष्यात स्वबळावर लढू, पण कोणती हे सांगू शकत नाही, असे विधान केले आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक महापालिकांच्या निवडणुका कधी होणार अशी चर्चा सुरू आहे.

मुंबई महापालिकेची निवडणूक भाजप स्वबळावर लढणार असल्याचे सांगत राणे म्हणाले, आम्ही भविष्यात निवडणुका स्वबळावर लढू. मुंबईत भाजपाची प्रचंड ताकद असून, आम्हाला अन्य पक्षाची गरज नसल्याचे ते म्हणाले.

## मुख्य माहिती आयुक्त नियुक्तीसाठी समिती

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९:
गेल्या 20 महिन्यांपासून मुख्य माहिती आयुक्त आणि अन्य माहिती आयुक्तांची पदे रिक्त आहेत. या मुद्यावरून चौफेर टीका होऊ लागताच राज्य सरकारने मुख्य माहिती आयुक्तपदावर सुयोग्य उमेदवाराचा शोध घेण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली आहे.

मुख्य माहिती आयुक्तांसह विभागीय माहिती आयुक्तांची रिक्त पदे, अधिकारी, कर्मचाऱ्यांची वानवा आहे. यामुळे राज्यात एक लाखाहून अधिक लोकांचे माहिती अर्ज रखडले आहेत.




## आदित्य ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९:
शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. त्यांच्या सोबत दोन प्रतिनिधी मंडळे होती. या भेटीत त्यांनी गृहनिर्माण धोरण, निवृत्त पोलीस आणि सामान्य नागरिकांच्या समस्यांवर चर्चा करत काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या.



आदित्य ठाकरे यांनी निवृत्त पोलीस कुटुंबीयांना मुंबईत घरे उपलब्ध करून द्यावी,. गृहनिर्माण किंवा झोपडपट्टी न पाहता पाणीपुरवठा करावा, मुंबईतील पोलिसांच्या जुन्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी तत्काळ पावले उचलावी, मिल कामगारांच्या समस्यांवर तोडगा काढावा, अशा अनेक मागण्या आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केल्या.

# पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड महामार्गाच्या भूमिपूजनाला लवकरच मुहूर्त

## आज मुख्यमंत्र्यांच्या आढावा बैठकीत निर्णयाची शक्यता

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) महत्त्वाकांक्षी अशा पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड द्रुतगती महामार्ग प्रकल्पाच्या भूमिपुजनाची तारीख निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे एमएसआरडीसीच्या प्रकल्पांचा आढावा घेणार आहेत. या आढावा बैठकीत या दोन्ही प्रकल्पाच्या भूमिपुजनाची तारीख मुख्यमंत्र्यांकडून निश्चित केली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.




पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी एमएसआरडीसीने १६८ किमीचा पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेतला आहे. तर दुसरीकडे समृद्धी महामार्गाचा विस्तार नांदेडपर्यंत करण्याकरीता जालना-नांदेड असा १८० किमीचा द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही प्रकल्पाच्या बांधकामासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कंत्राटदारांना कार्यादेशही देण्यात आले आहेत. कार्योदेश देऊन बरेच दिवस झाल्याने या प्रकल्पांचे भूमिपूजन केव्हा होणार आणि कामास सुरुवात केव्हा होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. असे असताना आता लवकरच भूमिपूजनाची प्रतीक्षा संपण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एमएसआरडीसीची एक आढावा बैठक गुरुवारी घेणार आहेत. या आढावा बैठकीत पुणे वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड या दोन प्रकल्पाच्या भुमिपूजनाचा निर्णय होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही यासंबंधीचे संकेत दिले आहेत.

वर्तुळाकार रस्ता आणि जालना-नांदेड महामार्गाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी काही प्रमाणात भूसंपादन शिल्लक होते. ९० टक्के भूसंपादनाची प्रतीक्षा होती. त्यामुळे ९० टक्के भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून नव्या वर्षात या दोन्ही प्रकल्पाचे भूमिपूजन केले जाईल, अशी माहिती काही दिवसांपूर्वी एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली होती. आता या भूमिपूजनाची तारीख उद्याच्या बैठकीत निश्चित होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पुणे वर्तुळाकार रस्त्यासाठी पश्चिमेकडील बाजूचे ९६ टक्के भूसंपादन झाल्याने भूमिपूजनाचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रकल्पाचे भूमिपूजन करत पश्चिमेकडील बाजूच्या कामाला सुरुवात केली जाण्याची शक्यता आहे. पूर्वेकडील बाजूचे ८२ टक्के भूसंपादन झाले आहे. हे भूसंपादनही लवकरच पूर्ण केले जाण्याची शक्यता आहे. जालना-नांदेडचेही भूसंपादन झाले आहे. तेव्हा या द्रुतगती महामार्गाच्या भूमिपुजनाचीही तारीख यावेळी निश्चित केली जाण्याची शक्यता आहे. याविषयी गायकवाड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

# कल्याणमध्ये बैलबाजारात प्रतिबंधित औषधांसह दोन जण अटकेत

**कल्याण, दि. ९ : प्रतिनिधी**

मानवी शरीरावर अपाय करणाऱ्या, सरकारने प्रतिबंधित केलेल्या औषधाच्या साठ्यासह दोन जणांना पोलीस उपायुक्तांच्या अवैध धंद्यावर कारवाई पथकाने अटक केली आहे. हे दोघेही कल्याणमधील भोईवाडा, कोनगाव मधील रहिवासी आहेत. या दोघांनी ही प्रतिबंधित औषधे आणली कोठून, ते ही औषधे कोणाला विकणार होते, या दिशेने बाजारपेठ पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या अवैध धंद्यांवर कारवाई पथकाचे हवालदार राजेंद्र सोनवणे यांच्या तक्रारीवरून बाजारपेठ पोलीस ठाण्यात या दोन इसमांविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने, घातक प्रतिबंधित औषधांची विक्री कायद्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी विविध प्रकारची पथके स्थापन केली आहेत. अवैध धंद्यांवर कारवाई पथक एक स्थापन करण्यात आले आहे. चार दिवसापूर्वी अवैध धंद्यांवर कारवाई पथक कल्याण शहरात रात्रीच्या वेळेत गस्त घालत होते. त्यावेळी त्यांना कल्याण पश्चिमेतील बैलबाजारातील कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती भागातील फोर्टिस रुग्णालय रस्त्यावर एके ठिकाणी दोन इसम संशयास्पद हालचाली करत असल्याचे पोलीस पथकाला दिसले. पथकाने आपला मोर्चा त्यांच्या दिशेने वळविला. तेवढ्यात ते दोघे पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. पथकाने दोघांना जेरबंद केले. त्यांच्या जवळच्या सामानाची पोलिसांनी झडती घेतली. त्यामध्ये त्यांना ४० कोडीनयुक्त औषधांच्या बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी या औषधांची माहिती घेतली. त्यांना ही औषधे सरकारने प्रतिबंधित केलेली आणि मानवी शरीरास अपाय करणारी असल्याचे समजले. या औषधांचे उत्पादन हिमाचल प्रदेशात करण्यात आले आहे. या औषधांच्या मुदती डिसेंबर २०२४, नोव्हेंबर २०२६ मध्ये संपणार होत्या. पोलिसांनी या दोघांना बाजारपेठ पोलीस ठाण्यात आणले. त्यांच्यावर हवालदार राजेंद्र सोनवणे यांनी सरकारने प्रतिबंधित केलेल्या आणि मानवी शरीरास अपाय ठरणाऱ्या औषधांचा साठा जवळ बाळगला, विक्रीसाठी त्याचा वापर केला म्हणून बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल एक ३३ वर्षाची व्यक्ति नोकरदार आहे. ते कल्याण पश्चिमेतील भोईवाडा भागात सखाराम सोडेवाली चाळ भागात राहतात. एक इसम रिक्षा चालक आहे. ते दुर्गाडी पुलाजवळील कोनगावात राहतात. साहाय्यक पोलीस निरीक्षक तुळशीराम राठोड यांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

# भाजपचे सुरेश धस, चित्रा वाघ यांचा बोलविता धनी कोण ?

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेणारे भाजपचे आमदार सुरेश धस आणि चित्रा वाघ यांचे बोलविते धनी कोण, असा प्रश्न विचारला जात आहे. विशेषत: अजित पवार यांच्या गटात भाजपच्या या भूमिकेविषयी संभ्रम निर्माण झाला आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून भाजपचे आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांना लक्ष्य केले आहे. गेले काही दिवस आमदार धस हे दररोज मुंडे यांच्यावर गंभीर आरोप करीत आहेत. देशमुख यांच्या हत्येचा कट मुंडे यांच्या बंगल्यावर शिजल्याचा आरोपही त्यांनी केला होता. मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी त्यांनी लावून धरली आहे. आमदार धस यांच्या विरोधात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. दुसरीकडे, बीडमध्ये जाऊन मुंडे यांना लक्ष्य करणाऱ्या अंजली दमानिया यांच्या पाठीशी भाजपची मंडळी उभी असल्याचे चित्र निर्माण झाले. अंजली दमानिया यांना धमक्या देणाऱ्या समाजकंटकांच्या विरोधात कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी भाजपच्या महिला विभागाच्या अध्यक्षा व आमदार चित्रा वाघ यांनी पोलिसांना पत्र दिले. धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर स्वरुपाचे आरोप करणाऱ्या अंजली दमानिया यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिल्याने राष्ट्रवादीच्या गोटात त्याचा वेगळा अर्थ काढला जात आहे. धनंजय मुंडे यांच्यावरील आरोपांवरून भाजप आणि राष्ट्रवादीत सध्या जुंपली आहे. आमदार सुरेश धस हे मुंडे यांच्या विरोधात दररोज आरोप करीत असताना भाजपकडून त्यांना रोखले का जात नाही, असा सवाल केला जात आहे. 'मी धस यांच्याशी बोललो, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सांगतात तरीही धस गप्प का बसत नाहीत, असा राष्ट्रवादीच्या नेत्यांचा सवाल आहे. धस यांच्या आरोपांवरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाराजी व्यक्त केल्याचे समजते. महायुतील घटक पक्षाच्या मंत्र्याला लक्ष्य करणाऱ्या अंजली दमानिया यांच्या मदतीला भाजपच्या आमदार चित्रा वाघ धावून गेल्या. याबद्दलही राष्ट्रवादीत अस्वस्थता आहे.

# शिवसेना नगरसेवकांच्या प्रवेशामुळे भाजपमध्ये नाराजी

**पुणे, दि. ९ : प्रतिनिधी**

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या पाच माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. माजी नगरसेवकांच्या या प्रवेशामुळे शहर भाजपमधील स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये मोठी नाराजी पसरली आहे. पक्षवाढीसाठी वर्षानुवर्षे काम करायचे आणि निवडणूक आल्यानंतर बाहेरून पक्षात आलेल्यांना तिकीट द्यायचे हे बरोबर नाही, असे म्हणत काही पदाधिकाऱ्यांनी यावर नाराजी व्यक्त केली. यामुळे येणाऱ्या काळात भाजपमध्ये देखील निष्ठावंत विरुद्ध बाहेरचा असा संघर्ष होण्याची शक्यता आहे.

शिवसेना (ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक विशाल धनवडे, पल्लवी जावळे, बाळा ओसवाल, प्राची अल्हाट, संगीता ठोसर यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपची वाट धरली आहे. मुंबई येथे भाजपच्या पक्ष कार्यालयात प्रभारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, हवाई राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार सुनील कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या पाच नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपमध्ये प्रवेश केलेल्या या माजी नगरसेवकांना आगामी महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी देण्याचा शब्द देण्यात आल्याची चर्चा आहे. यामुळे भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे. या नाराजीमुळे गेल्या आठवड्यात होणारे हे पक्षप्रवेश देखील काही काळ लांबले होते.



या पाच माजी नगरसेवकांनी पक्षाची साथ सोडल्याने पुण्यात शिवसेना (ठाकरे) पक्षाला धक्का मानला जात आहे. शिवसेना (ठाकरे) पक्षांमध्ये वरिष्ठांकडून होत असलेली घुसमट, वरिष्ठांकडून पुण्याकडे होणारे दुर्लक्ष यामुळे शिवसेना (ठाकरे) पक्षाला सोडचिठ्ठी देत आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात आणि केंद्रात सत्ताधारी असलेल्या भाजपमध्ये या नगरसेवकांनी प्रवेश केला आहे.

पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून महापालिकेत बाहेरून आलेल्यांना संधी देऊ नका, अशी भूमिका भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची असून ही नाराजी वरिष्ठांपर्यंत पोहचली आहे. त्यामुळे भाजपमध्ये प्रवेश केलेल्या प्रत्येकालाच महापालिकेची उमेदवारी मिळेलच, असे नाही असे भाजपच्या शहरातील पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# दिवा रेल्वे पादचारी पुलावरील गर्दीचा ताण कमी होणार!

## मध्य रेल्वेकडून पुलाच्या रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात

**ठाणे, दि. ९ : प्रतिनिधी**

दिवा रेल्वे स्थानकातील प्रवाशांसाठी अत्यंत महत्वाचा असलेला मुंबईच्या दिशेकडील पादचारी पुलाच्या रुंदीकरणाचे काम सुरु झाले आहे. या पादचारी पुलाच्या रुंदीकरणासाठी लागणाऱ्या खांब उभारण्याचे काम मध्य रेल्वे प्रशासनाकडून सद्यस्थितीत सुरु आहे. या रुंदीकरणाच्या कामाच्या पुर्णत्वानंतर दिवा स्थानकात सकाळी आणि सायंकाळी पुलावर होणाऱ्या मोठ्या गर्दीतून प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. यासाठी रेल्वे प्रवासी संघटनांकडून सातत्याने मागणी केली जात होती.

ठाणे पल्याड रेल्वे स्थानकातील सर्वात महत्वाचे आणि कायम गर्दीने गजबजलेले रेल्वे स्थानक म्हणून दिवा रेल्वे स्थानक ओळखले जाते. येथून दररोज हजारो प्रवासी उपनगरीय लोकल गाड्यांनी ठाणे, मुंबई तसेच कल्याण, डोंबिवलीच्या दिशेने आपल्या नियमित कामासाठी प्रवास करतात. दिवा रेल्वे स्थानकातून कोकणात जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांची संख्या देखील लक्षणीय आहे. यामुळे दिवा स्थानक कायम गर्दीने गजबजलेले असते. मागील काही वर्षांपूर्वी दिवा रेल्वे स्थानकाचा कायापालट प्रकल्प राबविण्यात आला होता. होम प्लॅटफॉर्म उभारणे, फलाटांचे रुंदीकरण आणि लांबी वाढविणे यांसारखी कामे करण्यात आली होती. स्थानकातील रेल्वे फाटकातुन रूळ ओलांडल्याने अनेक अपघात व्हायचे. याचे प्रमाण रोखण्यासाठी स्थानकात जाण्यासाठी आणि बाहेर पाडण्यासाठी सरकते जिने बसविण्यात आले आहे. यामुळे येथील अपघात ही थांबले आहेत. मात्र रेल्वे स्थानकात मुंबईच्या दिशेने असणारा आणि शहराच्या पूर्व भागाला जोडणारा पादचारी पूल अरुंद असल्याने प्रवाशांना कायमच गर्दीचा सामना करावा लागतो. तर दिवा शहरातील बहुतांश लोकवस्ती शहराच्या पूर्व भागात आहे. तसेच मुख्य बाजारपेठही शहराच्या पूर्व भागातच आहे. यामुळे स्थानकात सकाळी आणि सायंकाळी बाजारपेठेत जाणाऱ्या नागरिकांची आणि प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळते.

अनेकदा चेंगराचेंगरी सदृश्य परिस्थिती ही होते. याच पार्श्वभूमीवर येथील प्रवासी संघटनांकडून पुलाच्या रुंदीकरणाचे काम करण्याची मध्य रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने मागणी करण्यात येत होती. यासाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन या पुलाच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला होता. दरम्यानचा काळात विधानसभा निवडणुका लागल्याने कामाला संथगती प्राप्त झाली होती. मात्र आता मध्य रेल्वे प्रशासनाकडून पुलाच्या रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे.

# पत्रकार उत्कर्ष समिती कडून पत्रकारांचा बाळशास्त्री जांभेकर पुरस्काराने सन्मान

**पनवेल, दि. ९ : प्रतिनिधी**

स्वर्गीय बाळशास्त्री जांभेकर यांनी 6 जानेवारी 1832 रोजी दर्पण हे वृत्तपत्र काढले होते. तो दिवस पत्रकार दिन साजरा करण्यात येतो. त्या दिनाचे औचित्य पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र यांच्या वतीने सोमवार दिनांक 6 जानेवारी रोजी नवीन पनवेल येथील नील हॉस्पिटल मध्ये पनवेल, उरण आणि पेण तालुक्यातील पत्रकारांना सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमास डॉ शुभदा नील, कांदळवन अधिकारी साईश्वरी पडवळ, प्रा.डॉ भाग्यश्री भोईर, भागवत कथाकार ज्ञानेश्वर बर्वे महाराज, भक्ती बर्वे ताई, राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित शिक्षिका मंगला गडमुळे आदी मान्यवर उपस्थित होते. दिप प्रज्वलन आणि बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार



उत्कर्ष समिती चे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ अशोक म्हात्रे यांनी केले. पत्रकारांनी सकारात्मक पत्रकारिता करा असा सल्ला देऊन ज्ञानेश्वर महाराज म्हणाले की या जगातील पहिले पत्रकार नारद मुनी होते.त्यांनी योग्य ,सकारात्मक उपदेश केल्याने वाल्याचा वाल्मिकी झाला.डॉ शुभदा नील यांनी आरोग्य विषयक सल्ला दिला.योगा, मेडीटेशन करा, सॅलड खा.साखर, मैदा यापासून दूर रहा असे सांगून सर्व पत्रकारांना या परमात्म्याच्या ठिकाणी आणण्याचे काम मिलिंद खारपाटील आणि डॉ अशोक म्हात्रे यांनी केले.आणि ते पत्रकार तर आहेत मात्र ते देवदूत आहेत अशा शब्दात त्यांनी गौरव केला. यावेळी डॉ वैभव पाटील यांच्या आवाज कोकण चा या साप्ताहिकाच्या चतुर्थ वर्धापन दिना निमित्त अंकाचे प्रकाशन करण्यात आले. सदर कार्यक्रमात अनिल कुरघोडे, संजय कदम, दीपक घोसाळकर, निलेश म्हात्रे, मयूर तांबडे, सुधीर पाटील, सुनील कटेकर, आरती पाटील, भरत कुमार कांबळे,धनाजी घरत, जगदीश भोईर, रणीता ठाकूर, सुजाता होळकर या पत्रकारांना बाळशास्त्री जांभेकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# ठाणे पालिका मुख्यालयात मनसे पदाधिकारी खेळले फुटबॉल

## बोरिवडे मैदान अतिक्रमण मुक्त करण्यासाठी मनसेचे अनोखे आंदोलन

**ठाणे, दि. ९ : प्रतिनिधी**

घोडबंदर परिसरात बोरिवडे मैदानात ठेकेदाराकडून करण्यात आलेल्या अतिक्रमणाविरोधात सातत्याने पत्रव्यवहार करूनही कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे मनसेचे बुधवारी अनोखे आंदोलन केले. पालिका मुख्यालय इमारतीमधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाबाहेर मनसे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी फुटबॉल खेळून आंदोलन केले. तसेच फुटबॉल वर निषेधाचे तसेच अतिक्रमणाचे छायाचित्र लावून हा फुटबॉल अधिकाऱ्यांना भेट देण्यात आला.

ठाणे महापालिकेच्या विकास आराखड्यात विविध जागांच्या आरक्षणाचा उल्लेख असून, काही ठिकाणी विकासकांकडून टीडीआरमार्फत विकास कामे केली जातात. घोडबंदर क्षेत्र हे जलद गतीने विकसित होत असून, येथे मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती वाढल्याने ठाणे महापालिकेने बोरिवडे येथे एक खेळाचे मैदान आरक्षित ठेवले आहे. पण, या परिसरात झालेल्या अतिक्रमणामुळे स्थानिक मुलांना खेळण्यासाठी हक्काचे मैदान उपलब्ध नाही. ठेकेदाराने मैदानाच्या बहुतेक जागांवर कब्जा केले असून, तिथे आर एम सी प्लांट तसेच शेड उभारली आहे आणि जलवाहिन्यांची साठवणूक केली आहे. या अतिक्रमणाचा त्रास स्थानिक नागरिकांना नाहक सहन करावा लागत आहे.

ठाणे शहरातील घोडबंदर परिसरात बोरिवडे मैदान ठेकेदाराने गिळंकृत केल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि मनसेच्या वतीने करण्यात आला होता. ठाणे महापालिकेच्या विकास आराखड्यानुसार या भूखंडाला मैदानाचे आरक्षण असून मैदान डंपिंग ग्राउंड बनले आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असंतोषाची लाट पसरली आहे. दरम्यान पालिकेने हे अतिक्रमण त्वरीत हटवावे यासाठी मनसेच्या वतीने गेल्या महिन्याभरापासून प्रशासनाला पत्रव्यवहार करून आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. क्रीडा विभागाने यासंबंधी सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र पाठवून मैदान अतिक्रमणमुक्त करण्याचे आदेश दिले होते. परंतु त्याचे पालन महापालिकेचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होत नसल्यामुळे मनसे जनहित व विधी विभागाचे ठाणे शहराध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर आणि कार्यकर्त्यांनी गुरुवारी महापालिकेतील नगर अभियंतांच्या दालना बाहेर फुटबॉल खेळून निषेध नोंदविला. तसेच हा फुटबॉलवर निषेधाचे तसेच अतिक्रमणाचे छायाचित्र लावून सदर फुटबॉल अधिकाऱ्यांना भेट देण्यात आला.

# पालघर जिल्ह्यात जादूटोणा, करणी निर्मूलन चित्रकला प्रदर्शनाला वाढता प्रतिसाद

## कलेच्या माध्यमातून अंधश्रद्धा दूर करण्याचा स्तुत्य उपक्रम

**सफाळे, दि. ९ : प्रतिनिधी**

एक चित्र हे हजार शब्दांचे काम करते. चित्रकलेच्या माध्यमातून अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न अंधश्रद्धा निर्मूलन समिती सांगली शाखेतर्फे संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यातील पालघर बोईसर सफाळे डहाणू या ठिकाणी शाळा व महाविद्यालयांमध्ये राज्यभरातील सर्वोत्कृष्ट 100 चित्रकारांची जादूटोणा व करणी या विषयावर आधारित प्रदर्शन मांडण्यात आले आहे. भुताटकी, भानामती, चेटूक अशा भ्रामक व अंधश्रद्धा निर्माण करणाऱ्या समजुतीतून पशुबळी, नरबळी, आत्महत्या या विध्वंसक प्रवृत्तींना समाजातील विविध घटकांना बळी पडावे लागते. आजही खेडोपाड्यामध्ये अज्ञान व अडाणीपणामुळे



अंधश्रद्धांना मोठ्या प्रमाणावर पेव फुटलेले दिसतात. चित्रकलेच्या प्रदर्शनाच्या माध्यमातून शाळा महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी, जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी, ग्रामपंचायतीतील नागरिकांना हे प्रदर्शन पाहण्याची संधी मिळाली. पालघर जिल्ह्यातील अनेक खेडूपाड्यांमध्ये या प्रदर्शनाला मोठ्या प्रमाणावर मागणी येत आहे. जिल्ह्यातील कलाध्यापक संघटनेच्या पुढाकाराने लिलाधर रायसिंग(राजगुरू ह. म. पंडित विद्यालय, सफाळे), रुपेश वझे (ज. म. ठाकूर विद्यालय वाणगाव), सिताराम प्रभू (स्वातंत्र्य सैनिक न.ल. पाटील विद्यालय दहिसर), प्रगती भोणे (स.का. पाटील माकुणसार), रूपेश राऊत (दातिवरे इंग्लिश हायस्कूल), जैतकर सर (रा. हि.सावे विद्यामंदिर तारापूर), राजेश कुमावत (गाडगे महाराज आश्रमशाळा दाभोण) या शाळांमध्ये प्रदर्शन ठेवण्यासाठी प्रयत्न केले. जिल्ह्यात हे प्रदर्शन जास्तीत जास्त शाळांमध्ये आयोजित करण्याकरिता जिल्हाध्यक्ष ॲड. दीपक भाते, राज्य कार्यकारी सदस्य अण्णा कडलासकर, कार्याध्यक्ष संदेश घोलप, प्रधान सचिव जतिन कदम, वार्तापत्र विभाग प्रमुख जगदीश राऊत यांनी विशेष प्रयत्न केले.

हे प्रदर्शन विद्यार्थी, शिक्षक, पालक व नागरिकांसाठी एक पर्वणीच होती. याद्वारे नागरिकांमधील सामाजिक दृष्टिकोन बदलासाठी वाव मिळाला. प्रत्यक्ष चित्रकाराची कल्पनाशक्ती व ती कल्पना प्रत्यक्षात चित्राच्या माध्यमातून मांडण्याचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. या चित्रांद्वारे समाजविघातक चालीरीती व रूढी परंपरा आपल्याला समजण्यास मदत झाली व त्यातील फोलपणा समजून घेण्यास मदत झाली. या प्रदर्शनामुळे सर्वांना एक नवीन विषय शिकायला मिळाला असे म्हणता येईल.

**-अशोक गोलवड, मुख्याध्यापक, एस.के.पाटील विद्यामंदिर माकुणसार, ता. जि. पालघर**

आपल्या भारत देशाने विज्ञानाच्या साहाय्याने प्रगतीचे शिखर गाठले आहे. प्रत्येक क्षेत्रात देशाने प्रगती केली आहे. असे असून ही अंधश्रध्देच्या शाप आपल्या देशाला समाजाला लागला आहे. आपल्या देशातील समाजातील बरेच लोक अंधश्रध्देच्या आहारी जातात.त्या गोष्टींवर विश्वास ठेवतात. त्या गोष्टीचे वैज्ञानिक कारण न जाणून घेता त्यावर विश्र्वास ठेवतात. आमच्या राजगुरू. ह. म. पंडित. विद्यालय सफाळे येथे पार पडलेल्या ' जादूटोणा व करणी या विषयक चित्र प्रदर्शन ' या चित्र प्रदर्शनातून दिसून आले. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मुलन समिती, सांगली तर्फे आयोजित केलेल्या या प्रदर्शनातून अंधश्रधे विषयक संकल्पना स्पष्ट झाल्या.अंधश्रध्देच्या नाश व्हावा यासाठी हे आगळे वेगळे प्रदर्शन आमच्या शाळेत पार पडले . विद्यार्थ्यांचे तसेच ग्रामस्थांचे अंधश्रधे बाबदितचे मत स्पष्ट झाले.. असे अनेक प्रदर्शन आयोजित केले पाहिजेत जेणेकरून अंधश्रध्दा या समाजातून नाहीशी होण्यास मदत होईल.

**-संचिता साळवे, विद्यार्थिनी, राजगुरू. ह. म. पंडित. विद्यालय सफाळे**

महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मूलन समिती सांगली शाखा यांनी स्तुत्य उपक्रम राबविलाआहे. आणि त्या उपक्रमांमध्ये त्यांनी महाराष्ट्र राज्यातून सर्व कलाशिक्षकांना जादूटोणा व करणी या विषयावर चित्रकला स्पर्धेतून आव्हान केले. विविध गाव, तालुका व जिल्हास्तरावर चित्रकारांनी सहभाग नोंदवून महाराष्ट्रात समाज उद्धारासाठी , समाजाला योग्य दिशा मिळण्यासाठी; समाजातील अनिष्ट, विघातक प्रवृत्तीस आळा बसण्यासाठी उत्कृष्ट चित्र निर्माण करून समाजास प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण हजार शब्दात जे पटवून सांगताना येणार नाही ते काम एक चित्र करु शकते याच्यात शंकाच नाही. संपुर्ण पालघर जिल्ह्यातील शाळा शाळांमधुन ह्या चित्रांचे फिरतं प्रदर्शन भरवून समाजातील अंधश्रद्धा दूर करून ढोंगी ,पाखंडी , समाजकंटक व बुरसटलेल्या विचारांना आळा घालण्याचे काम केले जात आहे.

विद्यार्थी व पालक यांचा उत्कृष्ट प्रतिसाद ह्या प्रदर्शनाला मिळत आहे.ही उल्लेखनीय कामगिरी म्हणावी लागेल. आजच्या विज्ञान युगात माणसाने भरमसाठ प्रगती केली असली तरी ही तो कोणत्यातरी रुढी परंपरा यांच्या नावाखाली दबलेला दिसून येतो. त्याला बाहेर काढण्याचे काम करणी विषयावर आधारित चित्र करीत आहेत हे नक्कीच अभिमानास्पद आहे. शंभर दिडशे वर्षांपूर्वी संत गाडगे बाबा हे अशिक्षित असून त्यांनी आपल्या भारूडातून लोकांना शिक्षणाचं महत्त्व पटवून सांगितले. शिक्षणाने अंधश्रद्धा दूर करता येईल व समाजाचा विकास साधण्यासाठी शिक्षण हेच साधन महत्वपूर्ण ठरेल हे ठामपणे सांगितले. जादूटोणा, नरबळी, तंत्र मंत्र, नजर टोक, भूत प्रेत, पिशाच्च याविषयी असणारा अंधविश्वास अफवा इत्यादी कृतींचा कडाडून विरोध संत गाडगे बाबा यांनी केला होता. तेच महान कार्य आज महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मूलन समिती करत आहे. समाजातील अज्ञानाचा फायदा घेऊन विघातक प्रवृत्तीकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने २०१३ साली कठोर कायदा केला होता. सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शासनाला हा कायदा लागू करण्यात भाग पाडले. असे असले तरी ह्या कायद्याला विरोध करणारे आहेतच याची खंत वाटते.संपूर्ण समाजातून ह्या गोष्टी हद्दपार कराव्या लागतील आणि त्यासाठी हा कलेच्या माध्यमातून केलेला प्रयोग हा मी समाज हितासाठी महत्त्वपूर्ण निर्णय समजतो आणि सर्व आयोजकांना खुप खुप धन्यवाद देतो व पुढील त्यांनी केलेल्या विचारांना समर्थ पाठबळ मिळो ही सदिच्छा व्यक्त करतो.

**-श्री.लिलाधर देविदास रायसिंग, राजगुरू ह.म.पंडित विद्यालय, सफाळे**

# दरोडा टाकणाऱ्या टोळीतील सहाजण अडकले जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी,
**यवतमाळ, दि.९:** भारत फायनान्स कंपनीच्या दोन कर्मचाऱ्यांची दुचाकी अडवून लुटणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळून त्यामधील सर्व सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. लाडखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनेत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत आव्हानात्मक ठरलेल्या प्रकरणाचा आठवडाभरात निपटारा केला. या कारवाईत सापळा रचून चौघांना गोव्यातून, तर दोघांना यवतमाळमधून अटक करण्यात आली.



प्राप्त माहितीनुसार, भारत फायनान्स कंपनीमध्ये काम करणारे शुभम दर्यापरकर आणि त्यांचा मित्र दोघेही ३० डिसेंबर रोजी दिघोरी-कामठवाडा-चाणी येथील बचत गटाचे कलेक्शन करुन चाणी ते यवतमाळ कडे परत येत होते. ते लाडखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दारव्हा मार्गावरील उमर्डा नर्सरी जवळ आले असता दोन दुचाकींवरुन आलेल्या सहा आरोपींनी त्यांची दुचाकी अडवली. जवळ असलेली बॅग जबरदस्तीने हिसकावून पळ काढला. त्या बॅगमध्ये नगदी १ लाख ७० हजार रुपये, २ टॅब, २ बायोमॅट्रॅक मशिन असा एकूण १ लाख ८७ हजार ३३५ रुपये किमतीचा मुद्देमाल होता, तो देखील बळजबरीने हिसकावून नेला. या घटनेची तक्रार शुभम दर्यापुरकर यांनी लाडखेड पोलिसांत दिली होती. तक्रारीनंतर गंभीर गुन्ह्याची दखल घेत पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी लाडखेड पोलिस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांचे पथक नेमून तातडीने तपास करण्याचे निर्देश दिले होते. कुणाल बापुराव चवरे वय २३ वर्षे रा. ईंदीरा नगर, बाभूळगाव, निखील बळीराम राऊत वय १९ वर्षे रा. बुटले ले-आऊट पिंपळगाव, अर्पीत दिपक ठोसरे वय १९ वर्षे रा. वार्ड क्र. ०४ पिंपळगाव, यश माणिकराव धुल वय २३ वर्षे रा. कोठा (वेणी), संस्कार शरद चौधरी वय १८ वर्षे रा. यावली (मावली), विवेक गजानन कोडापे वय १८ वर्षे रा. नागरगाव या सर्व आरोपींना ताब्यात घेतले. त्यांकडून १ लाख ६२ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

भारत फायनान्सच्या कर्मचाऱ्यांचीही चौकशी एकाच फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांना लुटण्याच्या घटना घडत आहे. त्यामुळे या प्रकरणात कंपनीचे कुणी कर्मचारी, अधिकारी तर सहभागी नाही ना हे पाहण्यासाठी आता उलट चौकशीही करण्यात येणार असल्याचे जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी सांगितले. या प्रकरणाचा उलगडा झाल्यानंतर त्यांनी मंगळवार ७ जानेवारी रोजी सायंकाळी पत्रकार परिषद घेत या संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली.

भारत फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यां सोबतच पाच घटना भारत फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्यांनाच लुटण्यात आल्याच्या तब्बल पाच घटना २०२३ या एका वर्षात घडल्या आहेत. आतापर्यंत या घटनांपैकी ३ घटनांचा उलगडा झाला आहे. असे असले तरी नेमके भारत फायनान्स कंपनीचेच कर्मचारी टार्गेट कसे, याचा तपास केला जात आहे.

चौकशी दरम्यान आढळली रकमेमध्येही तफावत दाखल तक्रारीत त्यावेळी चोरी केलेल्या बॅगमध्ये १,७०,००० रुपये होते असे सांगण्यात आले. तर आरोपींनी चोरी केलेल्या बॅगमध्ये १,४०,००० रुपये होते, असे चौकशी दरम्यान समोर आले. त्यामुळे या दोन्ही रकमांमध्ये ३० हजारांची तफ्फावत आढळून आली आहे. आरोपींना अटक केली असता त्यांच्याजवळून ५४,७०० रुपयांची रोकड जप्त केली असुन उर्वरीत रक्कम त्यांनी गोव्यामध्ये खर्च केल्याचे सांगितले आहे.

# थकीत कर्ज अदा करण्यासाठी अल्टीमेटम

## जिल्हा मध्यवर्ती बँकेचा पुसद न.प. शिक्षण कर्मचारी पतसंस्थेवर वॉच

■ महासागर प्रतिनिधी,
**पुसद, दि. ९:** येथील नगरपरिषद कर्मचारी शिक्षण सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाने यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून १ कोटी ५७ लाख ३९ हजार ३२१ रुपये कर्ज घेतले होते. मागील चार ते पाच वर्षांपासून ते थकीत आहे. त्यामुळे संचालक मंडळाने १५ दिवसांच्या आत थकीत कर्जाची रक्कम भरण्याचे पत्र पुसद शाखा व्यवस्थापकाने गुरुवारी २ जानेवारीला दिले आहे. पत्र धडकल्याने संचालक मंडळाला घाम फुटला आहे. पतसंस्थेच्या संचालक मंडळांनी अफरातफर केल्या प्रकरणी संचालक रमेश उमाटे यांनी यापूर्वीच तक्रार केली होती. पुसद नगरपरिषद शिक्षक सहकारी पगारदार सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाने सन २०१८-२०१९ते २०२३-२०२४ या कालावधीत अफरातफर केल्याचा आरोप होत आहे. त्या अफरातफरीची चौकशी केल्याशिवाय सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचे बँक कॅश क्रेडिट नूतनीकरण करण्यात येऊ नये, असे आदेश यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दिले होते. अफरातफर केल्या प्रकरणी संचालक मंडळातील ११ पैकी इफतेखार अहेमद, अनिता साखरे, अध्यक्ष सुनील जाधव या तीन जणांचे राजीनामे घेण्यात आले होते. सद्यस्थितीत पतसंस्थेचे ८ संचालक आहेत. यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पत्र दिल्यामुळे संस्थेचे खाते २९ ऑगस्ट २०२४ला एनपीएत आले होते. त्या रकमेचा भरणा करण्यासाठी पतसंस्थेला १५ दिवसांची म्हणजेच शनिवारी १८ जानेवारी २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. मुदतीत कर्ज न भरल्यास कलम ९१ अंतर्गत दावा दाखल करण्यात येणार असल्याचाही उल्लेख पत्रात आहे. पतसंस्थेचे अध्यक्ष सुनील जाधव यांचेकडे ७३ लाख ५ हजार ११६ रुपये, मोहम्मद जियाउद्दीन मोहम्मद सदरुद्दीन यांच्याकडे ९ लाख ६० हजार ५७ रुपये, वहिदा रहमान यांच्याकडे ५ लाख १४ हजार ८८९ रुपये, अभयकुमार पराते यांच्याकडे १३ लाख ३५ हजार ४६२ रूपये कर्ज थकीत असून या सर्वांनी कर्जाची परतफेड केली नाही.

येथील सहायक निबंध सहकारी संस्थेचे चौकशी अधिकारी सुनील भालेराव यांनी ३ ऑक्टोबर २०२४ रोजी चौकशी करून आदेश पारित केले होते.

त्या आदेशामध्ये संचालक मंडळांनी पतसंस्थेचे आर्थिक नुकसान केल्याचे उघडकीस आले आहे. दरमहा ८ हजार रुपये प्रमाणे ७ लाख ५० हजार रुपयांचे मानधन खर्च दाखवून अफरातफर केली आहे. संस्थेचे अध्यक्ष सुनील जाधव यांनी उचललेल्या कर्जाबाबत खोट्या नोंदी घेऊन पुन्हा कर्जाची उचल केली आहे.

# मनीष पावडे यांना नाशिकचा राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार



■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ९:** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिन निमित्त राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्काराची घोषणा राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशमुख यांनी केली असून यात येथील सर्वज्ञ फॉउंडेशन रोटी बँकेचे संस्थापक अध्यक्ष मनीष रमेशराव पावडे यांच्या सामाजिक व इतर कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नाशिककरांनी त्यांना हा पुरस्कार दिला. हिरोजी कॅडमीच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला खासदार राजाभाऊ वाजे, सुरतचे मनोहर शिंदे, पत्रकार कमलेश सुतार प्रमुख आयोजक डॉ. महेंद्र देशपांडे व इतर मान्यवर उपस्थित होते.

सरस्वती नगर अमरावती येथे सर्वज्ञब फाउंडेशन ही संस्था निराधारांना आधार देण्याचे सामाजिक कार्य करीत आहे. स्व. रमेश पावडे यांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या या संस्थेचे अध्यक्ष मनिष पावडे, सचिव वैशाली पावडे व त्यांचे सहकारी आठ वर्षापासून नियमितपणे हे काम करीत आहेत. अन्नदान, थंडीमध्ये ब्लँकेट वाटप, उन्हाळ्यामध्ये पाणपोई, निराधार बांधवांना चप्पल वाटप, अंध विद्यालयामध्ये साहित्य वाटप, निराधार लोकांची कटिंग-दाढी, रुग्णांना मदत, अपंगांना मदत, झाडे लावणे व जगवणे, पक्ष्यांसाठी घरटी तयार करणे अशाप्रकारे उपक्रम सुरू आहे. या कार्याची दखल घेऊनच हा पुरस्कार देण्यात आला. या यशाबद्दल अभिनंदन पेंढारी, बुलिदान राठी विद्यालयाचे अध्यक्ष पुरुषोत्तम मुंदडा, दीपक हुंडीकर, पुष्पलताताई पावडे, सुभाषराव पावडे, माधुरी जोशी, शारदाताई मायाणी, पंजाबराव पाटील, मंदाताई पाटील, अशोकभाई जोशी आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# वाचन संस्कृतीत दडलेले आहे अनेक अडचणींचे समाधान

## वाचन संकल्प पंधरवडा?

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ९ :** अनेक अडचणीचे समाधान वाचन संस्कृतीत असून, समृद्ध पुस्तक संस्कृतीतून आयुष्य समृद्ध करूया असे आवाहन नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुळकर्णी यांनी केले. श्री शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय विभाग, भाषा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत वाचन पंधरवड्याला प्रारंभ झाला. पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. जगदीश कुळकर्णी यांनी केले. त्यावेळी ते बोलत होते. सामूहिक वाचन कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबईतील सोमय्या विद्याविहारचे ग्रंथपाल डॉ. सागर खाताडे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. आशिष राऊत, डॉ. संजय पोहरे, डॉ. पी. पी. देशमुख, डॉ. संजय तिडके, डॉ. नितीन मोहोड, प्रा. गोविंद काळे, प्रा. श्रीकृष्ण तराळे, प्रा. सुनीलकुमार मावस्कर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. आशिष राऊत यांनी केले तर आभार डॉ. संजय पोहरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिलिंद इंगळे, राजभोज यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला कनिष्ठ महाविद्यालयाचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. असा होतोय पंधरवडा : वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. सामूहिक वाचन, पुस्तक प्रदर्शनी, वाचन कौशल्य कार्यशाळा, पुस्तक समीक्षा, साहित्यिक आपल्या भेटीला, कहाणी वाचन प्रतियोगिता, वाचन संवाद, कथा-कथनस्पर्धा आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे; कारण मराठी साहित्य विपुल व समृद्ध आहे. आज अनेक अडचणींचे समाधान वाचन संस्कृतीत आहे. समृद्ध पुस्तक संस्कृतीतून आयुष्य समृद्ध करा, असा आवाहन डॉ. कुळकर्णी यांनी केले. वाचनासाठी महाविद्यालायात अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# आविष्कार स्पर्धेसाठी श्री शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निवड




## रोजगार निर्मिती, पर्यावरण संरक्षण, सामाजिक प्रकल्प सादर

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ९ :** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची राज्यपाल निर्मित राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेकरिता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे निवड झाली आहे. राज्यपाल यांच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती निर्माण व्हावी म्हणून आविष्कार स्पर्धा आयोजित करण्यात येत असते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठद्वारे आयोजित आविष्कार स्पर्धेमध्ये शिवाजी महाविद्यालयातील इंजिनिअर अँड टेक्नॉलॉजी या संवर्गातून पदव्युत्तर पदवी या गटातून प्रा. रूपाली काळे द्वितीय क्रमांक प्राप्त केला. वाणिज्य, व्यवस्थापन व विधी संवर्गात पदव्युत्तर गटातून रोहन बुंदेले यांनी अग्निरोधक यंत्र व रोजगार निर्मिती प्रकल्प सादर होते. त्यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केले. वाणिज्य व व्यवस्थापन आणि विधी या संवर्गातून पदव्युत्तर पदवी या गटातून अक्षय देशमुख प्रथम क्रमांक प्राप्त केले तर इंजिनिअर अँड टेक्नॉलॉजी पदव्युत्तर गटातून श्रीयांश रुले यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केले. समारोपीय कार्यक्रमांमध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ फडणवीस, अविष्कार सेलचे समन्वयक डॉ. वैशाली धनविजय यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आले. विद्यार्थ्यांचा शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे, आय.क्यू.ए.सी समन्वयक डॉ. आशिष राऊत, आर.एस.सी समन्वयक डॉ. दीपक कोचे, अविष्कार समन्वयक प्रा. नितीन देशमुख महाविद्यालयाचे प्रबंधक राजेश गीते यांनीही महाविद्यालयात सन्मान केला.

## भूसंपादनासह पुनर्वसनाची कामे सुरू करण्याची मागणी




**यवतमाळ :** २७ वर्षांपूर्वी तत्कालीन शिवसेना-भाजपयुती सरकारने मान्यता दिलेल्या निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम आजही ठप्प आहे. आता प्रकल्पाचे काम सुरु करण्याच्या हालचाली शासनस्तरावरुन वाढल्या आहेत. त्यातच धरणविरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनीही सत्ताधारी भाजपला विधानसभा निवडणूकीत साथ दिली आहे. त्यामुळे प्रकल्पाबाबत विरोध व समर्थनाची स्थिती असतानाच मंगळवारी ७ जानेवारी रोजी कोळी (बु) असंख्य ग्रामस्थांनी या प्रकल्पाच्या समर्थनार्थ जिल्हा कचेरीवर धडक दिली. दरम्यान, विविध मागगण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

महाराष्ट्र व तेलंगणा या दोन राज्यातील तब्बल २ लाख ३५ हजार हेक्टर शेतीला सिंचनाखाली आणण्याचे सामर्थ्य असलेला निम्न पैनगंगा प्रकल्प रखडला आहे. या प्रकल्पात ९५ गावे बाधित होत असल्याने व सोन्यासारख्या जमिनी बुडीत क्षेत्रात जात असल्याने धरणाला बराच विरोधही होत आहे. त्यातूनच उदयास आलेल्या धरण विरोधी संघर्ष समितीने या प्रकल्पाच्या विरोधात आजवर अनेक आंदोलने केली. २०१२ मध्ये तत्कालीन कार्यकारी अभियंत्यासह जलसंपदाच्या काही अधिकाऱ्यांनाही मारहाण झाली होती. एकंदरीत हा प्रकल्प २७ वर्षांपासून ठप्प आहे. मध्यंतरी भूसंपादनासह काही अनुषंगिक कामे जलसंपदा अंतर्गत केली होती. घाटंजी तालुक्यातील ताडसावळी या गावाजवळ उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पाला तत्कालीन सेना-भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी विरोध केला होता.

## काही गावात 'टक्कल व्हायरस'चे थैमान



**तीनच दिवसात टक्कल पडत असल्याने नागरिक भयभीत**

**शेगाव:** बुलढाण्यातील शेगाव तालुक्यामध्ये काही गावांमध्ये केस गळतीच्या व्हायरसने धुमाकूळ घातला आहे. या व्हारसमुळे तीन दिवसांतच टक्कल पडत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शेगावमधील काही गावांमध्ये ही गंभीर समस्या जाणवत आहे. राज्य सरकारकने मात्र अद्याप याकडे लक्ष दिलेले नाही. यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. तालुक्यातील काही गावामध्ये नागरिकांना केसगळतीची समस्या जाणवत असून चक्क टक्कल पडत असल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. तालुक्यातील बोंडगाव, कालवड, हिंगणा या गावात अज्ञात व्हायरसने थैमान घातले असून, कुटुंबची कुटुंब या व्हायरसचा बळी ठरत आहेत. अगोदर डोके खाजवणे, नंतर सरळ केस हाती येणे आणि तिसऱ्या दिवशी चक्क टक्कल पडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून या तिन्ही गावातील शेकडो नागरिकांचे टक्कल पडले आहे. विशेष म्हणजे यामध्ये महिलांची संख्याही लक्षणीय आहे. परंतु एवढा भयंकर प्रकार होऊनही आरोग्य विभाग अनभिज्ञ आहे. त्यामुळे नागरिक उपचार करून घेत आहेत. शाम्पूने असा प्रकार घडत असावा, असे डॉक्टरांचे मत असले तरी कधीही शाम्पू न वापरणाऱ्या नागरिकांचेही केस जात आहेत.

**अचानक पसरलेल्या व्हायरसमुळे प्रशासन संभ्रमात**

तालुका आरोग्य प्रशासनाने सर्वेक्षण करुन पाण्याचे नमुने घेतले आहे. तालुका आरोग्य विभागाकडून जिल्हा साथरोग अधिकाऱ्यांनाही या प्रकाराबाबत कळवण्यात आलेले आहे. अचानक पसरलेल्या व्हायरसमुळे आम्हीही आश्चर्यचकीत झालो आहोत, नेमका हा कोणता प्रकार आहे याचा आम्ही शोध घेत असल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दीपाली भायेकर यांनी म्हटले आहे.

**उपचार शिबिरे राबवण्याचे आवाहन**

बुलढाणा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गीते यांना शेगाव तालुक्यातील शिवसेनाप्रमुख रामेश्वर थारकर यांनी निवेदन देऊन या गंभीर समस्याची दखल घेऊन गावामध्ये उपचार शिबिरे राबवण्याचे आवाहन केले आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना सुध्दा याबाबत माहिती देण्यात आली आहे. सरकारकडून या गंभीर समस्येसाठी कोणत्या उपाययोजना राबविल्या जातात याकडे सर्व नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.

# वातरोग, मणके विकारांवर मंथन तज्ज्ञांनी दिले प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ९ :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कृषक भवनात चार आयुर्वेद डॉक्टर व विद्यार्थ्यांसाठी 'मास्टरक्लास इन आयुर्वेद ऑर्थोपेडिक' हे ऑनलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. वातरोग व मणक्यांच्या विकारांमध्ये प्राचीन आयुर्वेद शास्त्रासोबत आधुनिक तंत्रज्ञान व भौतिकशास्त्राची सांगड घालून विकसित करण्यात आलेल्या एकिकृत वातरोग चिकित्सा पद्धतीचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाचा लाभ वैद्यकीय विद्यार्थ्यांनी घेतला.

प्रशिक्षण डॉ. स्वप्नील गावंडे यांच्या मार्गदर्शनात झाले. अध्यक्षस्थानी खा. अनुप धोत्रे होते. उद्घाटन निमाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून निमा आयुर्वेद फोरमचे प्रदेशाध्यक्ष डॉ. अमोल ठवळी होते. प्रास्ताविक मुख्य प्रशिक्षक डॉ. स्वप्नील गावंडे यांनी केले. प्रशिक्षणाचा लाभ भारतातील विविध राज्यातील तसेच श्रीलंका, पोलंड, नायजेरिया व जर्मनी येथील आयुर्वेद चिकित्सक व विद्यार्थ्यांनी घेतला. या निवासी प्रशिक्षणात भारतातील सुमारे १५ राज्यातून ४० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. प्रशिक्षणा दरम्यान वातरोग व मणक्यांच्या विकारांमध्ये एकीकृत वातरोग




चिकित्सा पद्धतीचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी आयआयएएस पुणे संस्थेच्या संचालिका डॉ. मंजूषा चित्ते यांनी संस्थेबद्दल माहिती दिली. डॉ. ललित हेडा यांनी आभार मानले. यावेळी आयुर्वेद तज्ञ डॉ. अरुण राठी, डॉ. नितीन धनोकार, डॉ. योगेश बदरखे, डॉ. राजेश भोंडे, डॉ. संतोष ठोंबरे, डॉ. रुद्रेश कऱ्हे, डॉ. तुषार गावंडे, डॉ. सुहास पाखरे, डॉ. तुषार गावंडे, डॉ. सचिन सावळे, डॉ. अनंत श्रावगी, डॉ. माहेश्वरी, डॉ. अंकुर डालके, डॉ. आकाश चांगोले, समुदाय आरोग्य अधिकारी संघटना प्रदेशाध्यक्ष डॉ. अंकुश मानकर आदी उपस्थित होते. मानसोपचार तज्ञ डॉ. दीपक केळकर यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण थींसाठी वैद्यकीय व्यवसायाचे व्यवस्थापन व बॉक्सिंग प्रशिक्षक व जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. सतीशचंद्र भट यांनी क्रीडा विषयक दुखापतींत आहारशास्त्र व खेळा दरम्यान होणाऱ्या दुखापतींचे व्यवस्थापन व प्रतिबंध या विषयावर व्याख्यान झाले. या उपक्रमाची माहिती देत आतापर्यंत अर्वाचीन आयुर्वेद गुरुकुलच्या माध्यमातून देश विदेशातील ५०० पेक्षा जास्त आयुर्वेद तज्ञांना प्रशिक्षित करण्यात आले.

## श्रमिक पत्रकार संघातर्फे बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**अमरावती:** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीदिनी राजापेठ स्थित अमरावती श्रमिक पत्रकार संघाच्या कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित पत्रकारांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करीत त्यांना पुष्पांजली अर्पण केली. मराठी पत्रकारितेचे जनक 'दर्पणकार' बाळशास्त्री जांभेकर यांचा जयंती दिन दरवर्षी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. अमरावती श्रमिक पत्रकार संघातर्फेही दरवर्षी हा कार्यक्रम उत्साह पूर्ण साजरा केला जात असतो. याच दिवशी पत्रकारिता क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या पत्रकारांचा सन्मानदेखील केला जातो. परंतु सर्वांना त्यात सहभागी होणे शक्य व्हावे, म्हणून यावर्षी हा सन्मान सोहळा आगामी २६ जानेवारी या सर्वांच्या सुटीच्या दिवशी ठेवण्यात आला आहे.

पत्रकार दिनाच्या निमित्ताने अमरावती श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे, उपाध्यक्ष अमोल इंगोले, सचिव रवींद्र लाखोडे, कोषाध्यक्ष गिरीश शेरेकर यांच्यासह इतर पदाधिकारी कृष्णा लोखंडे, प्रदीप भाकरे, प्रवीण कपिले, शैलेश धुंदी, गजानन मोहोड, महेश कथलकर, अनिल मुणोत, भैय्या आवारे, योगिनी अर्डक, पुष्पा जैन, संदीप शेंडे, सुनील चौरसिया, दिलीप जवंजाळ, वैभव बाबरेकर, सुनील सचदेवा व व्यवस्थापक योगेश पिढेकर, नरेश चंडाले आदी उपस्थित होते. बाळशास्त्री जांभेकर यांनी दाखवलेल्या मार्गावर पत्रकारांनी वाटचाल करावी, असे आवाहन अध्यक्ष गोपाल हरणे यांनी केले.

सार्वजनिक सूचना

**अश्व फायनान्स लिमिटेड**

CIN:U65910MH1998PLC333546

नोंदणीकृत कार्यालय: १२बी, ३रा मजला, टेक्नीप्लेक्स-२ आयटी पार्क, वीर सावरकर उड्डाणपूल समोर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०००६२,
दूरध्वनी. क्रमांक: +९१-२२-६२४९ २७००
Email: info@ashvfinance.com Website: www.ashvfinance.com

शाखा कार्यालये बंद

अश्व फायनान्स लिमिटेड ची खालील शाखा कार्यालये ११-एप्रिल-२०२५ पासून बंद होतील:

| स्थान | पत्ता | राज्य |
|---|---|---|
| ठाणे | ३ आणि ४, ५ व्या मजल्यावर स्थित, नालंदा चेंबर्स, गोखले रोड, हनुमान मंदिर, नौपाडा, ठाणे-पश्चिम - ४००६०२ | महाराष्ट्र |
| पुणे | पहिला मजला, रचना ट्रेड इस्टेट स्थित सी.टी.एस क्र. १०५, मौजे फायनल प्लॉट क्र. ८४, स्वाद हॉटेलच्या मागे, लॉ कॉलेज रोड, एरंडवणे, पुणे, महाराष्ट्र. | महाराष्ट्र |
| नागपूर | फ्लॅट क्र. ५०२, पाचव्या मजल्यावर स्थित आशीर्वाद टॉवर, भूखंड क्रमांक ५३ वर बांधलेला, महानगरपालिकेचे घर क्र. ३११/बी/५३/५०२, प्रभाग क्रमांक ७४, बजाज नगर, व्होडाफोन गॅलरीजवळ, मौजा अंबाझरी, नागपूर ४४००१०. | महाराष्ट्र |
| नाशिक | कार्यालय क्रमांक ३०५, तिसरा मजला, भूखंड क्रमांक ६+७+८, एस. क्र ६०९/०१, श्री हरी कुटे मार्ग, हॉटेल संदिप जवळ, मुंबई नाका, नाशिक - ४२२००२ | महाराष्ट्र |

ग्राहक त्यांच्या चौकशी/प्रश्न info@ashvfinance.com वर टाकू शकतात

अश्व फायनान्स लिमिटेड साठी
स्वा/-
कंपनी सचिव

**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Tender Notice**

Commissioner NMC invites Offline Tenders for the following works in Two Envelopes System. These Offline Tender can be submitted by the Registered Contractors of NMC. The terms and conditions of Offline Tenders are available in the Tender Form. The Sale and Purchase of tender form can be done at E.E. (DPDC, SLUM), 5th Floor NMC Civil Office

| Tender No. | Name of the work | BOQ Cost (Rs.) | EMD |
|---|---|---|---|
| 1-2025 | Water Proofing Treatment & Various Civil Work at Satnami Nagar Primary School at Satnami Nagar | 837510 | 8500 |
| 2-2025 | Providing & Laying Tiles & Various Civil Work of Chikhali Devasthan Hindi Primary School at near Kalamana Market Chikhali | 625400 | 6500 |
| 3-2025 | Repairing Work of Sulabh Shouchalaya at Santra Market Nagpur | 749421 | 7500 |
| 4-2025 | Repairing Work of Sulabh Shouchalaya at Cotton Market Nagpur | 743401 | 7500 |

**Note :- 1)** Cost of Blank Tender form Rs. 590/- **2) Tender sale & submission start date :** 10/01/2025. **3) Tender submission end date/sales end date** 23/01/2025 up to 5.00 pm. 4) Date of opening of Tender (if possible) 24/01/2025 up to 5.00 pm. **5)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in uploaded tender document. **6)** Time Limit & Class Of Contractor Stated in tender document.

**Advt No : 846/PR,**
**Dt : 09/01/2025**

**Executive Engineer (Slum)**
**N.M.C, Nagpur.**

# महाकुंभात किन्नर संतांचा अद्भुत संसार

गळ्यात सोन्याचे जाडजूड हार, मनगटावर रुद्राक्ष, सोन्याचे आणि हिऱ्यांनी बनवलेले ब्रेसलेट, कानात अनेक तोळे वजनाची कानातली अंगठी, समकालीन नाकातील नथ, कपाळावर त्रिपुंड आणि लाल बिंदी... ही ओळख आहे आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांची. आचार्य लक्ष्मी नारायण किन्नर आखाड्याच्या प्रमुख आहेत. महाकुंभसाठी, जुना आखाड्यासह किन्नर आखाडा रथ, घोडे आणि वाद्यांसह शहरात आणि नंतर छावणीत दाखल झाला आहे. सध्या आखाड्यातील सुमारे एक हजार 'किन्नर संत' येथे दाखल झाले आहेत. देश-विदेशातून त्यांच्या आगमनाची प्रक्रिया सुरूच आहे. संगमाच्या वाळूवर वसलेल्या श्रद्धेच्या महाकुंभातील किन्नर संतांचा संसार कसा आहे? कुंभसाठी त्यांची काय तयारी आहे? याविषयी अनेकांना उत्सुकता लागून राहिली आहे. किन्नर साधू वेशभूषा करून पूजा करतात. मग आनंद व्यक्त करतात.

------------

आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मी नारायण त्रिपाठी म्हणतात, किन्नर केवळ मेकअपनेच चांगले दिसतात. आम्ही आमच्या प्रभूसाठी स्वतःला सजवतो. आमचा मेकअप पाहिल्यानंतर लोक विचारतात की तुम्ही तुमच्यासोबत मेकअप आर्टिस्ट घेता का? माझे उत्तर आहे, आमच्याकडे मेकअप आर्टिस्ट ठेवण्यासाठी इतके पैसे नाहीत. आम्ही स्वतःचा मेकअप करायला शिकलो आहोत.


महामंडलेश्वर रोज नवरीसारख्या सजतात. लक्ष्मी नारायण त्रिपाठी म्हणतात, ३ तास लागतात. मग आम्ही या रूपाने आराध्य भगवान शंकराची पूजा करतो. ४ तास भोलेनाथाच्या पूजेत आणि प्रार्थनेत तल्लीन राहतो. हे सर्व ७ तास घेते. ही साधना तुमच्या कुंभक्षेत्रातील वास्तव्यादरम्यान दररोज सुरू राहील. त्यानंतरच भाविकांची भेट घेतो.

आचार्य लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांनी महाकुंभ परिसरात स्थायिक झालेल्या किन्नरांच्या अशा जगाबद्दल सांगितले, ज्याबद्दल फार कमी लोकांना माहिती आहे. त्या म्हणतात, किन्नर आखाडा १३ ऑक्टोबर २०१५ रोजी अस्तित्वात आला. किन्नर समाजात वर्षानुवर्षे उपेक्षित राहिले. पण २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा नालसा निकाल आला. यामध्ये किन्नर (तृतीय लिंग) यांना त्यांचे हक्क मिळाले. त्या स्वतः यात हस्तक्षेप करणाऱ्या होत्या.

आखाडा तयार करणे जितके सोपे होते, तितकेच ते पुढे नेणे आणि अस्तित्वात आणणेही अवघड होते. आखाडा स्थापन केल्यानंतर आम्ही उज्जैनच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे जाऊन अर्जही केला. जेव्हा सर्व १३ आखाड्यांचे पदाधिकारी आणि संतांना या नवीन आखाड्याची माहिती मिळाली तेव्हा ते आमच्या विरोधात उभे राहिले. खूप वाद झाले, पण मी ठाम राहिले. सनातन धर्मात किन्नरांना उपदेवतांच्या श्रेणीत ठेवले आहे. देव, दानव, यक्ष, गंधर्व, किन्नर, अप्सरा, संत महात्मे इत्यादी आहेत.

किन्नरांसाठी, देव दनुज किन्नर नर श्रेणी, सादर मजहिं सकल त्रिवेणी.. असे म्हटले गेले आहे. किन्नरांचे मोठे स्थान आहे. ते स्थान प्राप्त करण्यासाठी, त्या ठिकाणी किन्नरांची स्थापना करायची असेल तर किन्नर आखाड्याला पुढे न्यावे लागेल, असे आम्ही ठरवले.

आता बँकॉक, मलेशिया, अमेरिका अशा इतर देशांमध्येही किन्नर आखाडा स्थापन करण्याची मागणी होत आहे. विशेष म्हणजे या आखाड्यात केवळ किन्नर किंवा ट्रान्सजेंडरच नाही तर पुरुष आणि



महिलाही सहभागी होतात. सर्वांना सोबत घेऊन जातो. इतर धर्मातील लोकांनाही आमच्यासोबत यायचे आहे.

त्या पुढे म्हणतात, २०१९ मध्ये आम्हाला जुना आखाड्याचा पाठिंबा मिळाला. जुना आखाड्याचे संरक्षक हरी गिरी महाराज यांची भेट घेतली. आमचा करार जुना आखाड्याशी होता. यामध्ये कुंभ-महाकुंभमध्ये जुना आखाड्यासह किन्नर आखाडा शाही स्नान करणार असल्याचे ठरले. यानंतर २०१९ मध्ये संत आणि तपस्वींनी आम्हा किन्नरांसाठी आपले दरवाजे उघडले. आता हा किन्नर आखाडा देशातच नाही तर संपूर्ण जगात ओळखला जातो.

**महाकुंभात 'किन्नर आर्ट व्हिलेज'**

आचार्य लक्ष्मीनारायण सांगतात, यावेळी किन्नर आखाड्याच्या शिबिरात किन्नर आर्ट व्हिलेजही तयार करण्यात येणार आहे. त्यात चित्रकला, शिल्पकला, छायाचित्रण असेल. महाकुंभाच्या सेक्टर-१६ संगम लोअर रोडच्या उजव्या मार्गावर किन्नर आखाड्याचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. आमचे कार्यक्रम १० जानेवारीपासून सुरू होतील.

शिबिरात पौष पौर्णिमा (१३ जानेवारी) ते महाशिवरात्री (२६ फेब्रुवारी) पर्यंत दररोज सनातन धर्मावरील चर्चासत्रांसह पूजा, रुद्राभिषेक, हवन व इतर कार्यक्रम होणार आहेत.

किन्नर आखाड्याचे साधू खूप हायटेक आहेत. डॉ. लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांचे फेसबुकवर १ लाखाहून अधिक आणि इंस्टाग्रामवर ८० हजारांहून अधिक फॉलोअर्स आहेत. त्याचप्रमाणे महामंडलेश्वर कौशल्यानंद गिरी व्यतिरिक्त कल्याणी नंद गिरी, किन्नर आखाड्याचे मोहनी नंद गिरी, पवित्र नंद आदींचे लाखो अनुयायी आहेत. कुंभ असो की महाकुंभ, त्यांचे रीलही सोशल मीडियावर सर्वाधिक व्हायरल होतात.

किन्नर आखाड्याचे आचार्य महामंडलेश्वर डॉ. लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांनी तृतीयपंथीयांशी संबंधित २ पुस्तके लिहिली आहेत. पहिले पुस्तक म्हणजे 'मी हिजडा- मी लक्ष्मी' . ते हिंदी, मराठी, इंग्रजी आणि गुजराती भाषेत आहे. त्याचप्रमाणे 'द रेड लिपस्टिक मेनन माय लाइफ' हे दुसरे पुस्तक आहे.

आचार्य सांगतात की या पुस्तकांच्या माध्यमातून त्यांनी किन्नरांच्या खऱ्या जगाविषयी सांगितले आहे. यामुळे लोकांचा किन्नरांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. लोक कटाक्ष घेतात, पण मला काही फरक पडत नाही.

जर्मन प्रॉडक्शनने किन्नरांवर 'थर्ड जेंडर बिटवीन द लाइन्स' हा चित्रपट बनवला. त्याचप्रमाणे अक्षय कुमारच्या 'लक्ष्मी' चित्रपटातही किन्नरांचा संघर्ष दाखवण्यात आला होता. यामध्ये लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांनी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून पाठिंबा दिला. त्यांनी अक्षय कुमारसोबत या चित्रपटाची ब्रँडिंग केली.

आचार्य महामंडलेश्वर त्यांचे बालपणीचे दिवस आठवून भावूक झाल्या. त्यांनी त्यांच्या संघर्षाची कहाणीही सांगितली. ते म्हणाले, 'एक काळ असा होता की रस्त्यावर चालणेही कठीण होते. लोक आम्हाला हिजडा म्हणत आणि टाळ्या वाजवून चिडवायचे. मला शाळेत बाथरूममध्ये जायला भीती वाटत होती, माझ्याकडून काहीतरी चुकीचे होऊ शकते या भीतीने. मी मजबूत होईपर्यंत उपेक्षित राहिले.

त्या म्हणतात, प्रत्येक मूल आईचे दूध पिऊन मोठे होते, मीही त्याच आईचे दूध पिऊन मोठे झालो आहे, पण कधी कधी आपले बालपण आपल्याकडून हिसकावले जाते, याला आपण नाही तर समाज जबाबदार आहे.

वेदांपासून रामायण काळापर्यंत किन्नर समूहाच्या प्राचीनतेचा उल्लेख आहे. रामायणात किन्नरांचा उल्लेख आहे. याविषयीची एक महत्त्वाची घटना रामायणात सुमारे ३ हजार वर्षांपूर्वी मांडण्यात आली आहे. प्रभू राम वनवासासाठी अयोध्येतून निघाले तेव्हा संपूर्ण राज्य त्यांच्या मागे लागले. प्रभू रामाने लोकांना त्यांचे अश्रू पुसण्यास आणि त्यांच्या घरी परतण्यास सांगितले. मग बहुतेक लोक परतले.

परंतु काही लोक, जे पुरूष किंवा स्त्री नव्हते, ते जंगलात राहिले. भगवान रामाच्या १४ वर्षांच्या वनवासात ते तिथेच राहिले. नंतर राम परत घेऊन राज्यात परतले. या घटनेच्या आधारे त्यांना किन्नर मानले जाते. महाभारतातही किन्नरांचा उल्लेख आहे, जिथे त्यांचे वर्णन अर्ध-मानव आणि अर्ध-अश्व असे केले आहे. याआधी वेदांमध्येही तीन प्रकारच्या लोकांचा उल्लेख आहे, जे त्यांच्या स्वभावावर अवलंबून असतात.

मुघल काळात किन्नर समूहाचा उल्लेख पूर्वीपेक्षा अधिक तपशीलाने केला जातो. अनेक मुघल लेखकांनी किन्नरांच्या कथा त्यांच्या रचनेत समाविष्ट केल्या आणि तेव्हाच 'हिजडा' हा शब्द प्रचलित झाला. मुघलांच्या दरबारात किन्नरांना महत्त्वाचे स्थान होते. ते हरमच्या देखभाल आणि रक्षणाची जबाबदारी सांभाळत होते.

दिल्ली सल्तनतच्या काळापासून ही प्रथा प्रचलित होती आणि मुघलांनीही ती स्वीकारली. याशिवाय सैन्य आणि दरबारात नृत्य आणि संगीताची जबाबदारीही त्यांनी सांभाळली. अकबराच्या काळात किन्नरांचा विशेष उल्लेख आहे.

फ्रान्सिस्को पेल्सार्ट, डच व्यापारी, 17 व्या शतकातील मुघल दरबारातील त्यांचा अनुभव सांगताना म्हणाले की, तृतीयपंथीयांची शक्ती आणि आदर त्यांच्यासाठी आश्चर्यकारक होता. मुघल काळातील किन्नरांचे चित्रण करणारी अनेक चित्रेही या काळात सापडतात. त्यात बहादूरशहाच्या दरबारातील किन्नर खवस खान हे प्रमुख आहेत.

2018 मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने समलैंगिकतेला गुन्हा ठरवणारे कलम 377 रद्द केले, परंतु त्याची सुरुवात 1864 मध्ये झाली. त्यावेळी, ब्रिटीशांनी भारतात ब्रिटनचा बुगेरी कायदा 1533 लागू केला, ज्यामुळे समलैंगिकता हा गुन्हा मानला जाऊ लागला. त्यामुळे किन्नर असल्याने त्यांना गुन्हेगार मानले जाऊ लागले.

ब्रिटिश सरकारने किन्नरांना घाण, रोग आणि संसर्ग पसरवणारे मानले. त्यांच्यासोबत भेदभाव होऊ लागला. ब्रिटिश अधिकारी त्यांना सामाजिक नैतिकतेचा शत्रू मानत आणि त्यांना त्यांच्या राजवटीसाठी धोका मानत.

●●●●●●●●●

# आक्रोश मोर्चे की 'राजकीय इव्हेंट'?

मागील महिन्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. गुन्ह्यातील आरोपी हे माणसे नसून, मानवाच्या रक्ताची चटक लागलेले 'हैवान' आहेत, हे ज्या प्रकारे हत्या केली, त्यावरून स्पष्ट होते. हा प्रकार जितका निंदनीय आहे; तितकाच निषेधार्ह आहे, याबाबत कुणाचेही दुमत नसावे. पाण्याऐवजी त्या निष्पाप तरुणाच्या तोंडावर लघुशंका केली, हे ऐकून आज माणूस किती विकृत झाला आहे, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

---

■ प्रदीप व्ही. खोलमकर
नाशिक. 8767592980

---

खरे सांगायचे झाल्यास विधानसभा निवडणुकीत विरोधकांचे पाणीपत झाले. देवेंद्र फडणवीस नाकावर टिच्चून मोठ्या बहुमताने मुख्यमंत्री झाले. केंद्रातही आमचीच सत्ता येणार, 'अबकी बार मोदी तडीपार' असे विरोधक 'दिवास्वप्न' बघत होते. पण, तेथेही मोदींनी 'हॅटट्रिक' करून यांना घरचा रस्ता दाखवला. राजकारणातील चाणक्य समजणाऱ्या बारामतीच्या 'करामती' काकाला 'शेरास सव्वाशेर' भेटला. हे काही रूचले नाही. फडणवीस आणि सरकारला लक्ष्य करण्यासाठी विरोधक 'सुवर्णसंधी'च शोधत होते.

फडणवीसांच्या आणि राज्याच्या दुर्दैवाने निवडणूक संपताच ही दुर्दैवी घटना घडली. खरे तर ही घटना पवनचक्कीच्या आर्थिक व्यवहारातून घडलेली आहे. संशयित मुख्य आरोपी वाल्मिक कराड हा धनंजय मुंढे यांचा निकटवर्तीय आहे. हाच धागा पकडून विरोधकांनी अजिबात गरज नसताना या अतिसंवेदनशील घटनेचे राजकारण करण्यास सुरुवात केली.

धनंजय मुंढे, पंकजा मुंढे, अजित पवार, देवेंद्र फडणवीस आणि सरकारला धारेवर धरले आहे. रोज ठिकठिकाणी आक्रोश मोर्चांचे आयोजन करण्यात येत आहे. अर्थात, हैवान मारेकऱ्यांना लवकरात लवकर फाशीची शिक्षा व्हावी, ही प्रत्येक नागरिकाची मनस्वी इच्छा आहे. विरोधक त्यासाठी आक्रोश मोर्चे काढत आहेत, हेही ठीक आहे. परंतु या मोर्चांना जे राजकीय 'इव्हेंट'चे स्वरूप देण्यात येत आहे, ते मात्र अजिबात पटणारे नाही.

यावरून हेच सिद्ध होते की, या अतिदुर्दैवी घटनेचा वापरही तुम्ही स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी करत आहात. एका अर्थाने तुम्ही 'मेलेल्या मड्यावरच्या टाळूवरचे लोणीच खात' आहात, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

अडीच वर्षे तुम्ही सत्तेवर होता. तेव्हाही अशा घटना घडलेल्या आहेत. पालघरचे साधू हत्याकांड हाही भयानक प्रकार होता. त्यावेळेस तुम्ही तर 'मिठाच्या गुळण्या धरून' बसले होते. त्या प्रकरणाचा, हिरेन मनसुख, दिशा सालियन, सुशांतसिंग राजपूत प्रकरणाचा तुम्ही काय आणि कसा तपास केला? हे जनता विसरलेली नाही. या दुर्दैवी प्रकरणांचा त्यावेळी विरोधकांनी भावनांचा असा बाजार मांडला नव्हता.

आपण मूक मोर्चे काढून, काळ्या फिती लावून ठिय्या आंदोलने केली असती तर, खरेच तुम्हाला मृत पावलेल्या संतोषबद्दल खरी आत्मियता आहे, हे पटले असते. पण, गरज नसताना तुम्ही ते राजकीय व्यासपीठ बनवले. नेहमीप्रमाणेच रोज एकमेकांची उणे-दुणे काढत आहेत.

संतापजनक बाब म्हणजे, मोर्चात सहभागी झालेले नागरिकही चेकाळून टाळ्या, शिट्या वाजवत ओरडत आहेत. यावरून शंका येते की, ही जनता खरेच स्वयंस्फूर्तीने येत आहे का? त्यांना या घटनेचे गांभीर्य समजते का? त्यांच्या वागणुकीवरून संशय येतो की, ते तुम्हीच जमविलेले तुमचे कार्यकर्ते आणि बगलबच्चे असतात की काय?

बेशरमपणाचा कळस गाठला तो जितेंद्र आव्हाड आणि मनोज जरांगेनी. मविआ सरकारमध्ये मंत्री असताना, विरोधात पोस्ट केली म्हणून, अनंत करमुसे या लष्करी जवानाला पोलिस आणि बॉडीगार्डकरवी घरातून उचलत आणून, शरीर काळे-निळे पडेपर्यंत मारहाण केली.

'हरहर महादेव' चित्रपटाला विरोध म्हणून, चित्रपटगृहात घुसून हुल्लडबाजी करत, कुटुंबासमोर एका पुरुषाला मारहाण केली, तेव्हा कोठे गेली होती तुमची उद्विग्नता?

तुम्ही ज्याला स्वतःचा बाप समजता, त्या तरुण (?) बापाने काही दिवसांपूर्वीच आपल्या वाढदिवसाचा केक तलवारीने आणि तोही सार्वजनिक ठिकाणी कापला. सर्वसामान्य माणसावर पोलिस गुन्हे दाखल करून, त्यांना तुरुंगात टाकतात. मग काकावर काहीच कारवाई होत नाही? यावर तुम्ही का मूग गिळून गप्प बसला आहात? कायदा हा सर्वांसाठी समानच असतो ना? यावर दोन शब्द बोलले असते तर बरे वाटले असते.

मनोज जरांगे तर सरळसरळ जातीयवादी आणि प्रक्षोभक वक्तव्ये करून, दोन समाजात तेढ निर्माण करत आहे. मराठा आरक्षण आंदोलन हे शरद पवार यांनी उभे केले आहे; आणि जरांगे हे एक बुजगावणे आहे, हे सांगण्यासाठी कोण्या ज्योतिषाची गरज नाही.

कोणतीही समज, अभ्यास, भूमिका नसलेल्या जरांगेने या प्रकरणात नाक खुपसण्याची काहीच गरज नाही. पण, आता त्याला 'सकाळच्या भोंग्या'प्रमाणे सवंग प्रसिद्धीची हाव आणि पुढारी बनण्याची लालसा निर्माण झाली आहे.

महाराष्ट्राच्या 'घरकोंबड्या' मामुने (माजी मुख्यमंत्री) या प्रकरणाबद्दल तर बोलूच नाही. स्वतःच्या आणि मुलाच्या स्वार्थासाठी जनतेच्या पाठीत खंजीर खुपसून, आणि बापाच्या विचारांना तिलांजली देत, काहीही अक्कल नसताना, फडणविसांना खुन्नस म्हणून मुख्यमंत्रिपदाची खुर्ची बळकावली. नंतर अधिकार आणि कायद्याचा गैरवापर करत, निलंबित गुन्हेगार सचिन वाझे या आपल्या पाळीव '....'ला बढतीवर सेवेत घेतले. त्याने निष्पाप हिरेन मनसुख या व्यापाराचा खून केला.

यावर प्रश्न विचारला असता, वाझे काय लादेन आहे का? असा प्रश्न पत्रकारांना विचारत त्याचे समर्थन केले. एका नौदल सेवानिवृत्त अधिकाऱ्याने विरोधात पोस्ट केली. यांच्या बगलबच्च्यांनी घरात घुसून त्या वृध्दाला डोळ्याला दुखापत होईपर्यंत मारहाण केली. त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याऐवजी, मातोश्रीवर बोलावून त्यांचा 'सटकार' करण्याऐवजी 'सत्कार' करून, 'भिऊ नका मी तुमच्या पाठीशी आहे' अशी शाबासकीची थाप त्यांच्या पाठीवर मारली.

छोट्या छोट्या कारणांवरून निखिल भामरे, केतकी चितळे अशा सर्वसामान्य माणसांपासून पत्रकार, लोकप्रतिनिधी, मंत्री यांना कायद्याचा दुरूपयोग करत, त्यांना तुरुंगात टाकून छळ केला. असे वागणे एका मुख्यमंत्र्याला शोभते का? याचा विचार करा आणि जनाची नाही तर मनाची काही वाटत असेल तर, या प्रकरणात पडा.

आरोपींना फाशी व्हावी, 'बीड ही महाराष्ट्राला लागलेली कीड' आहे, ती नष्ट व्हावी, यासाठी रोज ठिकठिकाणी आक्रोश मोर्चे निघत आहेत. त्याला विरोध नाही. पण, न्याय मागणारेच गुन्हेगार आहेत, हे कसे विसरता येईल? या दुर्दैवी प्रकरणाचा ते स्वतःच्या स्वाथार्सासाठी वापर करून घेत आहेत, याचे दुःख वाटते. एक आरोपी वगळता सर्वांनाच अटक झाली आहे.

पोलिस कस्टडी मिळून चौकशीही सुरू झाली आहे. पण, पुण्याच्या मोर्चातही आंदोलक गुन्हेगारांना आणि कराडला अटक करा, अशी मागणी करत होते. यावरूनच हे अज्ञानी मोर्चेकरी पढवलेले पोपट आहेत का? असा प्रश्न पडतो. धनंजय मुंढे यांनी चौकशी होईपर्यंत तात्काळ राजीनामा द्यायला हवा होता. किंवा फडणवीस, अजित पवार यांनी घ्यायला हवा होता. पण, प्रत्येक नेता आपलाच स्वार्थ बघतो, हे यावरून अधोरेखित होते.

खरे तर, या अतिसंवेदनशील प्रकरणातील आरोपी लवकरात लवकर कसे गजाआड होतील? त्यांना लवकरात लवकर फाशीची शिक्षा कशी देता येईल? यासाठी विरोधकांनीही प्रयत्न केले असते तर समाधान वाटले असते. पण, नेहमीप्रमाणेच या दुर्दैवी घटनेचेही राजकारण करून, आपण किती असंवेदनशील आहोत, हे सर्वच कारभाऱ्यांनी दाखवून दिले आहे.

आतातरी सर्वांनी एकत्र येऊन निष्पाप संतोष देशमुखच्या कुटुंबाला झटपट आणि योग्य न्याय कसा मिळेल? यासाठी; आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी प्रयत्न करत, समाजापुढे एक आदर्श उदाहरण ठेवणे गरजेचे आहे.

परंतु, स्वतःचाच स्वार्थ साधण्यासाची सवय लागलेल्या या बेशरमपण कारभाऱ्यांनी राजकारणाचा इतका चिखल करून ठेवला आहे की, जनतेच्या भल्याचा हा कळीचा मुद्दा असल्याने, ते याचा विचार करतात की नाही? याकडे लक्ष ठेवणेच आपण करू शकतो.

●●●●

# उद्धव ठाकरेंचा काँग्रेसला 'दे धक्का'

दिल्ली विधानसभा निवडणुकीमध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने काँग्रेस पक्षाच्या विरोधात आम आदमी पक्षाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उद्धव ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना ही माहिती दिली आहे. त्यामुळे आता राष्ट्रीय पातळीवर 'इंडिया' आघाडी एकत्र नसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

या आधी देखील उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी काँग्रेस पक्षाच्या दिल्लीतील केजरीवाल यांच्या विरोधातील भूमिकेला विरोध दर्शवला होता. तसेच काँग्रेसचे कान टोचण्यात आले होते.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत 70 जागांसाठी एकाच टप्प्यात पाच फेब्रुवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या वेळी दिल्लीमध्ये सत्ताधारी आम आदमी पक्ष, भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस यांच्या तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे.

मागील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला दिल्लीमध्ये एकही जागा मिळाली नव्हती. तर केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने पूर्ण बहुमत मिळवले होते. त्यातच आता उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. या संदभार्तील माहिती खासदार अनिल देसाई यांनी 'एबीपी माझा' या वाहिणीला दिली असल्याचा दावा करण्यात आला आहे.

**अखिलेशचा आपला पाठिंबा**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी देखील आम आदमी पक्षाला पाठिंबा जाहीर केला आहे. दिल्लीच्या निवडणुकीत सपा देखील आम आदमी पक्षाचा प्रचार करणार आहे. त्या पाठोपाठ आता उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने देखील असाच निर्णय घेतला आहे. त्यामुळे मागच्या निवडणुकीत एकही खाते उघडू न शकणाऱ्या काँग्रेसला या निवडणुकीत देखील याचा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**आपच्या विजयाचा काँग्रेस नेत्याचा विश्वास**

काँग्रेस आणि आपमध्ये युती झाली असती तर बरे झाले असते, पण कदाचित तसे होताना दिसत नाही. दिल्लीत काय चालले आहे. ते महाराष्ट्रात बसून सांगणे कठीण आहे, असे काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी देखील म्हटले आहे.

या संदर्भात पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, 'दिल्लीची निवडणूक ही अत्यंत महत्त्वाची निवडणूक आहे. काँग्रेसही निवडणूक लढवत आहे. मला वाटते कदाचित तिथे केजरीवाल जिंकतील. महाराष्ट्रात तीन महिन्यापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत पृथ्वीराज चव्हाण यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते. कराड दक्षिणमधून ते निवडणूक रिंगणात उतरले होते. या जागेवरून भाजपचे उमेदवार विजयी झाले आहेत. महाराष्ट्रातील निवडणुकीत महाविकास आघाडीला पराभव स्वीकारावा लागला होता.

एकूणच काय तर काँग्रेस सर्वच आघाड्यांवर चुकीचे निर्णय घेताना दिसत आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे पानिपत झाले. अनेक राज्यातील त्यांची सत्ता ते गमावून बसले आहेत. दिल्लीत आप सोबत मिळून ते सत्तास्थानी येवू शकले असते. परंतु, काही नेत्यांचे चुकीचे निर्णय पक्षाचे वाटोळे करीत आहे.

■ ■ ■

## प्रयागराजचे महत्व!

वाचक लिहितात

अमृत प्राप्तीसाठी देव-दानवांमधे युद्ध झाले. या वेळी अमृतकुंभातील पृथ्वीवर प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन, आणि त्र्यंबकेश्वर या ठिकाणी पडले. या ठिकाणी ग्रह-नक्षत्रांच्या विशिष्ट योगाने कुंभमेळा साजरा होतो.

यंदाचा महाकुंभ प्रयागराज येथे आहे.

प्रयागराजचे महत्व पुराणानुसार जाणून घेऊ. ब्रह्मदेवांनी सृष्टीच्या निर्मितीनंतर प्रथम यज्ञ याच ठिकाणी केला होता, ज्यामुळे या स्थळाला 'प्रयाग' हे नाव मिळाले. 'प्र' म्हणजे महान आणि 'याग' म्हणजे यज्ञ; त्यामुळे 'प्रयाग' म्हणजे महान यज्ञाचे स्थळ.

प्रयागराज येथे गंगा, यमुना, आणि सरस्वतीचा त्रिवेणी संगम. पद्म पुराणानुसार प्रयागराज सर्व तीर्थांमध्ये श्रेष्ठ आहे. महाप्रलयातही प्रयागराज शाश्वत राहील, अशी मान्यता आहे. प्रयागराज हे शैक्षणिक, सांस्कृतिक आणि धार्मिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण केंद्र आहे. प्रयागराजच्या मात्र दर्शनाने पापक्षय होतो. यामुळे प्रयागराज कुंभमेळा श्रद्धाळूंना पुण्य, मोक्ष, आणि शांतीची अनुभूती होतो.

-------------

■ गिरीश कुळकर्णी
अकोला.

# मूग डाळीव्यतिरिक्त अनेक गोष्टींचे स्प्राउट्स

रोजच्या आहारात प्रथिनांचे प्रमाण वाढविण्यासाठी मूग डाळीव्यतिरिक्त अनेक गोष्टींचे स्प्राउट्स बनवता येतात, ज्यामुळे तुम्हाला प्रथिने तसेच इतर अनेक पोषक तत्वे मिळतील. जर तुम्ही रोज मूग डाळीचे स्प्राउट्स खाऊन कंटाळला असाल आणि याव्यतिरिक्त जर तुम्ही स्प्राउट्ससाठी वेगवेगळे प्रोटीनयुक्त पदार्थ शोधत असाल तर पुढील माहिती जाणून घ्या.

फिट आणि हेल्दी राहण्यासाठी ब्रेकफास्टमध्ये हेल्दी फूड्सचा समावेश करणं खूप गरजेचं आहे. म्हणूनच, जेव्हा वजन नियंत्रणासाठी प्रथिनेयुक्त पदार्थांचा विचार केला जातो तेव्हा बहुतेक लोक मूग स्प्राउट्स खाण्याची शिफारस करतात, कारण ही डाळ प्रथिने समृद्ध आहे आणि इतर अनेक पोषक तत्वांचा खजिना देखील आहे. मात्र

वजन कमी करण्यासाठी आणि स्नायूंना बळकटी देण्यासाठी मूग डाळीचे स्प्राउट्स खाणे खूप फायदेशीर आहे. आपल्या आरोग्यासाठीही याचे अनेक फायदे आहेत. सध्या मूग डाळीव्यतिरिक्त अनेक गोष्टींचे स्प्राउट्स बनवता येतात ज्यामुळे तुमच्या शरीरातील प्रथिनांचे सेवन पूर्ण होण्यास मदत होईल आणि त्याच टेस्टमुळे तुम्हाला कंटाळा येणार नाही.

मूग डाळीऐवजी तुम्ही मोड आलेला काळा हरभरा नाश्त्यात घेऊ शकता. हे



प्रथिनांचा एक उत्कृष्ट स्त्रोत देखील आहे. याशिवाय हरभरा स्प्राउट्समध्ये लोह, फायबर, पोटॅशियम इत्यादी पोषक घटक भरपूर प्रमाणात असतात. चणा स्प्राउट्समध्ये लिंबासह थोडे मीठ आणि मिरपूड टाकल्यास चव दुप्पट होते.

प्रथिनांसाठी कोणत्याही डाळीचे स्प्राउट्स बनवायचे असतील तर सोयाबीन तुमच्यासाठी उत्तम ठरेल. शाकाहारी लोकांसाठी ही डाळ सर्वोत्तम प्रोटीन फूड आहे, कारण ती चिकनपेक्षा जास्त प्रथिने समृद्ध आहे आणि त्यात चिकनपेक्षा कमी चरबी देखील आहे. वजन नियंत्रणासाठी, आपण आपल्या आहारात कावळा स्प्राउट्सचा समावेश करू शकता.

लोक प्रथिनांसाठी पीनट बटर खातात, परंतु बाजारात पीनट बटरमध्ये अस्वास्थ्यकर चरबी असते आणि बरेच संरक्षक देखील जोडले जातात, ज्यामुळे फायद्याऐवजी आरोग्यास हानी पोहोचू शकते. म्हणूनच, आपल्या आहारात शेंगदाणा स्प्राउट्सचा समावेश करणे हा एक चांगला पर्याय आहे.

तसे तर या चार गोष्टींचे स्प्राउट्स उच्च रक्तातील साखर असलेल्यांसाठी हानिकारक नसतात, पण याव्यतिरिक्त उच्च रक्तातील साखर असलेल्या मधुमेहाच्या रुग्णांनी आपल्या आहारात मेथीदाण्याचे स्प्राउट्स समाविष्ट केले तर ते त्यांच्यासाठी खूप फायदेशीर ठरते.

हिवाळ्यात बाजरीचे स्प्राउट्स आपल्या आहारात समाविष्ट केले जाऊ शकतात. हे एक गरम धान्य आहे आणि प्रथिने, फायबर आणि बऱ्याच पोषक तत्वांनी समृद्ध आहे. हे आतड्याचे आरोग्य सुधारते आणि वजन कमी करण्यास देखील मदत करते.

●●●●

## अशोकायन

### पतंगोत्सव

आनंदाने उडवा पतंग
उंच भरारीचे ठेवा उदिष्ट
एकमेकांचे पाय ओढणे
प्रथा आहे ना अनिष्ट ...

पतंगाचा आनंद घ्या पण
वापरू नका नायलोन मांजा

पशुपक्षी मानवांना इजा होणे
योग्य आहे का राजा?



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# डालमिया सिमेंटने सादर केली त्यांची आरसीएफ एक्स्पर्ट सिमेंट श्रेणी




**नागपूर, ९ जानेवारी :** भारतातील अग्रगण्य सिमेंट कंपनी असलेल्या डालमिया सिमेंट (भारत) लिमिटेडने, त्यांच्या रूफ, कॉलम, फाउंडेशन (आरसीएफ) एक्स्पर्ट या नवीन ब्रँड पोझिशनिंग अंतर्गत नवीन सिमेंट पोर्टफोलिओ सादर केले आहे. भारतातील महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये हे उत्पादन उपलब्ध होणार आहे. या श्रेणीतील प्रमुख उत्पादने, डालमिया डीएसपी आरसीएफ एक्स्पर्ट ++ आणि डालमिया सिमेंट (डीसी) आरसीएफ एक्स्पर्ट, यामध्ये प्रगत फॉर्म्युलेशन आणि अत्याधुनिक नॅनो बाँडिंग तंत्रज्ञान (एनबीटी) समाविष्ट आहे, जे आधुनिक बांधकामाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केले गेले आहे. आरसीएफ एक्स्पर्ट श्रेणी अधिक मजबूत ताकद, उत्कृष्ट गंज प्रतिकार आणि टिकाऊ बांधकामांची हमी देते, जी काळाच्या कसोटीवर टिकण्यासाठी तयार केली गेली आहेत. डालमिया सिमेंट (डीसी), ८० वर्षांहून अधिक विश्वासार्ह परंपरेसह, सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि सिद्ध विश्वासार्हतेसाठी ओळखला जातो, ज्यामुळे तो विविध बांधकाम गरजांसाठी पसंतीचा पर्याय बनतो. डालमिया डीएसपी आरसीएफ ++, या पोर्टफोलिओमधील प्रीमियम उत्पादनाला अल्टिमेट काँक्रीट एक्स्पर्ट म्हणून स्थान दिले गेले आहे. हे एनबीटी (नॅनो बॉन्डिंग टेक्नॉलॉजी) सह उच्च प्रतिक्रियाशील सिलिका आणि पोअर रिडक्शन टेक्नॉलॉजी (पीआरटी) एकत्र करते, ज्यामुळे रूफ, कॉलम आणि पाया मजबूत आणि टिकाऊ बनतो. डालमिया सिमेंटच्या आरसीएफ सल्लागारांच्या समर्पित टीमच्या सहाय्याने ग्राहकांना अचूक बांधकामासाठी मार्गदर्शन केले जाते.

या उत्पादन सादरीकरण कार्यक्रमांना देशभरातील ५०,००० हून अधिक चॅनल पार्टनर्सच्या विस्तृत नेटवर्कने पाठिंबा दिला. प्रमुख डीलर्स, कंत्राटदार आणि कारागिरांनी या कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. बांधकाम पद्धती सतत विकसित होत असताना, घर बांधणारे आता जलद सेटिंग वेळ, उत्कृष्ट कार्यक्षमता, आणि पर्यावरणीय आव्हानांना अधिक चांगल्या प्रकारे प्रतिकार करणाऱ्या वैशिष्ट्यांची मागणी करीत आहेत. या कार्यक्रमांमध्ये ऑन-ग्राउंड ॲक्टिव्हेशन्स आणि इंटरॅक्टिव्ह सत्रांद्वारे आरसीएफ एक्स्पर्ट श्रेणीची प्रगत वैशिष्ट्ये आणि उत्कृष्ट कार्यक्षमता अधोरेखित केली गेली. या कार्यक्रमांनी नवकल्पना आणि प्रगतीचा उत्सव साजरा केला, तसेच ताकद, विश्वासार्हता आणि कामगिरी यामध्ये नवीन उद्योगमानके निर्माण करण्यासाठी उपाययोजना प्रदान करण्याच्या डालमिया सिमेंटच्या वचनबद्धतेला बळकटी मिळाली. आरसीएफ स्ट्राँग तो घर स्ट्राँग या विश्वासाला पुढे नेत, कंपनी मजबूत आणि अधिक टिकाऊ घरे बांधण्याच्या दृष्टिकोनासाठी आपले योगदान देत आहे. पश्चिमेकडील भागात, कंपनीचे ४८८४ पेक्षा जास्त चॅनल पार्टनर्सचे मजबूत जाळे आहे. शाश्वत उपजीविका, कौशल्य विकास आणि पर्यावरणीय संवर्धनावर लक्ष केंद्रित करून कंपनीच्या सर्वसमावेशक समाज कल्याण उपक्रमांनी भारतातील बांधकाम क्षेत्रातील एक विश्वासार्ह भागीदार म्हणून डालमिया सिमेंटने आपली ओळख अधिक मजबूत केली आहे.

# बजाज तर्फे वाढत्या थंडीत उर्जा बचत करण्यास सक्षम अशा ५ नवीन वॉटर हिटर्सची सुरुवात

**मुंबई, ९ जानेवारी :** जसजशी थंडी वाढत जाते तसतसे विजेचे बिलही वाढू लागते, विशेष करुन तुमच्या शॉवरसाठी गरम पाण्याचा वापर वाढू लागतो. पण आता हा वाढता खर्च या मौसमात सुसह्य होणार आहे. बजाज तर्फे नवीन एनर्जी एफिशियंट वॉटर हीटर्स ची श्रेणी सुरु करण्यात येत असून तुमच्या खिशावर जास्त ताण न पाडता आता तुम्हाला अधिकची उब प्राप्त होणार आहे. अतिशय काळजीपूर्वक डिझाईन करण्यात आलेले बजाज वॉटर हिटर्स हे सातत्यपूर्ण आराम देण्यासह उर्जा बचत करुन तुमची ही थंडी उबदार करण्यासह बजेटसाठीही उत्तम करणार आहे.

मग तुम्ही अधिक काळासह गरम शॉवर किंवा उबदार पाणी पहात असाल तर ही मॉडेल्स तुमच्या वैविध्यपूर्ण गरजा पूर्ण करणार असून याकरता तुम्हाला टिकाऊपणा किंवा किफायती दरांशी तडजोड करण्याची गरज नाही. या मौसमात विचार करण्यासाठी सर्वोत्कृष्ट वॉटर हिटर्सची खालील मॉडेल्स योग्य आहेत.

बजाज इटर्नल सिरीज पेंटॅकल डिजी १५ लीटर: डिजिटल अचूकतेसह स्मार्ट वॉटर हिटर : दि पेंटॅकल डिजी हा केवळ बाहेर डिजिटल टेंम्परेचर कंट्रोलसह स्मार्ट नाही, तर हा आतूनही स्मार्ट आहे. यांतील महत्त्वाच्या वैशिष्ट्यांमध्ये ड्युराएस टँक, मरीन ग्रेड ग्लास लाईन कोटिंग ने युक्त असल्याने गंजण्यापासून मुक्ती मिळते, जेणेकरुन अनेक वर्ष विश्वसनीय कार्यक्षमता मिळते. ड्युरोकोट या नॉन स्टीक हिटिंग एलिमेंट मुळे कार्यक्षमतेने पाणी गरम होऊन स्केल जमा न होता अधिक उर्जेची बचत होण्यास मदत होते. तापमानाचे अचूक नियंत्रण हे ड्युराएनटीई या थर्मोस्टॅट मुळे मिळते आणि याबरोबर वापरण्यास सोपा रिमोट कंट्रोलही यांत उपबल्ध आहे. १५ लीटर आणि २५ लीटर या दोन क्षमतांसह तो रु १९२१०/- च्या सुरुवातीच्या किंमतीत उपलब्ध आहे.

बजाज शिल्ड सिरीज इम्मोर्टो स्टोअरेज वॉटर हिटर टिकाऊ कार्यक्षमता: इम्मोर्टो मधील टिकाऊ बांधकाम आणि कार्यक्षम हिटिंग एलिमेंट चे डिझाईन हे दीर्घकालीन कार्यक्षमता आणि उर्जा बचतीसाठी करण्यात आले आहे.




बजाज शिल्ड सिरीज क्रेस्ट प्लस वॉटर हिटर : प्रत्येक घराच्या कार्यक्षमतेसाठी गरजेचे : दि क्रेस्ट प्लस हे उत्पादन वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असे उत्पादन असून यांत कार्यक्षमता आणि सुरक्षा उपलब्ध आहे. या हिरोच्या वैशिष्ट्यांमध्ये डयुराएस टँक (१० वर्षांची वॉरंटी) आणि ड्युराकोट नॉन स्टिक हिटिंग एलिमेंट (६ वर्षांची वॉरंटी) यांमुळे टिकाऊपणा आणि कार्यक्षम हिटिंग मिळते.

# वी ॲप: सुविधा, मनोरंजन, खरेदी आणि अजून बरेच काही मिळवण्याचे वन-स्टॉप डेस्टिनेशन

आजच्या वेगवान जगामध्ये अखंडित कनेक्टिविटी, अत्यावश्यक सेवा तातडीने उपलब्ध होणे आणि मनोरंजनाचे परवडण्याजोगे पर्याय यांची मागणी सातत्याने वाढत आहे. वी चा वन-स्टॉप शॉप प्लॅटफॉर्म, वी ॲपने या सर्व मागण्या पूर्ण केल्या आहेत. वी ॲपवर तुम्ही तुमचे वी अकाउंटशी संबंधित सर्व कामे करू शकता, पण हे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. हे केवळ एक ॲप नाही तर तुमची पेमेंट्स, मनोरंजन आणि ई-कॉमर्सच्या गरजा, मागण्या सहजपणे पूर्ण करणारे सोल्युशन आहे. म्हणूनच आज लाखो ग्राहकांनी वी ॲपला त्यांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवले आहे.

एखाद्या मोक्याच्या प्रसंगी डेटा संपणे ही खूप मोठी अडचण बनू शकते. आपल्या युजर्सना या तणावाला सामोरे जावे लागू नये यासाठी वी ॲपवर आहेत 'अनलिमिटेड डेली डेटा पॅक्स' त्यामुळे डेटा कोटा संपलेला असताना आणि स्पीड्स ६४ केबीपीएसपेक्षा कमी असताना देखील रिचार्ज करणे सहजशक्य आहे. रिचार्ज करण्यासाठी वायफाय किंवा दुसऱ्यांकडून हॉटस्पॉट मागून घेण्याची गरज उरत नाही. स्पीड्स कमी असताना देखील ॲपच्या इमर्जन्सी ॲक्सेसमुळे रिचार्ज, पेमेंट करणे किंवा काही मदत मागणे अगदी सहजशक्य आहे.

वी ग्राहकांना वी ॲपवर काहीतरी अधिक जास्त मिळणे ही तर नेहमीचीच बाब आहे. ५७९ आणि ८५९ रुपयांच्या पॅक्सवर अतिरिक्त डेटा मिळणे असो किंवा ७९५ रुपयांच्या पॅकवर अतिरिक्त वैधता मिळणे असो किंवा इतर अनेक रिचार्जेसवर सरसकट सूट मिळणे असो, तुम्हाला अनेक विशेष ऑफर्स वी ॲपवर मिळत राहतात. वी ॲपवर केल्या जाणाऱ्या कोणत्याही रिचार्जवर कन्व्हिनियन्स फी द्यावी लागत नाही. इतकेच नव्हे तर, ॲन्युअल पॅक्ससोबत रिचार्ज करणाऱ्या वी युजर्सना १०० रुपयांपर्यंत विशेष सूट आणि ५० जीबी अतिरिक्त डेटाचा देखील आनंद मिळवता येतो.

अनेक वेगवेगळ्या व्यवहारांची पेमेंट्स करण्यासाठी वी ॲप हा सहजसोपा आणि अतिशय सुव्यवस्थित प्लॅटफॉर्म आहे, महत्त्वाचे म्हणजे याठिकाणी कन्व्हिनियन्स फी द्यावी लागत नाही. वीज बिल, पाईप गॅस, पाणी आणि ब्रॉडबॅन्ड बिले भरणे, डीटीएच व फास्टटॅग रिचार्ज करणे, एलपीजी सिलिंडर बुक करणे हे सर्व तुम्हाला या एकाच ॲपवर सहजशक्य आहे. या ॲपवर तुम्हाला मिळतात कर्ज परतफेडीचे अनेक वेगवेगळे पर्याय, त्यामुळे तुमच्या सर्व आर्थिक गरजा पूर्ण करणारे हे एक बहुउपयोगी टूल आहे.

तुमच्यासाठी योग्य क्रेडिट कार्ड शोधणे आणि त्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया वी मुळे सर्वात सोपी झाली आहे. वी ॲपमध्ये तुम्ही सर्व प्रमुख बँकांच्या क्रेडिट कार्ड ऑफर्सची नीट माहिती घेऊ शकाल. हे एक असे वन-स्टॉप सोल्युशन आहे जिथे तुम्ही वेगवेगळ्या पर्यायांमध्ये तुलना करून तुमच्या आर्थिक गरजा पूर्ण करू शकेल असे परफेक्ट क्रेडिट कार्ड निवडू शकाल. सर्वोत्तम कॅशबॅक रिवॉर्ड्स आणि खास भेटवस्तू व सुविधांचा आनंद देखील याठिकाणी तुम्हाला मिळवता येईल.

# टाटा प्ले तर्फे सिर्फ लगे महंगा मोहिमेची सुरुवात, प्रेक्षकांसाठी सुपर व्हॅल्यू टिव्ही पॅक्सची सुरुवात



**मुंबई, ९ जानेवारी :** टाटा प्ले या भारतातील आघाडीच्या डायरेक्ट टू होम (डीटीएच) सेवा प्रदाता कंपनी तर्फे आज या नवीन वर्षासाठी आणि सुगीच्या दिवसांसाठी विशेष अशी आधुनिक मोहिम सिर्फ लगे महंगा सुरु केल्याची घोषणा केली. परिवारातील प्रत्येक व्यक्तीच्या विशेष गरजा लक्षात घेऊन टाटा प्ले च्या मराठी सुपर व्हॅल्यू स्पोर्ट्स पॅकची निर्मिती ही संशोधनातून आणि बजेटनुसार आणि उच्च गुणवत्तेचा मनोरंजन अनुभव प्राप्त करुन देण्यासाठी करण्यात आली असून यांत जनरल एन्टरटेन्मेंट, बातम्या, स्पोर्ट्स, म्युझिक, मुव्हीज, डिव्होशनल, किड्स आणि अशा विविध चॅनल्सचा समावेश करण्यात आला आहे.

ओगिल्व्हीची संकल्पना असलेली सिफ लगे महंगा ही मोहिम असून यांत डीटीएच सेवा कशी महाग आहे हे खोटे ठरवणाऱ्या विविध फिल्म्सची विडंबनात्मक श्रृंखला तयार करण्यात आली आहे. या फिल्म्स दर्शवतात की कशा प्रकारे टाटा प्ले जागतिक स्तरावरील मनोरंजन हे परवडणाऱ्या दरात उपलब्ध करुन देतात आणि या फिल्म्स मध्ये विनोदी पध्दतीने प्रेक्षकांना अजोड अनुभव प्राप्त होतो. अतिशय महत्त्वाच्या क्षणी फिल्म मध्ये असे दर्शवण्यात आले आहे की ओरिजिनल शोधण्याचा आनंद आणि प्रिमियम मनोरंजन हे टेलिव्हिजनवरच उपलब्ध असते. देशभरांतील विविध भाषांतील प्रेक्षकां आकर्षित करण्यासाठी ही मोहिम विविध भाषांमध्ये तयार करण्यात आली आहे.

टाटा प्ले ने नेहमीच विविध भौगोलिक, स्तरीय, पदानुक्रमानुसार प्रेक्षकांना मुल्याआधारीत मनोरंजन उपलब्ध करुन देण्यावर भर दिला आहे.

दरमहा २९९ रुपयांपासून सुरु होणाऱ्या पॅक्स बरोबरच आता ग्राहक त्यांच्या गरजेनुसार पॅक हे टाटा प्ले च्या एचटीटीपीएस://डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.टाटाप्ले.कॉम / या वेबसाईटवर जाऊन किंवा टाटा प्ले मोबाईल ॲपच्या मॅनेज सेक्शनला भेट देऊन पॅक निवडू शकतील. ते त्यांच्या क्षेत्रातील जवळच्या डिलर कडे जाऊन सुध्दा ऑफर चा लाभ घेऊ शकतील.

# ॲमेझॉन एमक्स प्लेयरतर्फे चिडिया उड या नवीन क्राइम ड्रामाचे ट्रेलर लाँच



**मुंबई, ९ जानेवारी :** ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा ॲमेझॉन एमएक्स प्लेयरची आगामी क्राइम ड्रामा सीरीज चिडिया उडचे काउंटडाउन सुरू झाले आहे. ॲमेझॉनने या सीरीजचा अधिकृत ट्रेलर आज लाँच करत या त्यातल्या गुंतागुंतीच्या विश्वाची एक झलक सर्वांसमोर आणली. आबीद सुरती यांच्या चिडिया उड या गाजलेल्या कादंबरीवर आधारित असलेली ही सीरीज मुंबईच्या अंडरवर्ल्डवर आधारित असून त्यात सत्ता, गुन्हेगारी आणि अस्तित्वाची गोष्ट पाहायला मिळणार आहे. हर्मन बवेजा, विकी बाहरी यांची निर्मिती आणि रवी जाधव यांचे दिग्दर्शन असलेल्या या सीरीजमध्ये जॅकी श्रॉफ, भूमिका मीना, सिकंदर खेर, मधुर मित्तल, मयुर मोरे आणि मीता वसिष्ठ यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेंट प्रमुख आणि संचालक करण बेदी म्हणाले, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरमध्ये आम्ही प्रेक्षकांना उच्च दर्जाचे मनोरंजन उपलब्ध करण्यावर जास्त भर देतो. तगड्या स्टारकास्टचा समावेश असलेली चिडिया उड ही सीरीज मुंबईच्या कुख्यात गुन्हेगारी विश्वात एका स्त्रीच्या उदयाची गोष्ट सांगणारी आहे. ही सीरीज क्राइम ड्रामाची नवी व्याख्या तयार करणारी असून त्यात गुंतागुंतीच्या भावना, सत्ता संघर्ष आणि अस्तित्वासाठी दिलेला लढा पाहायला मिळणार आहे.


ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, चिडिया उड या सीरीजमध्ये आम्ही मुंबईच्या अंडरवर्ल्डचा धांडोळा घेतला आहे. त्याचं प्रखर वास्तव या सीरीजमध्ये पाहायला मिळणार आहे. ही सीरीज अस्तित्व आणि मानवी स्वभावाच्या गुंतागुंतीवर आधारित आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर अशाप्रकारची लक्षवेधी आणि प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी सीरीज उपलब्ध करून देताना आम्हाला आनंद होत आहे.

कादिर खान ही भूमिका साकारणारे जॅकी श्रॉफ म्हणाले, चिडिया उडमधलं विश्व वेगवेगळ्या वळणांनी भरलेलं आहे. हा अस्तित्वाचा लढा आहे आणि प्रत्येकाची अंतिम खेळीही. प्रत्येक व्यक्तीरेखा आपला वेगळा संघर्ष करत आहे. कादिरची भूमिका साकारणं आव्हानात्मक आणि तरीही समाधानकारक होतं. प्रेक्षकांना ही व्यक्तीरेखा नक्की आवडेल.

सेहरची भूमिका साकारणाऱ्या भूमिका मीना म्हणाल्या, सेहेरची भूमिका साकारण्याचा प्रवास असामान्य होता. ती लढाऊ वृत्तीची आणि भोवतालच्या कठोर वास्तवापुढे शरण न जाणारी आहे. या अक्षम्य जगात तिला येणारी आव्हानं जीव दडपून टाकणारी आहेत, मात्र तिची ताकद आणि निश्चय अटळ आहे. चिडिया उड ही अस्तित्वाची दमदार कहाणी आहे आणि मला आशा आहे, की सेहेरचा बाणा आणि तिनं केलेली निवड प्रेक्षकांचे मन जिंकून घेईल.

बवेजा स्टुडिओजची चिडिया उड ही सीरीज १५ जानेवारी पासून ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर मोफत स्ट्रीम केली जाणार आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेयर मोबाइल ॲप, ॲमेझॉन शॉपिंग ॲप, प्राइम व्हिडिओ, फायर टीव्ही आणि कनेक्टेड टीव्हीवर पाहाता येणार आहे.

# ईमामी सादर करत आहेत स्मार्ट ॲण्ड हँडसम



**कोलकाता, ९ जानेवारी :** ईमामी लि.ने अत्यंत अभिमानाने आपल्या फेअर ॲण्ड हँडसम या ब्रँडला नवी ओळख देत स्मार्ट ॲण्ड हँडसम असे रिब्रँडिंग केले आहे. बॉलिवुडचा हार्टथ्रॉब कार्तिक आर्यन आता या ब्रँडचे ॲम्बेसेडर असणार आहेत. जवळपास दोन दशके हा ब्रँड पुरुषांच्या ग्रूमिंग बाजारपेठेत नेतृत्वस्थानी आहे आणि हाच वारसा कायम राखत अधिक सर्वांगीण पद्धतीने ग्रूमिंगकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन अधोरेखित करत हे रिब्रँडिंग करण्यात आले आहे. ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेता आजच्या युगातील तरुण पुरुष त्वचेच्या आरोग्यावर आणि संपूर्ण वेलनेसवर भर देत आहेत आणि त्यांच्या अशा या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्मार्ट ॲण्ड हँडसम सज्ज आहे.

आजच्या उत्साही तरुण पुरुषांच्या विस्तृत ग्रूमिंग गरजांना पूर्ण करण्यासाठी आम्हाला मोठी संधी दिसत आहे. फेअर ॲण्ड हँडसमला स्मार्ट ॲण्ड हँडसम असे नव्या स्वरुपात सादर करणे हे ग्राहकांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर टाकलेले एक धोरणात्मक पाऊल आहे. यात आजच्या जगातील तरुण पुरुषांच्या नैसर्गिकरित्या आरोग्यदायी त्वचेवर भर देत वैयक्तिक आवड, बहूविधता आणि आत्मविश्वास या वर अधिक भर देण्यात आला आहे. आपल्या त्वचेला उत्तम बनवू शकतील आणि तो पोत कायम राखू शकतील असे विविध पर्याय आणि नव्या युगातील उत्पादने वापरणाऱ्या ग्राहकांची संख्या वाढत आहे. भविष्यात सादर होणारी अनेक आकर्षक उत्पादने आणि ब्रँडचा नवा चेहरा म्हणून कार्तिक आर्यन यांचा सहभाग यामुळे स्मार्ट ॲण्ड हँडसम ही नवी ओळख पुरुषांसाठीच्या ग्रूमिंग उत्पादनांच्या सातत्याने वाढणाऱ्या बाजारपेठेतील आमचे नेतृत्वस्थान अधिक बळकट करेल, असा विश्वास आम्हाला आहे, असे ईमामी लि.चे उपाध्यक्ष आणि कायमस्वरुपी संचालक मोहन गोएंका म्हणाले.

कार्तिक आर्यन यांनी या भागीदारीबद्दल आनंद व्यक्त करत म्हटले, स्मार्ट अँड हँडसमच्या चेहरयाच्या रूपात इमामी कुटुंबाचा भाग होण्यास मी खरोखर उत्सुक आहे. आजच्या काळात ग्रूमिंग म्हणजे केवळ दिसणे नसून, आत्मविश्वास, वैयक्तिकता आणि स्वतःला व्यक्त करण्याबद्दल आहे. पुरुषांना स्वतःमध्ये अधिक चांगले बदल घडवण्यास सक्षम करण्यासाठी आजच्या आधुनिक पुरुषांना परिणामकारक आणि सर्वसमावेशक पर्याय देण्याचे या ब्रँडचे सर्वंकष ग्रूमिंगचे तत्व मीही जपतो. या रोमांचक प्रवासाचा भाग होण्याची मला खूप अपेक्षा आहे.

# हिंदी दिवस: झी टीव्ही कलाकार आपल्या सर्वांना एकत्र आणणाऱ्या भाषेचा सन्मान करण्याविषयी बोलत आहेत

**मुंबई, ९ जानेवारी :** जागतिक हिंदी दिवस, ज्याला विश्व हिंदी दिवस असे देखील म्हणतात तो दरवर्षी १० जानेवारी रोजी साजरा केला जातो. हा दिवस त्या ऐतिहासिक प्रसंगाचे स्मरण करतो जेव्हा १९४९ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत पहिल्यांदा हिंदी भाषा बोलली गेली. जागतिक स्तरावर, मँडरीन चीनी आणि इंग्रजीनंतर हिंदी ही तिसरी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. तथापि, भारतात, हिंदी ही संवादासाठी सर्वाधिक वापरली जाणारी भाषा आहे. या खास दिवसाचा सन्मान करण्यासाठी आणि तो सेलिब्रेट करण्यासाठी, झी टीव्हीवरील कलाकार जाने अनजाने हम मिले मधील भरत अहलावत, भाग्य लक्ष्मी मधील रोहित सुचांति, बस इतना सा ख्वाब मधील योगेंद्र विक्रम सिंग, कुमकुम भाग्य मधील अब्रार काझी, कैसे मुझे तुम मिल गये मधील आकांक्षा पाल आणि वसुधा मधील अभिषेक शर्मा यांनी त्यांच्या जीवनातील या भाषेचे महत्त्व सांगितले.

झी टीव्हीच्या 'जाने अनजाने हम मिले' मध्ये राघवची भूमिका साकारणारा भरत अहलावत म्हणाला, एक अभिनेता म्हणून माझ्यासाठी भाषा ही सर्वात शक्तिशाली साधनांपैकी एक आहे, विशेषत: हिंदी, कारण ती मला माझ्या प्रेक्षकांशी जोडते, या भाषेने माझ्या बालपणाला, स्वप्नांना आणि मनोरंजन उद्योगातील माझ्या प्रवासाला आकार दिला. जागतिक हिंदी दिनानिमित्त, लाखो लोकांना जोडणाऱ्या, कालातीत कथा सांगणाऱ्या आणि प्रेरणा देणाऱ्या या भाषेचे सौंदर्य आणि समृद्धता साजरी करूया. संस्कृतीचा आत्मा जपून, आपण आपल्या या भाषेच्या वारशाचा आदर करतो आणि तिला जतन करतो आणि पुढील पिढीला हिंदीचा अभिमान बाळगण्यासाठी आणि तिची जादू जिवंत ठेवण्यासाठी प्रेरणा देतो!

झी टीव्हीवरील भाग्य लक्ष्मीमध्ये ऋषीची भूमिका साकारणारा रोहित सुचांति म्हणाला, हिंदी माझ्यासाठी फक्त एक भाषा नाही, ती माझ्या भावना, माझी कला आणि माझ्या मुळांचा आवाज आहे. एक अभिनेता म्हणून जगभरातील प्रेक्षकांशी जोडण्याचा विशेषाधिकार मला या माध्यमाद्वारे मिळाला आहे. जागतिक हिंदी दिनानिमित्त, मला ही सुंदर भाषा साजरी करताना मला अभिमान वाटतो. या भाषेने आपल्याला खूप काही दिले आहे. पुढील पिढ्यांसाठी हिंदीचा वारसा उजळण्यासाठी तिचे संगोपन आणि संवर्धन करूया.

झी टीव्हीच्या बस इतना सा ख्वाबमध्ये शिखरची भूमिका साकारणारा योगेंद्र विक्रम सिंग म्हणाला, या जागतिक हिंदी दिनानिमित्त, मी आपल्या भाषेच्या अविश्वसनीय प्रवासावर विचार करत आहे. ही आता केवळ संवादाचे साधन राहिलेले नाही; तर ही सांस्कृतिक पद्धतीने जगभरातील लाखो लोकांना एकत्र करते. आपल्या मालिका आणि कथांद्वारे, हिंदीने जगभरातील घरांमध्ये प्रवेश केला आहे, अडथळे पार केले आहेत आणि हृदये जोडली आहेत.


Bhondekar Education Society

## POOJA NURSING COLLEGE

Kisan Chowk, Bank Colony, Sahakar Nagar,
Bhandara - 441904
Mob. No. 9404182966, 7391045395
Email Add. poojanursinginstitute@gmail.com
Website. www.poojanursing.com

**WANTED**

Application are invited in the prescribed format from the eligible candidates for the following posts :-

**Professor - 02**
(Medical Surgical Nursing-01 Open,
Mental Health Nursing-01 Open)

**Associate Professor - 06**
(Medical Surgical Nursing - Open 01
Community Health Nursing Open -01
Child Health Nursing Open -01
Obstetric Nursing- Open 01
Mental Health Nursing- Open 01-, SC-01)

**Assistant Professor/Lecturer - 09**
(Medical Surgical Nursing - VJNT-01, Open 01
Community Health Nursing SC-01, VJNT-01
Child Health Nursing Open -01
Obstetric Nursing- SC-01, VJNT- 01
Mental Health Nursing- SC 01, VJNT - 01)


**Tutor / Clinical Instructor - 23**
(SC-03, ST-02, VJNT-04, OBC-02,
SEBC-03, EWS-03, OPEN-06)

Requisite Qualification, Experience, Other details and prescribed application format are available on University Website: www.muhs.ac.in

**Last date of application is 16/01/2025**

Secretory
Pooja Nursing College, Bhandara


# शब्दकोडे क्रमांक २०११



**आडवे शब्द :-**
१) वयोवृद्ध
४) अवधान
६) कानाजवळचा भाग
९) मऊ
११) गवंडी
१२) रम्य
१३) हिंमत, धैर्य
१५) घर
१७) मंदिर
१८अ) एक ज्वालाग्रही पदार्थ
१९) सुंदर शरीरची ठेवण, बांधा इ
२१) रतिचा पती
२४) बारा वर्षांचा काळ
२६) परस्पर
२९) बारीक झणझण
३०) उद्याच्या नंतरचा दिवस
३२) पोळी भाजण्याचे पात्र
३४) तृण
३६) बारीकसारीक
३९) कापसाची बी
४१) प्रामाणिक
४२) पदार्थाचा सूक्ष्म भाग
४३) तमाशातील नाट्य
४५) प्रारब्ध देवता
४६) कमळ
४८) बेचव
५०) उद्यान
५२) दात
५२) पद्धत
५३) विरोध
५५) लक्ष्मीचे एक नाव
५७) हत्तीवर बसण्याची सुशोभित बैठक
५९) प्रसार करणारा
६१) मस्त स्त्री
६३) दक्षतेचा इशारा
६५) वार्ताहर
६७) हाकेला दिलेले उत्तर
६८) पत्रातील साष्टांग नमस्कार
७०) व्यक्ती
७२) च्या बरोबर
७३) दुष्ट माणूस
७७) जोड
७८) रात्रभर
७९) घाबरणे
८०) एक रंगीत कंदमूळ

**उभे शब्द:-**
२) चांदणी
३) राजकारभाराचे शहर
४) वजन
५) वंदन
६) कायद्याप्रमाणे
७) गार
८) वधू-वर
९) रसवान
१०) अंत:करण
१४) मांडी, आकडा बांबू
१६) मृत
१८) काळदेवता
२०) सुसर
२२) किंमत
२३) इंद्रिय, घटक
२५) पडणे
२७) हिस्सा, वाटा
२८) समुद्रातील तांबड्या रंगाचा मासा
३०) घागरा
३१) एक द्विदल धान्य,
३३) दिवस
३५) कोल्ह्यासारखा एक जंगली श्वापद
३७) सोने
३८) लोणी
४०) किडा
४१) शिर्डीचे संत
४४) मगज
४६) प्रधानमंत्री
४७) विष
४९) दरबारातील मानकरी
५१) निर्धन
५४) गावाखालची जमीन
५६) सामान
५८) येशू ख्रिस्त
५९) खार--एक प्राणी
६०) लहान
६१) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
६२) वर्षानुवर्षे
६४) वस्ती
६६) पुत्र, मुलगा
६९) अब्रू
७१) काळोख
७२) सरळ वासा
७३) गाढव
७४) साठी बुद्धी **
७५) कापणे (इं.)
७६) पिशाचासाठी ठेवलेले अन्न
७७) संध्याकाळ

(उत्तर उद्याच्या अंकात)


## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# 'त्या' प्रकरणी पोलिसांची भूमिका संशयास्पद

## संजय रायमूलकर यांचा आरोप, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार

**महासागर प्रतिनिधी,**
**मेहकर, दि. ९ :** पैशांचा पाऊस पाडणाऱ्या पाच संशयित आरोपींसह चिल्ड्रन्स मनी बँकेच्या नोटा व तेलंगणातील गाडी बिबी पोलिसांनी पकडली होती. त्यानंतर आपण तपास करू इच्छित असल्याचे उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांना सांगून मेहकर पोलिसांनी हे प्रकरण वर्ग करून घेतले. परंतु, दि. ३० डिसेंबरच्या या प्रकाराबाबत मेहकर पोलिसांनी गुन्हा दाखल न करता दि. ३१ डिसेंबर रोजी रात्री उशिरा प्रतिबंधक कारवाई करून प्रकरणाची दिशा बदलली. त्यामुळे हा सर्व प्रकार संशयास्पद आहे, असा आरोप माजी आमदार संजय रायमूलकर यांनी केला आहे.



बिबी पोलिसांनी चिखला ग्रामस्थांच्या मदतीने पैशांचा पाऊस पाडणाऱ्या पाच संशयित आरोपींसह मुलांच्या खेळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या चिल्ड्रन्स मनी बँकेच्या नोटा व तेलंगणातील गाडी ताब्यात घेतली.

यापूर्वीही घडल्या घटना पैशांचा पाऊस पाडणाऱ्या टोळीने नागरिकांना गंडा घालून लाखो रुपयांची लूट केल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत.

एका प्रकरणात दि. २३ जून २०२४ रोजी दिलीप भिकाजी इंगळे बेपत्ता झाल्याची जानेफळ पोलिसांत तक्रार दाखल केली होती. दि. १० जुलै २०२४ रोजी त्याचा खून झाल्याचे उघडकीस आले . त्या प्रकरणातही चिल्ड्रन्स मनी बँकेच्या नोटा आढळून आल्या होत्या. मेहकरमधील कंचनी महालाजवळ मुंबईच्या व्यापाऱ्याला पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवून चाकूचा धाक दाखवून लूटमार करून आरोपी फरार झाले होते.

असे अनेक प्रकार घडले असताना दि. ३० डिसेंबर रोजी घडलेल्या या प्रकरणाची कसून चौकशी होणे अपेक्षित होते. परंतु, संशयितांवर केवळ प्रतिबंधक कारवाई केल्याने पोलिसांची भूमिका संशयास्पद दिसत आहे.

# वाळू माफियांवर महसूलची कारवाई

## दोन ट्रॅक्टर जप्त

**महासागर प्रतिनिधी,**
**संग्रामपूर, दि. ९ :** तालुक्यातील देऊळगाव येथील पूर्णा नदीपात्रातून बाहेर जिल्ह्यात वाळूची अवैध वाहतूक करणारे दोन ट्रक्टर तहसीलदार यांच्या पथकाने पकडले. तसेच यावेळी फरार झालेल्या वाहनावर तामगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



५ जानेवारी रोजी नायब तहसीलदार सुनील जूनगडे व राहुल इंगळे यांना मिळालेल्या माहिती वरून पातुर्डा येथे गेले असता तेथे त्यांना अवैध वाळूने भरलेले विना नंबरचे टिप्पर आढळून आले. पथकाला पाहताच टिप्पर चालकाने वाहन सोडून तेथून पळ काढला. दहा मिनिटांनी परत आल्यानंतर त्यास वाहन पोलिस ठाण्यात लावण्याचे सांगण्यात आले असता तो वरवट कडे वाहन घेऊन निघाला. त्या वाहनाचा पाठलाग करत असताना दोन ब्रास अवैध वाळूने भरलेले वाहन घेऊन टिप्पर चालकाने पोबारा केला. ७ जानेवारी रोजी तहसीलदार प्रशांत पाटील यांनी कारवाईला सुरुवात केली. यावेळी त्यांना सकाळी अकरा वाजता देऊळगाव पूर्णा नदी पात्रात दोन ट्रक्टर विना परवाना वाळूची वाहतूक करताना आढळून आले. यावेळी तहसीलदार पाटील यांनी ट्रॅक्टर चालकास विचारपूस केली असता त्याच्याकडे वाहतुक परवाना आढळून आला नाही. वाहन सतीश परघरमोर रा. देऊळगाव यांच्या मालकीचे होते. तर दुसरे ट्रॅक्टर सुभाष पोहरे रा.उरळ जि. अकोला यांच्या मालकीचे होते. . ही कारवाई तहसीलदार प्रशांत पाटील, रवींद्र बोराखडे मंडळ अधिकारी बावनबीर, ग्राम महसूल अधिकारी सुनील कुसळकर, प्रदीप नलावडे यांनी केली आहे.

# मोझरीच्या सरस्वती मंदिरात अच्युत महाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव



**तिवसा:** तालुक्यातील गुरुकुंज मोझरी येथील दासटेकडीवर स्थापित असलेल्या सरस्वती मंदिरात श्री संत अच्युत महाराज यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाला मंगळवारी (दि. ८) सकाळी तिर्थस्थापनेने प्रारंभ झाला. भक्तिमय वातावरणात जनार्दनपंत बोथे गुरुजी यांचे हस्ते श्रींचा अभिषेक करण्यात आला. महोत्सवादरम्यान सकाळी सात वाजता रामधून काढण्यात आली. त्यानंतर दादासाहेब टोपले यांचा स्तवनामृत ग्रंथ पारायण वाचनाचा कार्यक्रम पार पडला. दुपारी एक वाजता ग्रामगीताचार्य रायजीप्रभु शेलोटकर यांचा शिवमहापुराण कथेचा कार्यक्रम झाला. रविवारपर्यंत (दि. १२) विविध कार्यक्रमानी संत अच्युत महाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव साजरा होणार आहे. जास्तीत जास्त भाविकांनी कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजन समितीचे डॉ. ठोसर, डॉ. विजय देवळे आदींनी केले असून भाविकांसाठी ये-जा करण्यासाठी वाहन व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

# स्फोटकापेक्षा पत्रकारांची लेखणी जहाल

## सिद्धांत सागर महाराज यांचे प्रतिपादन

**महासागर प्रतिनिधी,**
**शिरपूर , दि. ९ :** शिरपूर स्फोटकापेक्षाही पत्रकारांची लेखणी ही जहाल आहे. असे प्रतिपादन दि.६ जानेवारी रोजी प.पु. ऐलक श्री १०५ सिद्धांत सागर महाराज यांनी केले. मराठी पत्रकार दिनानिमित्त स्थानिक निकलंक निकेतन भवन येथे दिगंबर सर्वपयोगी न्यास ट्रस्ट व शिरपूर येथील दिगंबर जैन समाजाच्या वतीने शिरपूर व मालेगाव येथील पत्रकारांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी मंचावर ऐलक श्री १०५ सिद्धांत सागर महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात पत्रकारांच्या लेखणीने क्रांती घडवून आनली होती. मोठमोठ्या सत्तेला पत्रकारांची लेखणी हादरा देऊ शकते. सध्याच्या इंटरनेटच्या युगातील पत्रकारितेचे महत्व त्यांनी अनेक दाखले देऊन स्पष्ट केले. लोकशाहीचा चौथा स्तंभ लोकशाहीच्या बळकटीकरनासाठी



अहोरात्र प्रयत्न करत असतो, असे त्यांनी सांगितले. प्रा अरविंद गाभणे, यशवंत हिवराळे, शिवाजीराव खडसे , कैलास भालेराव, सुभाषराव देशमुख, नंदकिशोर उल्हामाले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी भूषण महाजन, निशिकांत महाजन, आकाश महाजन, जितेंद्र काळे, रितेश महाजन, संजय कान्हेड, दिलीप विश्वमभर, राजाभाऊ देशमुख, नंदूकाका देशमुख, महेश बाबाजी, वसंतराव देशमुख, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उल्लेखनिय कार्य करणाऱ्या पत्रकारांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती. पत्रकारांचा सन्मान सोहळ्यात उपस्थित मान्यवर मंडळी. पत्रकार दिनाच्या निमित यांचा सत्कार कचरूलाल मुंदडा, विठलं भागवत, अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे शिरपूर अध्यक्ष गजानन देशमुख, शशिकांत देशमुख, गोपाल वाढे, कपिल भालेराव, किशोर जाधव, जावेद भवानीवाले, राजू यादव याचा सन्मान करण्यात आला.

# भरदिवसा घरफोडी करणाऱ्या तिघांना अटक

## आरोपींत महिलेचा समावेश

**महासागर प्रतिनिधी,**
**लोणार, दि. ९ :** भरदिवसा घरफोडी करून ६३ हजार रुपयांचा ऐवज पळवणाऱ्या तिघांना लोणार पोलिसांनी मंगळवार, दि. ७ जानेवारी रोजी अटक केली. यामध्ये दोन पुरुषांसह एका महिलेचा समावेश आहे. शहरातील खटकेश्वर नगरातील अनिल हिंमतराव कायंदे यांनी दि. २३ डिसेंबर रोजी लोणार पोलिस ठाण्यात घरफोडीप्रकरणी फिर्याद दिली होती.

शिक्षक असलेले कायंदे पती - पत्नी दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास शाळेत गेले होते. सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घरी परतले असता त्यांना दाराचा कडीकोंडा तोडून वरच्या मजल्यावरील बेडरुम मधील कपाटाचे कुलूप तोडल्याचे दिसले. कपाटातील साहित्य अस्ताव्यस्त फेकून कपाटातील सोन्याचे झुंबर व १० हजार रुपये रोख असा एकूण ६३ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी पळवल्याचे निदर्शनास आले. या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

टाऊन बिट अंमलदार संतोष चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी कायंदे यांच्या घरी काम करणारी नसिम ऊर्फ फरजानबी शेख जाकिर (वय ३६, रा. गौसिया नगर, लोणार) ही महिला आणि शेजाऱ्यांकडे चौकशी केली. यावेळी नसिम ऊर्फ फरजानबी शेख जाकिर ही संशयास्पद वाटल्याने तिच्याबाबत माहिती काढून व तांत्रिक तपासाचे सहकार्य घेतल्यानंतर तिच्यावरील संशय अधिक बळावला. त्यामुळे तिला ताब्यात घेऊन पोलिसांनी कसून चौकशी केली. त्यावेळी तिने तिचे दोन भाऊ शेख वसीम शेख कादीर




(वय ३४) व शेख हसीन शेख गुलाम (वय ४२, दोघेही रा. गौसिया नगर, लोणार) यांच्या मदतीने ही घरफोडी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी मंगळवारी या तिन्ही आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून चोरीस गेलेला एकूण ६३ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला.

पोलिस निरीक्षक निमिष मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनात टाऊन बिट अंमलदार संतोष चव्हाण, नाईक पोलिस कॉंस्टेबल संजय जाधव, पोलिस कॉंस्टेबल अनिल शिंदे, ज्ञानेश्वर निकस व गजानन डोईफोडे यांनी ही कारवाई केली. नाईक पोलिस कॉंस्टेबल राजू आडवे व पोलिस कॉंस्टेबल ऋषिकेश खंडेराव यांनी तांत्रिक साहाय्य केले.

# आंतरराष्ट्रीय स्तरावरील माँ जिजाऊ जन्मोत्सवाचे १२ जानेवारीला आयोजन



## जिजाऊ सृष्टी येथे विविध कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी,**
**सिंदखेडराजा , दि. ९ :** मराठा सेवा संघाच्या वतीने जिजाऊ सृष्टी येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील ४२७ व्या जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याचे दि. १२ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले आहे. या भव्य सोहळ्यात देशातील व जगभरातील जिजाऊ भक्त व शिवप्रेमी लाखोंच्या संख्येने सहभागी होणार आहेत, अशी माहिती मराठा सेवा संघाचे जिल्हा कार्यकारिणी सल्लागार ?ड. राजेंद्र ठोसरे यांनी आज, दि. ८ जानेवारी रोजी पत्रकार परिषदेत दिली.

या सोहळ्याची सुरुवात दि. ३ ते १२ जानेवारीपर्यंत आयोजित सावित्री जिजाऊ दशरात्रोत्सवाने झाली. या उत्सवाचे उद्घाटन दि. ३ जानेवारी रोजी झाले. दि. ११ जानेवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे बक्षीस वितरण होणार आहे. सायंकाळी ५ वाजता जिजाऊ जन्मस्थळ लखुजीराजे जाधव यांच्या राजवाड्यावर जिजाऊ ब्रिगेडने दीपोत्सव आयोजित केला आहे. या कार्यक्रमात शहरातील सर्व घरांतून माता भगिनी दिवे आणून राजवाड्यावर तेवत ठेवणार आहेत. त्यानंतर ५.३० वाजता ४२७ मशालींसह मशाल यात्रा निघणार आहे. रात्री ८.३० वाजता जिजाऊ सृष्टी येथे जिजाऊ ब्रिगेडचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती राजेंद्र ठोसरे यांनी दिली.

दि. १२ जानेवारी रोजी मुख्य जन्मोत्सव सोहळ्याची सुरुवात सकाळी ६ वाजता राजवाड्यातील जन्मस्थळ येथे मराठा सेवा संघाच्या प्रमुख जोडप्यांच्या हस्ते महापूजेने होईल. ७ वाजता वारकरी दिंडी सोहळा होणार असून, जन्मस्थळ राजवाडा ते जिजाऊ सृष्टी अशा भव्य पालखीसह निघणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील अनेक वारकरी दिंड्यांचा सहभाग असेल. ९ वाजता जिजाऊ सृष्टी येथे शिवधर्म ध्वजारोहण होईल. ९ ते ११ शाहिरांचे पोवाडे या सत्रात महाराष्ट्र ातील नामवंत शाहीर आपल्या संचासह पोवाडे सादर करतील. ११ ते १.३० वाजेपर्यंत जिजाऊ सृष्टी हॉल येथे नवोदित वक्ते व नवोदित कलाकारांचा सांस्कृतिक कार्यक्रम, विविध क्षेत्रात कामगिरी केलेल्यांचा विशेष सत्कार, प्रकाशन सोहळा व नोंदणी केलेल्या जोडप्यांचा सामूहिक शिवविवाह सोहळा होईल, असे डॉ. ठोसरे यांनी सांगितले.

मुख्य कार्यक्रम दुपारी २ ते ५ यावेळी होणार आहे. डॉ. पुरुषोत्तम खेडेकर यांचा अमृत महोत्सव अभिष्टचिंतन सोहळा शिवधर्म पीठ येथे होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. विजयकुमार घोगरे राहणार असून, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते हा सोहळा होईल. जिल्ह्यातील सर्व आजी - माजी लोकप्रतिनिधी, मराठा सेवा संघाचे व ३२ कक्षांचे केंद्रीय कार्यकारिणीचे व राज्य कार्यकारिणीचे प्रमुख पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रमुख उपस्थिती राहणार आहे. समारोपीय मार्गदर्शन डॉ. पुरुषोत्तम खेडेकर करणार आहेत, असेही डॉ. ठोसरे यांनी सांगितले.

जन्मोत्सव सोहळ्यासाठी विविध निवासस्थाने, वाहनतळे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच ४०० बुक स्टॉल, १०० भोजन स्टॉल उभारण्यात आले आहेत. शेतकऱ्यांसाठी विठ्ठलराव विखे पाटील कृषी दालन उभारण्यात आले आहे. दि. १३ जानेवारी रोजी संत चोखामेळा जन्मोत्सवा निमित्त मेहुणाराजा येथे सायंकाळी ७.३० वाजता ज्योती जाधव यांचे किर्तन होणार आहे. दि. १४ जानेवारी रोजी संत चोखामेळा महाराज जन्मोत्सवानिमित्त सकाळी ८ वाजता महापूजा करून जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याचा समारोप होईल.

या वेळी जिजाऊ जन्मोत्सव सोहळा समन्वयक सुभाषराव कोल्हे, मराठा सेवा संघ जिल्हा सचिव सचिन तायडे, रविकांत काळवाघे, जिल्हाध्यक्ष अनिल आकाळ, रवींद्र चेके, ज्योती जाधव, डॉ. ऊर्मिला हाडे, प्रा. मधुकर गव्हाड, सुखदेव बुरकुल, सागर खांडेभराड, धनंजय पाटील, संजय धोरणे आदींची उपस्थिती होती.

# रक्तदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## रक्तदान ही सर्व श्रेष्ठ दान

**महासागर प्रतिनिधी,**
**वर्धा, दि. ९ :** रक्तदान ही सर्व श्रेष्ठ दान आहे, वाहनचालक भरधाव वेगाने वाहन चालवून मृत्यूमुखी पडतात. अशा वेळी रस्त्यावर रक्ताचा सडा बघायला मिळतो. रक्त रस्त्यांवर वाया घालवण्यापेक्षा गरजवंतांना रक्तदान करावे असे आवाहन आरटीओ स्नेहा मेढे यांनी केले. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन ३६ वा रस्ता सुरक्षा अभियान प्रशासकीय इमारतीच्या आवारात आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.



वाहन चालकांनी नेत्र तपासणी करुनच वाहन चालवावे, त्यामुळे अपघाताला नक्कीच आळा बसेल असे मत नेत्र तपासणी व रक्तदान शिबिरात स्नेहा मेढे यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी ४० नागरिकांनी राक्तदान केले, तर ९७ नागरिकांनी नेत्र तपासणी करुन घेतली. सामान्य नागरिकांना रक्तदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले, तसेच रस्ता रस्त्यावरील अपघातांचे प्रकार याविषयी माहिती देण्यात आली.

यावेळी उप प्रादेशिक परिवहन सहायक प्रभारी अधिकारी मेघल अनासाने, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ विभागाचे नियंत्रक प्रतापसिंह राठोड, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या डॉ शिवली कलोडे, वाहतूक पोलीस निरीक्षक देवानंद पाटील, जिल्हा शल्य नेत्र चिकित्सक डॉ प्रीती परळकर तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथील मोटर वाहन निरीक्षक प्रफुल्ल मेश्राम, संदीप मुखे, अजय चौधरी, साधना कावळे व सहायक मोटर वाहन निरीक्षक विशाल भगत, अक्षय मालवे, आदित्य ठोक, अमर पखान, राहुल ढोबळे व सर्व ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक यांच्यासह आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांनी हजेरी लावली होती.

# कार्यालय नगर परिषद सावनेर जिल्हा नागपुर

क्रमांक-नपसा/स्वा.वि./नि.सू./११८/२०२५ दिनांक :- ०९/०१/२०२५

## निविदा सूचना

मा. मुख्याधिकारी, नगर परिषद सावनेर, जिल्हा नागपूर यांचे वतीने खालील कामाच्या बी-१ दोन लिफाफा पद्धतीने स्वास्थविभागा करिता खालील कामा संबंधित कंत्राटदारांकडून/पुरवठा धारकांकडून निविदा दर मागविण्यात येत आहे. सदर कामाच्या निविदा दि. १०/०१/२०२५ ला सकाळी ११.०० वाजता पासून ते दि. २०/०१/२०२५ ला दुपारी ०२.०० वाजेपर्यंत त्यांचा कालावधीत कामाचे सीलबंद लिफाफ्यात या कार्यालयात सादर करावयाचा आहेत. कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे. सदर कामाचे निविदा पत्रक दि २०/०१/२०२५ पासून ते दि. २०/०१/२०२५ पर्यंत सबंधित कार्यालयातून प्राप्त करता येईल. कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय किंमत | निविदा प्रपत्र | अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | Proposed Artistic Wall painting work At. Buddha vihar and Adiwasi hostel In Prabhag no.10, At Saoner nagr parishad | ३०६३२६/- | ५००/- | ३०००/- | कार्यादेश मिळाल्यापासून १ महिन्यापर्यंत |

**अटी व शर्ती :-**

१) शक्य झाल्यास प्राप्त निविदा त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता निविदाधारकांना समक्ष उघडण्यात येईल.
२) कोणती एक अथवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्याधिकारी यांना राहतील.
३) निविदा संबंधित इत्तर सर्व अटी व शर्ती कार्यालयीन वेळेस पहावयास मिळेल.

मुख्याधिकारी
नगर परिषद सावनेर


## Change Of Name

MY OLD NAME WAS **NAIM ULLAH KHAN KHAN.** NOW MY NEW NAME IS **NAYEEMULLAH KHAN AHMAD KHAN.**
**ADD** : SHILODA SUKODA AKOLA MH 444006

MY OLD NAME WAS **NIKITA MANKAR.** NOW MY NEW NAME IS **NIKITA RAVINDRA MANKAR.**
**ADD** : P. NO. 151 AT POST KHAIRY KAMPTEE ROAD , NAGPUR - 441001

MY OLD NAME WAS **SHEIKH AYAN.** NOW MY NEW NAME IS **AYAN ZAKIR SHEIKH.**
**ADD** : FLAT NO-102, OM SAI APARTMENT, JAITALA BAZAR ROAD, TRISHARAN LAYOUT, TAKLI SEEM, NAGPUR 440036

MY OLD NAME WAS **NUSRAT.** NOW MY NEW NAME IS **NUSRAT JABEEN ZAKIR SHEIKH.**
**ADD** : FLAT NO-102, OM SAI APARTMENT, JAITALA BAZAR ROAD, TRISHARAN LAYOUT, TAKLI SEEM, NAGPUR 440036

MY OLD NAME WAS **DHIRAJKUMAR VITHALRAO DHOKE.** NOW MY NEW NAME IS **DHIRAJ VITTHALRAO DHOKE.**
**ADD** : PLOT NO.146,SUYOG NAGAR, NEAR MAHATMA FULE GARDEN NAGPUR - 440015

MY OLD NAME WAS **WAGHMARE SWEETI BABAN.** NOW MY NEW NAME IS **SWEETY SURAJ SANKADE.**
**ADD:** WARD NO. 2, AT POST, PATANSAONGI SAONER NAGPUR 441113

MY OLD NAME WAS **SURAINA MISABA.** NOW MY NEW NAME IS **SURAINA MISBAH.**
**ADD:** H.NO.622,BUDDHU KHAN MINARA GANDHIBAGH NAGPUR 440032

MY OLD NAME WAS **MOZYNA KARIN.** NOW MY NEW NAME IS **MOZYNA KAREEN.**
**ADD:** H.NO.622,BUDDHU KHAN MINARA GANDHIBAGH NAGPUR 440032

MY OLD NAME WAS **MOHAMMAD HARIS KARNAIN.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD HAARISH KARNAIN.**
**ADD:** H.NO.622,BUDDHU KHAN MINARA GANDHIBAGH NAGPUR 440032

MY PASSPORT NO. **A6884155** IS MY INCORRECT GIVEN NAME WAS **SYED RASHID ALI** AND SURNAME WAS **WAJAIDA TABASSUM.** NOW MY CORRECT NAME IS **WAJIDA TABASSUM SYED RASHID ALI**
**ADD:** BYPASS THREE BUNGLOW, GANGA NAGAR, AKOLA MS 444002

MY OLD NAME WAS **SAMINA KHANAM KASSIM MIYA.** NOW MY NEW NAME IS **SAMINA KHANAM KASSIM MIYA SHEIKH.**
**ADD:** 17- GF, SADIQABAD COLONY, NEAR PASSPORT OFFICE, MANKAPUR,NAGPUR 440030. MS

MY OLD NAME WAS **MAKBUL AHMAD SHEIKH MOHAMMAD / MAQBOOL PEHALWAN QURESHI.** NOW MY NEW NAME IS **MAKBUL AHMAD QURESHI.**
**ADD:** NEAR CHOUDHARI MASJID, BHAJI MANDI, KAMPTEE, NAGPUR 441002

MY OLD NAME WAS **MOHANLAL MADHAVJI MANGE.** NOW MY NEW NAME IS **MOHAN MADHAVJI BHANUSHALI.**
**ADD:** PLOT NO . 371, NEAR JAIN MANDIR, TULSI NAGAR, SHANTI NAGAR, NAGPUR 440002

MY OLD NAME WAS **NATTHU TUMSARE.** NOW MY NEW NAME IS **NATTHUJI TUMSARE.**
**ADD:** NEHRU WARD KHAPA TAL TUMSAR DIST BHANDARA

MY OLD NAME WAS **TIRA BHAURAO TUMSARE.** NOW MY NEW NAME IS **TIRABAI BHAURAO TUMSARE.**
**ADD:** NEHRU WARD KHAPA TAL TUMSAR DIST BHANDARA

MY OLD NAME WAS **RAMSING PARIHAR.** NOW MY NEW NAME IS **RAMSINGH PARIHAR.**
**ADD:** BOSE NAGAR TUMSAR

MY OLD NAME WAS **NILIMA VIKAS PARIHAR.** NOW MY NEW NAME IS **NEELIMA VIKAS PARIHAR.**
**ADD:** BOSE NAGAR TUMSAR

MY OLD NAME WAS **QAISAR ANJUM HABEEB KHAN.** NOW MY NEW NAME IS **KAUSAR ANJUM MOHAMMAD HANEEF KHAN.**
**ADD:** BHALDARPURA NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **SARWARI.** NOW MY NEW NAME IS **SARVARI BANO.**
**ADD:** BEHIND SUNIL HOTEL SATRANJIPURA NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **AKLUNNISA GHAISUDDIN.** NOW MY NEW NAME IS **AKILUNNISA GYASUDDIN ANSARI.**
**ADD:** PLOT NO 259, SANGHARSH NAGAR, PILE NADE, NAGPUR - 440026


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# अस्मिता

## ठुमका लगाके...

ढिनचॅक गाण्यांवर नाचायला प्रत्येकालाच आवडतं. ठेक्याच्या गाण्यांवर आपले पाय आपोआपच थिरकू लागतात. त्यातंच ते एखादं ट्रेंडी धम्माल हिंदी गाणं असेल तर बघायलाच नको. आपण बॉलिवूड डान्स आवड म्हणून शिकत असलो तरी फिटनेसच्या दृष्टीनंही त्याचे अनेक फायदे आहेत. म्हणूनच बॉलिवूडच्या गाण्यांवर थिरकण्याचं प्रमाण जगभरातच वाढलंय. टाकू या एक नजर बॉलिवूड डान्समुळे होणाऱ्या फायद्यांवर...

फिटनेस फंडा


✻ बॉलिवूड डान्समध्ये संगीताच्या तालावर लयबद्ध हालचाली कराव्या लागतात. सुरूवातीला आपण चुकतो. पण पुरेशा सरावानंतर आपल्या शरीराच्या हालचाली ठेक्यानुसार होऊ लागतात. यामुळे आपल्या शरीरात उपजत असलेली समतोल साधण्याची आणि समन्वयाची क्षमता वाढीस लागते.

✻ बॉलिवूड डान्स करताना प्रचंड उर्जेची गरज लागते. त्यामुळे हा नृत्यप्रकार एक उत्तम एरोबिक्स व्यायाम आहे. म्हणूनच नाचल्यावर आपल्या शरीराला ऑक्सिजनचा भरपूर प्रमाणात पुरवठा होतो.

✻ हिंदी गाण्यांचं संगीत सुमधूर असतं. गाणी ऐकल्यावर आपले कान तृप्त होतात आणि मन आनंदी होतं. बॉलिवूड संगीतावर थिरकल्यानंतर आपण प्रचंड दमतो. पण या नृत्यातून आपल्याला एक निराळा आनंद मिळतो. बेभान होऊन नाचताना आपण सगळी दु:ख,चिंता विसरतो. म्हणूनच बॉलिवूड संगीताच्या ठेक्यावर थिरकणं हा ताणतणावापासून मुक्ती मिळवण्याचा उत्तम मार्ग आहे.

✻ बॉलिवूड डान्स करताना होणाऱ्या लयबद्ध हालचालींमुळे संपूर्ण शरीराची चपळता वाढते. डान्समुळे आपल्या सांध्यांना नैसर्गिक वंगण घातलं जातं. त्यामुळे सांधिवाताचा धोका कमी होतो.





✻ बॉलिवूड डान्स हा सुद्धा व्यायामाचाच एक प्रकार आहे. त्यामुळे यात सातत्य राखणं गरजेचं आहे. एकदा डान्स यायला लागला की शिकणं सोडून दिलं असं होता कामा नये. तुम्ही फक्त मनोरंजनासाठी नाही तर आरोग्यासाठीही नृत्य करताय हे कायम लक्षात ठेवा. संगीताच्या तालावर अगदी बिनधास्त ठेका धरा आणि उत्तम आरोग्याचे लाभ मिळवा.

## 'लेडी सिंघम'

**आयएएस अधिकारी मुग्धा सिन्हा यांना 'लेडी सिंघम' म्हणणं वावगं ठरू नये. वाळू माफिया, भू माफिया, खाण माफिया यांच्या विरोधात त्या उभ्या ठाकल्या. आपण सर्वसामान्य जनतेचे सेवक आहोत, त्यामुळे सेवाभावी वृत्तीने काम करायला हवं असं त्या मानतात. अत्यंत धडाडीच्या या आयएएस अधिकाऱ्याची ही ओळख...**

मानिनी

मुग्धा सिन्हा... अत्यंत धडाडीच्या आयएएस अधिकारी. एखाद्या चित्रपटात शोभेल अशीच त्यांनी कहाणी आहे. विविध माफियांच्या विरोधात त्यांनी दंड थोपटले. सर्वसामान्य जनतेच्या आधारस्तंभ ठरल्या. २०१० पर्यंत राजस्थानमधल्या झुंझुनू जिल्ह्याची जबाबदारी कोणत्याही महिला जिल्हाधिकाऱ्याकडे सोपवण्यात आली नव्हती. मुग्धा इथल्या पहिल्याच महिला जिल्हाधिकारी. १९९९ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असलेल्या मुग्धा यांनी झुंझुनूच्या आधी साधारण ३० ते ४० लाख लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यांची जबाबदारी सांभाळली होती. त्यामुळे या तुलनेने छोट्या जिल्ह्याची जबाबदारी सांभाळणं फारसं कठीण नसेल असं त्यांना वाटलं. पण इथल्या आव्हानांची त्यांना अजिबात कल्पना नव्हती. मुग्धा यांच्या धडाडीमुळे अवघ्या सहा महिन्यांमध्येच त्यांची इथून बदली झाली. पण त्या आधी त्यांनी बरंच काम करून ठेवलं होतं.

अरवली पर्वतरांगांमध्ये सुरू असलेल्या अवैध खाणकामासाठी नेल्या जाणाऱ्या स्फोटकांचा मोठा साठा त्यांनी जप्त केला. वाळू आणि दारूमाफियांच्या विरोधात त्या ठामपणे उभ्या राहिल्या. कोणत्याही धमक्या, दबावाला त्या बळी पडल्या नाहीत. बेकायदेशीर रस्तेबांधणीला प्रतिबंध केला. गॅस सिलेंडरच्या अवैध पुरवठ्याला आळा घातला. त्यांच्या कामांची ही यादी खूप मोठी आहे. राजकारणी, मोठे नेते यांचा ताण त्यांनी घेतला नाही. इथल्याच एका अवैध खाणीत कामगारांचा मृत्यू झाल्यानंतर ती कायमची बंद करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. २०१० मध्ये बंद झालेली ही खाण पुन्हा सुरू झाली नाही.

मुग्धा यांचे वडिल गुरस्वरूप सिन्हा भारतीय हवाई दलात पायलट होते. मुग्धा अवघ्या चार वर्षांच्या असताना १९७८ मध्ये लडाखमधल्या विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. वडिलांनंतर आईने मुग्धा आणि त्यांच्या दोन बहिणींना सांभाळलं. प्रशासकीय अधिकारी बनण्याच्या दृष्टीनेच त्यांची जडणघडण झाली. आपल्या मुलींनी वडिलांप्रमाणे देशाची सेवा करावी, हे स्वप्न त्यांच्या आईने पाहिलं आणि ते मुलींच्या डोळ्यात उतरवलं. पदवी परीक्षेत त्या दिल्ली विद्यापीठातून तिसऱ्या आल्या. त्यांना भारतीय परदेश सेवेत जायचं होतं. पण आईमुळे त्या आयएएसकडे वळल्या. दुसऱ्या प्रयत्नात त्या यशस्वी झाल्या. आयएएस परीक्षेत संपूर्ण भारतातून त्यांना आठवी रँक मिळाली. आपल्या कामाला त्या नोकरी नाही तर सेवा मानतात. सेवाभावी वृत्तीने काम करतात. सर्वसामान्य माणसासाठी केलेलं काम कधीच वाया जात नाही. त्याची गोड फळं तुम्हाला मिळतातच, असं मुग्धा सांगतात. विभाग कुठलाही असला तरी गैरप्रकारांविरोधात उभं ठाकण्याच्या वृत्तीमुळे त्यांना 'लेडी सिंघम' म्हणणं वावगं ठरणार नाही.



## विस्तारा ब्लॉगचं विश्व

स्वत:चा ब्लॉग असणं हे प्रतिष्ठेचं लक्षण मानलं जातं. ब्लॉगिंग फक्त वेळ घालवण्याचं साधन उरलेलं नाही. तर या माध्यमातून तुम्ही उत्पन्न मिळवू शकता. विविध विषयांवरचं लिखाण ब्लॉगवर प्रकाशित करू शकता. ब्लॉगर हा एक व्यावसायिक असतो. अर्थात ब्लॉगिंगच्या माध्यमातून पैसा कमावणं सोपं नसतं. यासाठी धैर्याची गरज असते. ब्लॉग सुरू केल्यावर पैशांचा धो धो पाऊस पडायला सुरूवात होते, असाही समज असतो. पण प्रत्यक्षात सुरूवातीचा काही काळ फक्त ब्लॉगिंगवर तुमचं घर चालू शकत नाही. काही ब्लॉगर्स तीन महिन्यांनंतर जम बसवतात तर काहींना वर्ष-दोन वर्षंही लागू शकतात. वेळ, पैसा आणि प्रयत्न यांच्या गुंतवणुकीच्या बळावर ब्लॉगर्स चांगलं उत्पन्न मिळवू शकतात. तुम्हीही ब्लॉग रायटिंगच्या विचारात असाल तर त्यातून चांगलं उत्पन्न कसं मिळवायचं याबाबतच्या काही टिप्स...

स्कील डेव्हलपमेंट

✻ दीर्घकाळाचा विचार करून ब्लॉगिंगकडे वळणार असाल तर स्वत:चा ब्लॉग तयार करा. इतरांच्या ब्लॉगवर लिखाण करत राहिल्याने तुम्हाला चांगलं उत्पन्न मिळवता येणार नाही. ब्लॉग सुरू करण्यासाठी 'टेक फ्रेंडली' असण्याची गरज नाही. ब्लॉग सुरू करण्याचं मार्गदर्शन ऑनलाईन मिळू शकतं. आर्थिक, भावनिक आणि वेळेची गुंतवणूक स्वत:च्या ब्लॉगमध्ये करा. तुमचा ब्लॉग सुरू करायला मदत करणारी बरीच व्यासपीठं आहेत.

✻ नियमित उत्पन्न मिळवण्यासाठी ब्लॉगवर चांगला मजकूर प्रकाशित करायला हवा. यासाठी पुरेसा वेळ देणं गरजेचं आहे. तुमचं म्हणणं लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचायला हवं. ब्लॉगला भेट देणाऱ्यांचं तिथे स्वागत व्हायला हवं. त्यामुळे ब्लॉगच्या डिझाइनवर भर द्या.



✻ वाचकांमध्ये लोकप्रिय असणाऱ्या ब्लॉग्जवरही लिखाण करा. तुमचं नाव वाचकांपर्यंत पोहोचायला हवं. तुमच्या विषयाला अनुसरून ब्लॉग्जची निवड करा.

✻ ॲड नेटवर्कच्या माध्यमातून ब्लॉगवरच्या जाहिराती सादर करा. 'गुगल ॲडसेन्स', 'चितिका', 'इन्फोलिंक', 'मीडिया डॉट नेट', 'पॉप ॲड्स' अशी ॲड नेटवर्क तुमच्या कामी येतील.

✻ ब्लॉगच्या प्रसिद्धीसाठी सोशल मीडियाचाही वापर करा. फेसबुकवर बरेच ब्लॉग्ज शेअर होत असतात. दिवसातला काही वेळ सोशल मीडियासाठी द्या. तुमचं लिखाण शेअर करा. व्हॉट्स ॲप ग्रुप्सवरही तुमचं लिखाण पाठवा. यामुळे तुमचा वाचक वर्ग वाढायला मदत होईल.

### हेअर केअर

#### केसांच्या झटपट वाढीसाठी...



केसांच्या वाढीसाठी बरेच प्रयत्न केले जातात. पण वाढतं प्रदूषण, उत्पादनांमधली घातक रसायनं यामुळे केस वाढण्याऐवजी गळू लागतात. केस झटपट वाढवण्यासाठी अगदी सोपा उपाय करता येईल. यासाठी कांदा, खोबरेल तेल आणि ॲलोव्हेरा घ्या. कांदा किसून त्याचा रस काढा. ॲलोव्हेराचे तुकडे खोबरेल तेलात नीट उकळून घ्या. हे मिश्रण थंड होऊ द्या. एका स्प्रे बॉटलमध्ये ॲलोव्हेरा आणि खोबरेल तेलाचं मिश्रण गाळा. त्यात कांद्याचा रस घाला. हे मिश्रण केसांवर फवारा. मसाज करा. ४० मिनिटांनी शँपूने केस धुवा. या उपायाने साधारण महिन्याभरात केस वाढू लागतील.

### स्मार्ट टिप्स

#### फुगीर गाल हवे आहेत?



चाफेकळी नाक, काळ्याभोर डोळ्यांसह फुगीर गाल चेहऱ्याच्या सौंदर्यात भर घालतात. पण अनेक कारणांमुळे गाल चपटे दिसू लागतात. वाढतं वय, पोषक घटकांची कमतरता अशी अनेक कारणं यामागे असतात. गाल फुगीर दिसावेत यासाठी रात्रभर भिजवलेल्या मेथीदाण्यांची पेस्ट करून चेहऱ्याला लावा. वाळल्यावर धुवून टाका. गालांवर दररोज राईच्या तेलाने मसाज करा. बदामाचं तेलही वापरता येईल. ग्लिसरिन आणि गुलाब पाणी एकत्र करून या मिश्रणाने गालांवर मसाज करा.

### हेल्दी लाईफ

#### भिजवून खाल्ल्याने...



काही पदार्थ भिजवून खाल्ल्याने पोषणमूल्यं वाढतात.
भिजवलेल्या जिऱ्यातून शरीराला पोटॅशियम मिळतं. जिऱ्याचं पाणी लोहाचा मुख्य स्रोत आहे.
भिजवलेल्या मेथीदाण्यांच्या सेवनाने दात आणि हाडं बळकट होतात.
रक्ताभिसरण सुधारण्यासाठी भिजवलेल्या मनुका खा.
भिजवलेली खसखसही लाभदायी ठरते. मूत्रमार्गाशी संबंधित समस्या असतील तर भिजवलेली बडिशेप खा.

## लज्जतदार फणस बिर्याणी

रसगंधा

मैत्रिणींनो, बिर्याणीचे विविध प्रकार पहायला मिळतात. मांसाहारी खवय्ये चिकन बिर्याणीवर ताव मारतात. शाकाहारींना व्हेज बिर्याणी, हंडी बिर्याणीवर समाधान मानावं लागतं. तुम्हीही घरी बिर्याणी बनवत असाल. बाजारात फणसही मिळतो. तुम्ही कच्च्या फणसाची चविष्ट बिर्याणी बनवू शकता.

**साहित्य**: २०० ग्रॅम बासमती तांदूळ, १०० ग्रॅम कच्चा फणस, तीन कांदे, एक टी स्पून लसूण पेस्ट, एक टी स्पून आल्याचे लांब आणि पातळ तुकडे, दोन मोठ्या वेलची, एक छोटा चमचा जिरं, चार लवंगा, जावित्रीचे दोन तुकडे, दोन मोठे चमचे तूप, चमचाभर गरम मसाला, दहा रोस्टेड काजू, तेल, बारीक चिरलेली कोथिंबिर, चवीनुसार मीठ



**कृती**: फणसाचे एक इंच आकाराचे चौकोनी छोटे तुकडे करून घ्या. दोन कांद्यांचे लांब आणि बारीक काप करा. एक कांदा बारीक चिरून घ्या. कढईत तेल गरम करून फणसाचे तुकडे तळून घ्या. बाजूला काढून ठेवा. उरलेल्या तेलात कांद्याचे पातळ काप सोनेरी रंगावर तळा. कुकरमध्ये तूप गरम करून त्यात जिरं, खडे मसाले आणि लसणाची पेस्ट घालून परतून घ्या. यात बारीक चिरलेला कांदा घाला. सोनेरी रंगाचा होईपर्यंत परता. आल्याचे तुकडे घालून पाच ते सात सेकंद परता. यानंतर यात तांदूळ, मीठ, गरम मसाला आणि पाणी घालून एक शिटी करा. कुकरमधली वाफ निघून गेल्यावर तो उघडा. त्यावर तळलेला फणस आणि कांदा घाला. कुकर थोडा वेळ झाकून ठेवा. बिर्याणी थोडी थंड झाल्यावर वरून काजू आणि कोथिंबिर घालून खायला द्या.

## नात्यात प्रेम नाही...

समुपदेशन

माझ्या लग्नाला सहा वर्षं झाली आहेत. आम्हाला मूल नाही. आमचं लग्न पालकांनी ठरवलं. पण लग्नानंतर आमच्यात कोणतेही भावनिक बंध जुळले नाहीत. अनेक प्रयत्न करूनही आम्ही एकमेकांच्या प्रेमात पडू शकलो नाही. आम्ही दोघंही आधुनिक विचारांचे असून यशस्वी कारकिर्द घडवत आहोत. आमच्या नात्यात प्रेमच नाही. त्यामुळे समाज काय म्हणेल हा विचार बाजूला सारून मी या नात्यातून बाहेर पडू का? यानंतर मी आनंदी राहू शकेन का?

– या नात्यात रहायचं किंवा नाही याचा निर्णय सर्वस्वी तुझा असेल. हे आयुष्य तुझं आहे. त्यामुळे इतर कोणीही तुझ्या वतीने निर्णय घेऊ शकणार नाही. मला वाटतं, तू तुझे प्राधान्यक्रम ठरव. आयुष्यात काय हवं आहे, याचा विचार कर. घटस्फोटाचा निर्णय घेण्याआधी तू विवाह समुपदेशकाची मदत घे. कुटुंब, मित्रमैत्रिणी, नातेवाईक यांचा किती विचार करायचा हे तुझ्यावर अवलंबून आहे. तुला काय महत्त्वाचं वाटतं याचा विचार कर. हे नातं टिकवणं किंवा संपवणं या दोन्ही निर्णयांनंतर तुला आव्हानांना समोरं जावं लागेल. प्रत्येक निर्णयाचे चांगले आणि वाईट परिणाम असतात. पण तुझा आनंद महत्त्वाचा. तुझे प्राधान्यक्रम ठरवून लघु आणि दीर्घकालीन वैयक्तिक उद्दिष्ट ठरव. तुझ्या भावना, मतं, पतीकडे व्यक्त कर. दोघांनी एकत्रितपणे योग्य तो निर्णय घ्या.



## फॉर परफेक्ट कुर्ता लूक

स्टाईल स्टेटमेंट

कुर्ता हा आरामदायी पेहराव कोणत्याही ऑकेजनलाकॅरी करता येतो. यासोबत वेगवेगळे बॉटम्स ट्राय करता येतात. जीन्स, लेगिंग्ज, पलाझो, पँट यापैकी कशावरही कुर्ता मॅच करता येतो. अगदी स्कर्टवरही तुम्ही कुर्ता घालू शकता. म्हणूनच कंफर्टसाठी बॉलिवूड दिवाज कुर्त्याला पसंती देत आहेत. तुम्हीही स्टायलिश आणि कंफर्टेबल लूकसाठी या दिवाजकडून प्रेरणा घेऊ शकता.



✻ आदिती रावने फ्लेअर्ड स्कर्टवर स्लीव्हलेस कुर्ता कॅरी केला होता. पांढऱ्या रंगाचा कुर्ता आणि स्कर्टवर निळ्या ब्लॉक प्रिंट्स शोभून दिसत होत्या. त्यावर तिने नेव्ही ब्लू दुपट्टा घेतला होता. सिल्व्हर ज्वेलरीने हा लूक खुलवला होता. हा देसी लूक तुम्ही कधीही कॅरी करू शकता.

✻ करिश्मा कपूरही मध्यंतरी समर लूकमध्ये दिसली. तिने नॅचरल ब्लॉक प्रिंटचा स्ट्राईपवाला कुर्ता घातला होता. त्याच डिझाइनची बॉटम कॅरी केली होती. त्यावर फ्लॅट चप्पल छान दिसत होत्या. कॅज्युअल ऑकेजनला असा पेहराव करता येईल. उन्हाळ्यात शरारा हा प्रकार बाजूला ठेवला जातो. पण तारा सुतारियाने नूडल स्ट्रॅप शॉर्ट व्हाईट कुर्त्यासोबत प्रिंटेड शरारा कॅरी केला होता. त्यावर साजेसा दुपट्टा या पेहरावाची शान अधिकच वाढवत होता.

✻ मोकळ्या ढाकळ्या कुर्त्यांच्या चाहत्या असाल तर दीया मिर्झाप्रमाणे तयार व्हा. तिने ग्रे रंगाचा कुर्ता मस्टर्ड रंगाच्या स्ट्रेट लेग्ड ट्राउझरवर कॅरी केला होता. ग्रे आणि मस्टर्ड हे कॉम्बिनेशन चांगलंच उठून दिसलं.

## बेस्ट कॉम्बिनेशन्स

डाएट मंत्रा

आहारामध्ये वैविध्य असावं असं तज्ज्ञ सांगतात. आपल्यालाही हे वैविध्य अपेक्षित असतं. यामुळे रुचिपालट होतो. विविध घटकांमध्ये पौष्टिक तत्त्वांचा लाभ होतो आणि निरोगी रहाणं शक्य होतं. आपल्या आहारातच औषध दडलंय असं म्हणतात. यात तथ्यही आहे. मुख्य म्हणजे काही पदार्थांचं मिश्रण अधिक लाभदायक ठरतं. या प्रत्येक पदार्थामध्ये काही महत्त्वपूर्ण औषधी आणि अनुकूल तत्त्व असतातच. ते एकत्र येतात तेव्हा ही अनुकूलता द्विगुणीत होते. म्हणूनच हे पदार्थ अधिक आरोग्यदायी सिद्ध होतात. आज अशीच काही मिश्रणं पाहू. आहारामध्ये वैविध्य असावं असं तज्ज्ञ सांगतात. आपल्यालाही हे वैविध्य अपेक्षित असतं. मुख्य म्हणजे काही पदार्थांचं मिश्रण लाभदायक ठरतं. या प्रत्येक पदार्थामध्ये काही महत्त्वपूर्ण औषधी आणि अनुकूल तत्त्व असतातच. ते एकत्र येतात तेव्हा ही अनुकूलता द्विगुणीत होते.



✻ ब्रोकली आणि टोमॅटो हे सॅलडमधील महत्त्वपूर्ण घटक आहेत. टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन सी, ई, ए आणि बी ची पर्याप्त मात्रा असते तर ब्रोकलीमध्ये व्हिटॅमिन के, फोलेट आणि ॲन्टी कॅन्सर तत्त्व असतात. या दोघांचं मिश्रण एकूण गुण मात्रेत पन्नास टक्के वाढ करतं आणि त्याचे शरीराला थेट लाभ मिळतात.



✻ प्रत्येकालाच सफरचंद आवडतं त्याचप्रमाणे डार्क चॉकलेटही सर्वांनाच प्रिय असतं. या दोहोंचं एकत्रित सेवन शरीराला अत्यंत उपकारक ठरतं. सफरचंद आणि डार्क चॉकलेट एकत्र खाल्ल्यास हृदय तंदुरुस्त राहतं आणि हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता कमी होते.

✻ आपण खनिजांनी परिपूर्ण असणारे काळे वाटाणे उसळ स्वरुपात घेतो. उकडून तिखट मीठ घालूनही हे वाटाणे खाल्ले जातात. पण ते लाल ढोबळी मिरचीसवे खाल्ल्यास अधिक लाभ मिळतो. लाल ढोबळी मिरचीमध्ये लोहाचं प्रमाण भरपूर असतं. यामुळे शरीरातील लोहाची कमतरता भरून निघण्यास मदत होते. काळे वाटाणे लाल ढोबळी मिरचीच्यासवे खाल्ल्यानं शरीरात लोहाचं उत्तमरित्या शोषण होतं. यामुळे लोहाची जवळपास सहा टक्के अतिरिक्त मात्रा शरीराला मिळते.

✻ पापलेट हा मासा चवीसाठी प्रसिद्ध आहे. या माशामध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड पर्याप्त प्रमाणात असतं. हा माशापासून डिश बनवताना लसणाचा वापर केल्यास उपयोग्यता अनेक पटीनं वाढते. लसणामुळे शरीराला यातील लाभ सुकर पद्धतीनं प्राप्त होतात.

## देशोदेशीची ब्युटी सिक्रेट्स

ब्युटी टॉक

चेहऱ्याचं सौंदर्य खुलवण्यासाठी विविध नैसर्गिक घटक आजमावले जातात. भारतात अशा नैसर्गिक घटकांची कमतरता नाही. ॲलोव्हेरापासून गुलाबपाण्यापर्यंत अनेक देशी पर्याय कोणत्याही दुष्परिणामांशिवाय त्वचेची देखभाल करू शकतात. आपणही कोणतीही शंका मनात न आणता त्यांचा वापर करतो. भारताप्रमाणेच जगभरातल्या महिला त्वचेच्या नैसर्गिक देखभालीवर भर देतात. देशोदेशीच्या महिलांच्या सौंदर्याची काही गुपितं जाणून घेतल्यास सोपे उपाय सहज तपासून पाहता येतील.

✻ ग्रीसमध्ये प्राचीन संस्कृतीच्या खुणा पहायला मिळतात. पुराणकाळातल्या ग्रीक देवता सौंदर्य खुलवण्यासाठी ऑलिव्ह ऑईलचा वापर करायच्या. म्हणूनच या देशातल्या महिलाही त्वचेला ऑलिव्ह ऑईलचं पोषण देतात. अँटीऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वांनी समृद्ध असं ऑलिव्ह ऑईल त्वचेला तजेला देतं. याच्या नियमित वापरामुळे चेहऱ्यावरच्या सुरकुत्या कमी होतात तसंच सूर्यकिरणांमुळे होणारं नुकसान टाळता येतं.



✻ शेजारी चीनमधल्या महिला चेहऱ्याच्या देखभालीसाठी तांदूळ भिजवलेलं पाणी वापरतात. तांदळाचं पाणी त्यांच्या सौंदर्यसाधनेचा एक भाग असतं. या पाण्याचा वापर चेहरा स्वच्छ करण्यासाठी केला जातो. अगदी सरळ सोपा असा हा उपाय तुम्हीही करू शकता. या पाण्यात अँटीऑक्सिडंट्स असतात. यामुळे त्वचेचं पोषण होतं तसंच फ्री रॅडिकल्सची तीव्रता कमी होऊन त्वचा तजेलदार दिसते. तांदूळ पाण्यात अर्धा तास भिजवून ठेवा. पाणी गाळून घ्या. या पाण्याने चेहरा धुवून घ्या.

✻ जपानमध्ये 'सेक' नावाची राईस वाईन मिळते. तांदळापासून बनवलेल्या या वाईनचे बाथ या देशात बरेच लोकप्रिय आहेत. सेकमधलं 'कॉजिक ॲसिड' नैसर्गिक पद्धतीने त्वचा एक्सफोलाइट करतं. यामुळे चेहऱ्यावरचे काळे डाग कमी होतात.

✻ ॲव्होकॅडो हे फळ भारतातही लोकप्रिय होत आहे. सिंगापूरमध्ये त्वचेच्या पोषणासाठी या फळाचा गर वापरतात. इथल्या महिला ॲव्होकॅडोचा गर कुस्करून चेहऱ्याला लावतात. यामुळे त्वचेतला ओलावा टिकून राहतो. ॲव्होकॅडोमध्ये फॅटी ॲसिड्स, ई जीवनसत्त्व, पोटॅशियम, लेसिथिनसारखे पोषक घटक असतात. यामुळे त्वचेचं सौंदर्य खुलतं.

✻ प्राचीन काळातली इजिप्तची अखेरची राणी क्लिओपात्रा आपलं सौंदर्य जपण्यासाठी दूध आणि मधाने आंघोळ करत असे. इजिप्तमधल्या महिला या दोन घटकांचा नियमित वापर करून त्वचेचा तजेला टिकवून ठेवतात.

# भंडारा बायपासने राष्ट्रीय महामार्ग समृद्ध

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर/भंडारा, दि. ९ :

भंडारा शहरासाठी 14.8 किलोमीटर लांबीचा सहापदरी बायपास मार्ग राष्ट्रीय महामार्गाची समृद्धी ठरावी असा 738 कोटींपेक्षा जास्त खर्च केला जाणारा महत्वाकांक्षी प्रकल्प दृष्टिपथात येत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 53 वर असलेल्या बेला ते शिंगोरी या मार्गावर तयार करण्यात येत असलेला हा प्रकल्प झपाट्याने पूर्णत्वाकडे जात आहे. वेळ, इंधन व पैशांचीही बचत या महामागार्मुळे होणार असून वैनगंगा नदीवरील एक लेन पूर्ण झाले असून दुसऱ्या पुलाचे काम सुरू आहे. सन 2025 मध्ये या नववर्षात हा बायपास मार्ग भंडारा जिल्ह्यासाठी विकासाचा महामेरू ठरणार असून याचा फायदा आंतरराज्यीय पातळीवरही होईल.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 53 वरील निमार्णाधीन हा बायपास महामार्ग बांधकामासाठी खर्च 618.75 कोटी रुपये असून भुसंपादन व युटीलीटी शिफ्टिंगसह 738 कोटी 67 लाख रुपयांचा खर्च यावर होणार आहे. अपेक्षेप्रमाणे ठरवून दिलेल्या कालावधीत या बायपासचे काम पुर्ण झाले नसले तरी 31 मार्च 2025 पर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

परिणामी या नववर्षात या बायपासचा उपयोग रहदारीसाठी सुरू होईल. बायपास मार्गावरील रहदारी एकदा सुरू झाल्यास भंडारा शहरातून गेलेल्या महामार्गावरील रहदारी कायमस्वरुपी बंद होणार आहे.

थेट लाखनी, साकोली व रायपूरकडे जाणारी वाहने बायपासचा उपयोग करतील. तसेच भंडारा, पवनी आणि तुमसरकडे जाणाऱ्या प्रवाशांसह सामान्य नागरिक, व्यवसायिक व अन्य घटक भंडारा शहराकडे येतील. परिणामी जड वाहतुकीतून भंडारा शहरवासीयांची कायमस्वरुपी वाहतूक कोंडीतून सुटका होणार आहे. याच मार्गावर नवीन रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत.

महामार्ग क्रमांक 53 वरील बायपास महामार्गाच्या बांधकामामुळे या मार्गावरील अन्य गावांचेही रुपडे पालटणार आहे. अजीमाबाद, बेला, भिलेवाडा, दवडीपार, दिघोरी, हंसापूर, गिरोला, खापा, कोरंभी, पलाडी, सालेबर्डी, सिरसघाट, उमरी आदी गावांचा यात समावेश राहणार आहे. महामार्गाच्या या गावांच्या जवळून बायपास गेल्याने व्यवसायाच्या दृष्टीने संधी निर्माण होणार आहे. पयार्याने रोजगार निर्मितीला मोठ्या प्रमाणात हातभार लागण्याची चिन्हे आहेत. त्यातच वैनगंगा नदीपात्रात जल पर्यटनाच्या माध्यमातूनही गाव विकासाला चालना मिळणार आहे.

### पूल उभारणे एक आव्हान

जेव्हा नद्यांमध्ये पूल तयार केले जातात तेव्हा पाणी 3-4 मीटर राहते, परंतु वैनगंगा नदीमध्ये 8-10 मीटरपेक्षा जास्त पाणी स्थिर स्थितीत आढळते.

त्यामुळे वैनगंगेवर पूल बांधण्यासाठी बराच वेळ लागला व हे पुल उभारणे एक आव्हानच होते. त्यामुळे मार्ग पूर्ण करण्यासाठी 24 महिन्यांची मुदत देण्यात आली होती.




### १३ गावातील ५८.८९ हेक्टर जमीन संपादीत

प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक जमीन संपादित करण्यासाठी सुमारे 101.71 कोटी रुपये खर्च करण्यात आले. हा बायपास उजव्या बाजूने (नागपूरहून येताना) चार लेन रस्ता जिथे संपतो तिथूनच सुरू करण्यात आला आहे. हा बायपास रोड वैनगंगा नदीनंतर पलाडी येथे समाप्त होतो. भंडारा तालुक्यातील तब्बल 13 गावांमधील 56.89 हेक्टर आर. जमीन संपादीत करण्यात आली आहे. बायपास मार्गासह वैनगंगा नदी पुलावर दोन लेन पुलाचे बांधकाम, एक उड्डाणपुल, दोन भूमीगत रस्ते, सहा लहान स्वरुपाचे भूमीगत रस्ते, लहान मोठे 15 पुल, 17 किलोमीटरचा सर्वांस मार्ग, 21 लहान जंक्शन आणि चार बसथांचे निर्माण केले जात आहेत.



### वैनगंगा नदीवर ६०० मीटर लांबीचा पुल

बायपासच्या 10.34 किमी लांबीच्या ग्रीनफिल्डला दोन उड्डाणपूल आणि 17 अंडरपास प्रदान करून सर्व्हिस रोड आणि अतिरिक्त रस्ता सुरक्षा प्रदान करून पूर्णपणे प्रवेश-नियंत्रण आहे. तर नागपूर-रायपूर विभागादरम्यान उत्तम कनेक्टिव्हिटी आणि वाहनांची अडचण मुक्त होण्यासाठी भंडारा बायपास अत्यंत आवश्यक आहे. वैनगंगा नदीवरील 600 मीटर लांबीच्या सहा पदरी पुलामुळे वाहतूक कोंडी कमी होईल.

# वनमंत्री नाईक यांचा पहिला विदर्भ दौरा

## माजी वनमंत्र्यांच्या कामाचे कौतुक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :



महाराष्ट्रातील १७ टक्के जागा वनक्षेत्राने व्यापलेली आहे, विभाग समजून घ्यायचा आहे. माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मोठ्या प्रमाणात खात्याची प्रगती केली आहे करोडो झाडे लावण्याचे उद्दिष्ट साध्य केले,असे प्रतिपादन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी नागपूर येथे केले.

वनखात्याच्याचे मंत्रीपद स्वीकारल्यानंतर प्रथम गणेश नाईक विदर्भात आले. विमानतळावर ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी भाजप नेते व माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या कामाबाबत गौरवौदगार काढले. विविध प्रकारच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

गोरेवाडा ज्यू सेंटरच्या अधिकाऱ्यांना चंद्रपूरला बोलावलेला आहे. प्राथमिक माहिती घेऊन त्याची सत्यता तपासली जाईल, खाद्य तपासून द्या, अशा सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्राणिसंग्रहालयाला दिल्या आहेत.सखोल चौकशीनंतर काय निष्पन्न होईल ते पाहावे लागेल. प्रादुर्भाव झालेल्या प्राणीसंग्रहालयात तात्पुरती बंद करण्याच्या सूचना दिल्या होत्या. नवी मुंबई येथे एकनाथ शिंदेची इच्छा नसताना काही बाबी घडल्या, सर्व्हिस रोडसाठी भूखंड दिले. शिंदे यांनी सुद्धा त्या गोष्टीचा निषेध केला हे भूखंड दुसरीकडे द्या, असे नाईक म्हणाले.

वनात अतिक्रमण केल्यानंतर मानव वन्यजीव संघर्ष निर्माण होतो. अभयारण्यातील गाव उठून किंवा शेती असेल तर त्यांना अधिग्रहण करून त्यासाठी धोरण राबवले गेले. पुढच्याकाळात त्यात आणखी सुधारणा केली जाईल. व्याघ्रप्रकल्पात नियमाचे पालन होणे गरजेचे आहे, असे नाईक म्हणाले.

# चिकन खाल्ल्याने वाघांना बर्ड फ्लू : गोरेवाडा प्राणीसंग्रहालय तात्पुरते बंद

■ महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. ९ :

गोरेवाडा रेस्क्यू सेंटरमध्ये डिसेंबर महिन्यात तीन वाघ आणि एका बिबट्याचा मृत्यू झाला होता. या प्राण्यांचा मृत्यू बर्ड फ्ल्यू मुळे झाल्याचा अहवाल प्राप्त झाला होता. चिकन खाल्ल्याने वाघाला झाला बर्ड फ्लू झाल्याची प्राथमिक माहिती असल्याचे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सांगितले.

नागपुरातील गोरेवाडा रेस्क्यू तीन वाघ आणि एका बिबट्याचा मृत्यू झाल्याने खळबळ माजली होती. डिसेंबरमध्ये वाघ आणि बिबट्याचा मृत्यू झाल्यानंतर व्हिसेराचे नमुने भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा प्राणी रोग संस्थानकडे पाठवले होते. या प्राण्यांचा मृत्यू एच-5एन-1 विषाणूमुळे झाल्याचा अहवाल राष्ट्रीय उच्च सुरक्षा प्राणी रोग संस्थानने दिला. तीनही वाघ तीन ते चार वर्षाचे होते. तर बिबट्या 7 ते 8 महिन्यांचा होता.

गोरेवाडा रेस्क्यू सेंटरमध्ये तीन वाघांना उपचारासाठी आणण्यात आले होते. हे तीनही वाघ मानवी वस्त्यांवरील हल्ल्यांमुळे बंदीस्त करण्यात आले होते.




वाघ डिसेंबर 2024 च्या दुसऱ्या आठवड्यात चंद्रपूरातील टीटीसीतून, तर बिबट बुलढाण्यातून मे 2024 मध्ये आला होता पण उपचारादरम्यान तीन वाघ आणि एका बिबट्याचा 20 ते 23 डिसेंबरदरम्यान मृत्यू झाला. वाघ आणि बिबट्याचा मृत्यू झाल्यानंतर व्हिसेराचे नमुने भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा प्राणी रोग संस्थानकडे पाठवण्यात आले. प्रयोगशाळेतील नमुन्यांच्या चाचणीचा अहवाल 1 जानेवारी 2025 रोजी समोर आला होता. वाघ आणि बिबट्याचा मृत्यू बर्ड फ्लूमुळे झाल्याचे या अहवालात म्हटले होते.

बर्ड फ्लूमुळे वाघाचा मृत्यू होण्याची ही देशातील पहिलीच घटना असल्याची माहिती गोरेवाडा रेस्क्यू सेंटरचे संचालक शतानिक भागवत यांनी दिली.

# मी शंभर टक्के मंत्री होणार!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :



राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने महायुतीमधील अनेक नेते नाराज आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ वारंवार आपली नाराजी जाहीर करत आहेत. तर, त्यांच्याच पक्षाचे आमदार धमार्राव बाबा आत्राम मात्र मंत्रिपदाबाबत ठाम असून मी शंभर टक्के मंत्री होणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मंत्रिपदासाठी अडीच वर्षे थांबण्याचा निर्णय त्यांनी घेतल्याचे दिसत आहे. शरद पवार आणि अजित पवार एकत्र आल्यास महाराष्ट्रात आणि देशात एक प्रकारची क्रांती होईल, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रिमंडळ विस्तारानंतर अडीच - अडीच वर्षांचा फॉर्म्युला जाहीर केला होता. सर्वांना योग्य संधी मिळण्यासाठी हा निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अनेक बड्या नेत्यांची मंत्रिपदाची संधी हुकली. यामध्ये छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धर्मराव बाबा आत्राम यांसारख्या दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. छगन भुजबळ यांनी नाराजी जाहीर केली, तर धर्मराव बाबा आत्राम मात्र, अजित पवारांच्या निर्णयानुसार अडीच वर्ष वाट पाहणार असल्याचे दिसून येते.

छगन भुजबळ यांच्या नाराजीवर बोलताना धमार्राव बाबा आत्राम म्हणाले की, त्यांची नाराजी स्वाभाविक आहे. अजितदादांनी अडीच वर्ष थांबायचे सांगितले आहे. तोपर्यंत पक्षसंघटनेचे काम सुरू असून गडचिरोलीची जिल्हा परिषद राष्ट्रवादीच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले. मी शंभर टक्के मंत्री होणार असून मंत्रिपद माझ्या नशिबात आहे. आतापर्यंत चार वेळा मी निवडून आलो आणि चारही वेळा मंत्री झालो, असेही धमार्राव बाबा आत्राम म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राष्ट्रीय सेवक संघाने निवडणूक प्रचारात केलेल्या कार्याच कौतूक केले. यावरही धमार्राव बाबा आत्राम यांनी प्रतिक्रिया दिली. पवारांनी संघाच्या कामाचे कौतुक केले, ते योग्यच असल्याचे ते म्हणाले.

पुढे बोलताना त्यांनी शरद पवार महायुतीत येण्याबाबतही भाष्य केले. शरद पवार यांनी आमच्यासोबत यावे, हे सगळ्यांचे मत आहे. पण ते महायुतीत येतील असे वाटत नाही. मत परिवर्तन होऊन ते आमच्याकडे आले, तर विकासकामे करण्यासाठी फायदा होईल. काका-पुतणे एकत्र आल्यास महाराष्ट्रात आणि देशात एक प्रकारची क्रांती होईल, असे आत्राम म्हणाले.

: सिनेरंग :

लोकरंजन

# फसक्लास दाभाडे'चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित




टी-सीरीज, कलर यल्लो प्रॉडक्शन आणि चलचित्र मंडळी यांच्या बहुप्रतीक्षित चित्रपट ह्यफसक्लास दाभाडेह्णचा जबरदस्त ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. सोनू आणि कोमलच्या हळदी समारंभात धमाल केल्यानंतर आता दाभाडे कुटुंब ट्रेलर लाँचच्या निमित्ताने सगळ्यांच्या भेटीला आले.

या दिमाखदार सोहळ्यात दाभाडेंनी ट्रॅक्टरमधून जबरदस्त एंट्री करत सर्वांसोबत धमाल केली. या सोहळ्याला क्षिती जोग, सिद्धार्थ चांदेकर, अमेय वाघ, निवेदिता सराफ, हरिष दुधाडे, राजन भिसे, राजसी भावे, तृप्ती शेडगे, दिग्दर्शक हेमंत ढोमे यांच्यासह दाभाडे कुटुंबाचा भाग असलेले अनेक जण उपस्थित होते.

हेमंत ढोमेचा चित्रपट म्हटला की त्यात धमाल ही असतेच. कौटुंबिक विषय अतिशय हलक्याफुलक्या, मजेदार आणि तितक्याच प्रभावीपणे मांडण्यात त्याचा हातखंडा आहे. हा चित्रपटही त्यापैकीच एक आहे.

'फसक्लास दाभाडे'च्या घोषणेपासून प्रेक्षकांची उत्सुकता ताणली होती. त्यात आता ट्रेलरने भर टाकली आहे. ट्रेलरमध्ये दाभाडे कुटुंबातील सदस्यांची आंबट गोड केमिस्ट्री पाहायला मिळत असून तायडी, सोनू आणि पप्पू यांच्यातील मजेदार नोकझोक दिसत असतानाच त्यांच्यातील भावनिक नातंही उलगडत आहे.

विनोदासह हृदयस्पर्शी भावनांचा संगम असलेली दाभाडे कुटुंबाची कहाणी पाहण्यासाठी प्रेक्षक आता खूप उत्सुक आहेत. ह्यफसक्लास दाभाडें'चे हे कुटुंब २४ जानेवारी २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हेमंत ढोमे लिखित, दिग्दर्शित या चित्रपटाचे निर्माते भूषण कुमार, कृष्ण कुमार, आनंद एल राय आणि क्षिती जोग आहेत. चित्रपटाचे वितरण पॅनोरमा स्टुडिओजने केले आहे. ■ ■

# तेजस देऊस्कर दिग्दर्शित देवमाणूससाठी अभिनेता सुबोध भावे ऑनबोर्ड!



तेजस देऊस्कर दिग्दर्शित देवमाणूस या बहुप्रतिक्षित चित्रपटाच्या एक से एक कलाकारांच्या टीम मध्ये आता आदरणीय अभिनेते सुबोध भावे सामील झाले आहेत.

अभिनेता सुबोध भावे, महेश मांजरेकर आणि रेणुका शहाणे या दिग्गज कलाकारांसोबत यंदा स्क्रीन शेअर करणार आहेत, त्यामुळे हा चित्रपट एक मल्टिस्टारर चित्रपट असणार आहे ज्यात आकर्षक आणि उच्च दर्जाचे नाटक संपूर्ण महाराष्ट्र आणि बाहेरील प्रेक्षकांना आकर्षित करेल आणि अनुभवायला मिळेल.

बालगंधर्व, आणि डॉ. काशिनाथ घाणेकर, कट्यार काळजात घुसली, यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या अविस्मरणीय अभिनयासाठी प्रसिद्ध असलेले सुबोध भावे, ज्यांची प्रचंड फॅन फॉलोविंग आहे जे नेहमी आपल्या प्रत्येक भूमिकांमध्ये स्वतःला बुडवून घेण्याची क्षमता ठेवतात.

कॉम्प्लेक्स, स्टेबल यांसारख्या विविध लेवलच्या पात्रे साकारण्याच्या त्यांच्या क्षमतेबद्दल त्यांचं अनेकदा कौतुक झालं आहे आणि त्यांचा हा समावेश आणि योगदान नक्कीच चित्रपटाच्या कथेला एक नवीन आयाम देईल.

अभिनेता सुबोध भावे म्हणाले, या अविश्वसनीय चित्रपटाचा एक भाग होण्यासाठी मी खूप उत्साहित आहे आणि आमचे सामूहिक प्रयत्न पाहून प्रेक्षकांकडून कसा प्रतिसाद मिळतो हे सुद्धा पाहण्यासाठी मी आतुर आहे. ■ ■ ■




## पॉकेट में आसमान नवी मालिका स्टार प्लसवर

स्टार प्लस वाहिनी आपल्या प्रेक्षकांकरता वेधक आणि स्वारस्यपूर्ण विषयांवरील मनोरंजनपर मालिका सादर करण्याकरता ओळखली जाते. नात्यांची गुंतागुंत अलवारपणे उलगडणाऱ्या या मालिका प्रेक्षकांच्या भावभावनांना साद घालतात.

स्टार प्लस वाहिनीवर एकाहून एक सरस मालिका आहेत, ज्यांचा उद्देश केवळ प्रेक्षकांचे रंजन करणे इतकाच नाही, तर त्यांचे सबलीकरण करणे हाही आहे. या मालिकांव्यतिरिक्त, स्टार प्लस वाहिनीवर पॉकेट में आसमान नावाची नवी वेधक मालिका लवकरच दाखल होत आहे, ज्यात अभिका मालाकार आणि फरमान हैदर हे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत.

पॉकेट में आसमान या मालिकेत अभिका मालाकार आणि फरमान हैदर अनुक्रमे रुद्राणी (राणी) आणि दिग्विजय या भूमिका साकारताना दिसतील. या मालिकेच्या निर्मात्यांनी रुद्राणी (राणी) आणि दिग्विजय यांच्या सहजीवनाची झलक दाखवत प्रेक्षकांमध्ये या मालिकेविषयी प्रचंड उत्सुकता निर्माण करणारा मालिकेचा रंजक असा पहिला प्रोमो प्रदर्शित केला आहे.

या मालिकेत राणीचा प्रवास बघायला मिळेल. एका गर्भार युवतीने तिच्या वैयक्तिक आयुष्यातील जबाबदाऱ्यांचा समतोल साधत डॉक्टर होण्याचे तिचे स्वप्न पूर्ण करण्याचा केलेला निर्धार बघायला मिळेल. डॉक्टर बनण्याचा दृढनिश्चय केलेली राणी मातृत्व आणि डॉक्टर बनण्याची तिची व्यावसायिक महत्त्वाकांक्षा यांचे संतुलन कसे साधते, आणि ते करताना येणाऱ्या आव्हानांतून वाट काढत ती दोन्हींचा सुवर्णमध्य कसा साधते, हे या मालिकेत बघायला मिळेल. बॉयहूड प्रॉडक्शन्स निर्मित, पॉकेट में आसमान ही मालिका लवकरच स्टार प्लस वाहिनीवर प्रसारित होईल. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com

# पारा आणखी खाली घसरणार

## विदर्भ वगळता राज्यात पावसाची शक्यता

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

आगामी दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यात तापमानाचा पारा आणखी दोन ते चार अंशांनी घटणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

विदर्भ वगळता उर्वरित राज्यात त्यानंतर तापमानात वाढ होऊन हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळण्याची शक्यता देखील हवामान विभागाने वर्तवली आहे. मात्र, विदभार्तील तापमान हे कोरडे राहण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने व्यक्त केलेले अंदाजानुसार आगामी 10 आणि 11 जानेवारी रोजी पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकाची योग्य ती काळजी घेण्याचा सल्ला देखील हवामान विभागाच्या वतीने देण्यात आला आहे.

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणात तापमानात घट नोंदवण्यात आली आहे. 12 ते 16 अंशापर्यंत किमान तापमानाची नोंद या परिसरात घेण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसासाठी पोषक वातावरण तयार होण्याची शक्यता विभागाने वर्तवली असून, 10 आणि 11 जानेवारी रोजी या भागात हलक्या सरी कोसळण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. राज्यात तापमान दोन ते चार अंशाने घटल्याची नोंद घेण्यात येत आहे. आगामी 24 तासात किमान तापमान वाढणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# देशभरातील हजारो नागरिकांना कोट्यवधीने गंडवणारी टोळी जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

जिओ टॉवर लावण्याच्या मोबदल्यात २५ लाख रुपये आणि नोकरीचे आमिष दाखवून देशातील हजारो नागरिकांना कोट्यवधीने गंडवणाऱ्या टोळीतील तब्बल ४२ जणांना नागपूर ग्रामीण पोलिसांनी अटक केली. त्यांच्या शेकडो बँक खात्यातून कोट्यवधी रुपये आणि शेकडो भ्रमणध्वनी संच पोलिसांनी जप्त केले.

या टोळीत कामठीतील दोन युवकांचा समावेश असून त्यांनी जवळपास दीडशेवर नागरिकांचे बँक खात्याचा वापर कोट्यवधी रुपये उकळण्यासाठी केला. पश्चिम बंगालमधील प्रणव मोंडल, सुभेन्दू मैती व रवींद्रनाथ बॅनर्जी अशी जिओ टॉवर स्कॅमच्या सूत्रधारांची नावे आहेत.

कामठीतील आजनी गावात राहणारा बेरोजगार तरुण वैभव दवंडे आणि नागपुरातील कावरापेठमध्ये राहणारा कमलेश गजभीये हे दोघेही कोलकात्यातील जिओ टॉवर स्कॅम टोळीचे सदस्य बनले. त्यांनी सावनेर, कळमेश्वर तालुक्यात फिरून अनाथ आश्रमांना देणगीचे पैसे घेण्यासाठी बँक खात्याची गरज असून त्या बदल्यात महिन्याला चार हजार रुपये देण्याचे आमिष दाखवले.

चार हजार रुपये महिना मिळणार असल्यामुळे दोन्ही तालुक्यातील शेकडो नागरिकांनी स्वतःचे आधारकार्ड, बँक पासबुक, धनादेश, एटीम कार्ड सर्वच कोलकात्यातील टोळीचे प्रमुख प्रणव मोंडल, सुभेन्दू मैती व रवींद्रनाथ बॅनर्जी यांना पाठवले. त्याने प्रत्येकाला चार हजार रुपये महिन्याला देणे सुरु केले. आरोपींनी प्रफुल सुधाकर गहुकर, प्रफुल शामकांत गणोरकर व प्रतीक दयाराम गहुकर याचेही अशाचप्रकारे खाते उघडले. त्या खात्यांचे एटीएम कार्ड हे कोलकातामधील आरोपी अलाउद्दीन शेख उर्फ श्रीमंत बछर याला पाठविले. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून तिघांच्याही खात्यात प्रत्येक दिवशी जवळपास ५ ते ५० लाख रुपये यायला लागले. त्यामुळे तिघेही बुचकळ्या पडले. त्यांनी सावनेर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल मस्के यांनी बँक खात्याचा गैरवापर केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

## : जिओ टॉवर स्कॅम :

### काय आहे जिओ टॉवर स्कॅम?

आम्ही जिओ कंपनीतून बोलत आहोत. तुमच्या जागेवर जिओ कंपनीचा टॉवर लावू दिल्यास त्याबदल्यात तुम्हाला २५ लाख रुपये खात्यात आणि २० हजार रुपये टॉवरचे भाडे आणि कुटुंबातील एकाला २० हजार रुपयांची नोकरी मिळेल, अशी बतावणी फोनवरुन देशातील अनेकांना करण्यात येत होती.

विश्वास संपादन करण्यासाठी नागरिकांना जिओ कंपनी, डब्ल्यू.एच.ओ., डिपार्टमेन्ट ऑफ टेलीकम्युनिकेश, ट्राई यासारख्या भारत सरकारच्या विभागांचे बनावट कागदपत्रे व्हॉट्स ॲपद्वारे नागरिकांना पाठवत होते.

त्यामुळे अनेक जण त्यांच्या आमिषाला बळी पडत होते. त्यानंतर वेगवेगळ्या नोंदणीच्या नावावर पैशांची मागणी करुन संपूर्ण भारतातील हजारो नागरिकांचे करोडो रुपयांची फसवणूक करण्यात येत होती.

### कॉल सेंटर उभारुन गोरखधंदा

प्रणव मोंडल, सुभेन्दू मैती व रवींद्रनाथ बॅनर्जी यांना देशभरातील नागरिकांना लुबाडायचे होते. त्यामुळे दीप सेन व बाबुदा मैती यांनी नयाबाद शहरात कॉल सेंटर उभारले होते. तेथे १४ पुरूष व १९ महिलांना ३० हजार रुपये महिना देऊन कॉल लावण्याचे काम करण्यात येत होते. नयाबादसारख्या अनेक शहरात बनावट कॉल सेंटर सुरु करुन शेकडो बेरोजगारांना गलेलठ्ठ पगार देऊन लोकांना टॉवर लावण्याचे आमिष दाखवून फसविण्याचा गोरखधंदा सुरु केला होता. पोलिसांनी तब्बल ७ कोटी रुपये, शेकडो भ्रमणध्वनी संच, हजारो सीमकार्ड जप्त केले आहेत.

वैभव दवंडे आणि कमलेश गजभीये यांना सावनेर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांनी कोलकात्याला पाठविलेल्या बँक खात्याची माहिती काढली. त्या बँक खात्यात रोज करोडो रुपयांचे व्यवहार होत असल्याचे लक्षात आले. त्यांनी कोलकात्यातील सिद्धार्थ दास आणि दीप सेन उर्फ सौरव चाकी व बाबुदा उर्फ मनोरंजन मैती यांना नयाबाद शहरातून अटक केली.

हे तिघे कोलकात्यामधील वेगवेगळ्या एटीएम मशिनधून रोज लाखो रुपये काढण्याचे काम करीत होते. प्रणब मोंडल याच्या नातेवाईकांचे नावावर या फसवणुकीतून कमावेल्या कोट्यवधी रुपयांची संपत्ती घेतल्याचे दिसून आले. एका खात्यातून १५ लाख तर त्याच्या वडिलांच्या नावावरील ३६ लाखांची एफडी, महागड्या कार पोलिसांनी जप्त केल्या.

नागपूर
# महासागर वृत्तसागर
■ शुक्रवार, दि. १०, जानेवारी २०२५ ■

# दोन वर्षीय चिमुकलीने आईच्या कुशीत सोडला जीव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :


कामाच्या शोधात आलेले दाम्पत्य विटाभट्टीवर मोलमजुरी करीत होते. कामाच्या ठिकाणी त्यांची दोन वर्षीय चिमुकली खेळत होती. दरम्यान, कामावर उपस्थित चालकाने कार मागे घेतली असता त्या चिमुकलीच्या अंगावरुन कारचे चाक गेले. मुलीची किंकाळी ऐकताच आई धावत गेली.

तिने कारखाली दबलेल्या चिमुकलीला कवेत घेतले. आरडाओरड केली. मात्र, त्या चिमुकलीचा आईच्या कवेतच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना बुधवारी दुपारी दोन वाजता कोराडीत घडली. साधना उईके असे मृत चिमुकलीचे नाव आहे. कोराडी पोलिसांनी कार चालकाविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरादेवी येथे कमल इमले व संजू इमले यांची विटाभट्टी आहे. तेथे अरुण बैसाखू उईके (२५, रा. सोनवारा, जि. शिवनी, मध्यप्रदेश) हे पत्नीसह मजूर म्हणून कामाला आहेत. त्यांना दोन वर्ष वयाची साधना नावाची मुलगी होती. बुधवारी दुपारी अरुण उईके आणि त्यांची पत्नी दोघेही विटाभट्टीवर मातीचा चिखल करत होते. यावेळी, साधना ही त्यांच्या जवळच खेळत होती. विटाभट्टीजवळच आरोपी राजेश हरकू (३५, मूळ गाव शिवणी, मध्यप्रदेश) राहतो. विटभट्टीजवळ उभी असलेली कार (एमएच ४९ सीडी ९९७१) त्याला बाहेर काढायची होती. साधना कारच्या मागे आहे, याची कल्पना नसल्याने राजेशने कार मागे घेतली असता साधना कारखाली दबली. तिचा ओरडण्याचा आवाज ऐकताच तिच्या आईने कारच्या दिशेने धाव घेतली. कारच्या चाकाखाली चिमुकली दबल्याचे दिसून आले. कार पुढे घेऊन साधनाला बाहेर काढण्यात आले.

चिमुकलीला आईने कवेत घेतले आणि तातडीने मेयो रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले. या प्रकरणी साधनाचे वडील अरुण उईके यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोराडी ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक धात्रक यांनी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला.

# प्रत्येक शेतकऱ्याला आधारसारखे मिळणार यूनिक फार्मर आयडी कार्ड




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

देशातील प्रत्येक नागरिकाचा वेगळा आधार आयडी क्रमांक आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याचा एक "यूनिक फार्मर आयडी' तयार केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी "ॲग्रीस्टॅक' योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या यूनिक फार्मर आयडी आणि त्यांच्या लँड रेकॉर्डला जोडण्याची (लिंक करण्याची) मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी दिली आहे.

सध्या त्यासंदर्भात प्रशासकीय पातळीवर तयारी सुरू असून लवकरच राज्यात गाव पातळीवर विशेष कॅम्प आयोजित करून एक कोटी पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे यूनिक फार्मर आयडी तयार केले जाणार आहे.

भविष्यात शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ याच यूनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून मिळणार आहे. तसेच जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यासाठी ही भविष्यात यूनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काही दिवसात महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने शेतकऱ्यांनी यूनिक फार्मर आयडी तयार करून घेणे महत्वाचे ठरणार आहे.

महाराष्ट्र सरकारच्या "ग्रीस्टॅक' योजनेअंतर्गत तयार होणारे यूनिक फार्मर आयडी भविष्यात शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे. पीएम किसान सन्मान योजनेचे अनुदान मिळविणे, किसान क्रेडिट कार्ड बनविणे, पीक विमा काढणे, त्या अंतर्गत परतावा मिळविणे यासाठी यूनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल. शिवाय सरकारने जाहीर केलेली पिकांची नुकसानभरपाई मिळविणे, पीक व शेती विषयक सर्वेक्षण करून घेणे, शेतमालाची एमएसपीच्या दराने विक्री करणे आदींसाठी उपयुक्त आहे.

कृषी विभागाच्या विविध योजना अंतर्गत कृषी निविष्ठा व इतर सेवांचा लाभ मिळविणे. बाजारपेठेची माहिती, कृषी विषयक कामासंदर्भात कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळविणे यासाठी यूनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे.

शेत जमिनीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारासाठी हे यूनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल. एवढेच नाही तर सरकारलाही या यूनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून कोणत्या शेतकऱ्याची कुठे किती जमीन आहे. कोणता शेतकरी कोणकोणत्या योजनांचा लाभ घेत आहे हे सर्व एका क्लिकवर माहित होणार आहे. या यूनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून सरकारला चालू हंगामात राज्यातील किती शेतकऱ्यांनी कोणते पीक घेतले आहे, याची माहिती एका क्लिकवर मिळेल.

यामुळे कृषी विभागाला विशिष्ट पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांना विशिष्ट मार्गदर्शन फोनद्वारे करता येणार आहे. जिओ रेफरन्सिंगचे माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीचे डिजिटल नकाशे उपलब्ध होतील. या योजनेसंदर्भात महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांनी येवून नोंदणीसाठी आधार क्रमांक मागितल्यास सहकार्य करावे अशी सरकारची अपेक्षा आहे.

# प्रभू श्रीरामाच्या प्रतिष्ठापनेची वर्षपूर्ती

## वर्धापनदिन सोहळा तिथीप्रमाणे ११ जानेवारीला



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

अयोध्येतील श्रीराममंदिर प्रतिष्ठापनेचा वर्धापनदिन सोहळा तिथीप्रमाणे ११ जानेवारीला साजरा करण्याचे आवाहन विहिंपने केले आहे. प्रभू श्रीरामाच्या प्रतिष्ठापनेला तिथीप्रमाणे ११ जानेवारीला एक वर्ष पूर्ण होत आहे. मागील वर्षी २२ जानेवारीला असणारी तिथी यावर्षी ११ जानेवारीला आहे. म्हणून शनिवार ११ जानेवारीला वर्धापनदिनी सर्व हिंदू बंधू-भगिनींनी जवळच्या मंदिरात एकत्र येवून रामनामाचा जप करावा संकीर्तन करावे आणि सामूहिक आरती करुन प्रसाद वितरीत करावा तसेच सायंकाळी घराच्या बाहेर पाच दिवे लावावेत असे आवाहन विश्व हिंदू परिषद मुंबई क्षेत्र मंत्री गोविंद शेंडे आणि मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे क्षेत्र संपर्कप्रमुख अनिल सांबरे यांनी केले आहे. करोडो तास लाखो दिवस असंख्य महिने जवळपास ७६ लढाया, लाखो हिंदूंच्या बलिदानानंतर आणि ४९६ वर्षाच्या संघर्षानंतर हिंदू समाजाचा आत्मसन्मान २२ जानेवारी २०२४ ला परत मिळाला. अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व सरसंघचालक मोहन भागवत आणि हजारो संतमहंतांच्या उपस्थितीत २२ जानेवारी २०२४ ला बालरूपातील रामललाची प्रतिष्ठापना झाली. भारतासह संपूर्ण जगात जगात जिथे जिथे हिंदु राहतात त्यांनी हा आनंदोत्सव विविध पद्धतीने साजरा केला.

# चिखली पुलावर ट्रकने दोघांना चिरडले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

शहरात जीवघेण्या अपघातांची मालिका सातत्याने सुरू आहे. पोलिस आयुक्त सिंगल यांनी वाहतूक विभागाला अपघातस्थळांची पाहणी करण्यासोबतच उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र अपघात थांबविण्यासाठी उपाययोजना करण्यात पोलिस विभाग सपशेल अपयशी ठरत आहे. गतवर्षी संपूर्ण शहरात 1 हजाराहून अधिक लहान-मोठे रस्ते अपघात झाले. या अपघातांमध्ये 345 जणांचा जीव गेला. दरम्यान कळमना ठाण्यांतर्गत चिखली पुलावर आणखी एक अपघाताची भीषण घटना घडली. भरधाव ट्रकच्या चालकाने दुचाकीने जात असलेल्या दोघांना चाकाखाली चिरडले. यात दोघांचाही घटना स्थळीच मृत्यू झाला. गुलाब तुकाराम भजनकर (53) रा. बिनाकी लेआऊट, कांजी हाऊस चौक आणि महादेव विठोबा सहारे (45) रा. अडम, कुही अशी मृतांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी 1.30 वाजताच्या सुमारास गुलाब आणि महादेव एमएच-40/एबी-1705 क्रमांकाच्या मोटारसायकलने कळमना येथून यशोधरानगरकडे जात होते. चिखली पुलावर आरटीओ कार्यालयापुढे ट्रक क्र. एमएच-40/बीएल-4301 च्य चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली.

# अमित विद्यामंदिर हायस्कूलच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग



आरोपी दिपक नामदेव चौधरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

उदयनगर मानेवाडा येथील अमित विद्या मंदिर हायस्कूल मधील दहाव्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर त्याच शाळेतील दीपक नामदेव चौधरी या शिक्षकाने विनयभंग केल्याची घटना 16 डिसेंबरला उघडकीस आली. 16 डिसेंबरला काही कारणास्तव विज्ञान शिकविणाऱ्या शिक्षकाने पिडीतेला अडगळीच्या खोलीत बोलावून तिचा विनयभंग केला. ही आपबिती पिडीतीने तेथील शिक्षिका व मुख्याध्यापकांना सांगितली.

त्यानंतर आई पर्यंत ही गोष्ट पोहोचल्यावर आईने आरोपी विरुद्ध हुडकेश्वर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. पोलीस कारवाई अंतर्गत आरोपीवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला त्याच दिवशी अटक करण्यात आली. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आरोपीवर शिक्षा लागू होईल. अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदा दंडवते यांनी दिली. अमित विद्या मंदिर येथे मुख्याध्यापकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. येथील एका शिक्षिकेला विचारणा केली असता पीडित मुलगी मानसिकरित्या सामान्य असून नियमित शाळेत येत असल्याची माहिती मिळाली. त्यांच्या आमिषाला बळी पडत होते. त्यानंतर वेगवेगळ्या नोंदणीच्या नावावर पैशांची मागणी करून संपूर्ण भारतातील हजारो नागरिकांचे कोट्यवधी रुपयांनी फसवणूक करण्यात येत होती.

## असे फुटले टोळीचे बींग

वैभव दवंडे आणि कमलेश गजभीये यांना सावनेर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांनी कोलकात्याला पाठविलेल्या बँक खात्याची माहिती काढली. त्या सर्व बँक खात्यात रोज करोडो रुपयांचे व्यवहार होत असल्याचे लक्षात आले. त्यांनी कोलकात्यातील सिद्धार्थ दास आणि दीप सेन उर्फ सौरव चाकी व बाबुदा उर्फ मनोरंजन मैती यांना नयाबाद शहरातून अटक केली. हे तिघे कोलकात्यामधील वेगवेगळ्या एटीएम मशिनधून रोज लाखो रुपये काढण्याचे काम करीत होते. प्रणब मोंडल याच्या नातेवाईकांचे नावावर या फसवणुकीतून कमावेल्या कोट्यवधी रुपयांची संपत्ती घेतल्याचे दिसून आले. एका खात्यातून 15 लाख तर वडिलांच्या नावावरील 36 लाखांची एफडी, महागड्या कार पोलिसांनी जप्त केल्या.

# शासकीय कर्मऱ्याच्या मृत्यूनंतर कुटुंब निवृत्तवेतन प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियमाप्रमाणे कुटुंब निवृनिवेतनाबाबत तरतूदी नमूद करण्यात आल्या आहेत. सध्याच्या पध्दतीनुसार शासकीय कर्मचारी व त्याच्या प्रथम वारस (पती / पत्नी) यांच्या मृत्यू नंतर अविवाहित मुलगी २४ वषार्ची होईपर्यंत कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान करण्यात येते. तसेच अपंगत्व असलेल्या पाल्याला हयातभर कुटुंब निवृत्तीवेतन न मिळण्याची तरतूद आहे.

मुलगी घटोस्फोटित असेल व स्वतःचा उदरनिर्वाह करू शकत नसेल तर अशा प्रकरणात केंद्र शासनाने शासकीय कर्मचाऱ्याच्या वारसांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना कुटुंब निवृत्ती वेतन प्रदान करण्याबाबत नियमात सुधारणा केली आहे. त्याचे परिपत्रकही जारी केले आहे. त्यानुसार अविवाहित, घटस्फोटित मुलींना अटी व शर्तीवर निवृत्ती वेतन प्रदान करण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्मचारी ज्यावेळी निवृत्त होईल त्यावेळी त्याने मूळ निवृत्ती वेतन पत्रकात पात्र वारसदारांचा समावेश करावा. लागेल या शिवाय अनेक कागदोपत्री पूर्तता करावी लागणार आहे. मुलगी घटस्फोटित असेल तर कायदेशीर घटस्फोटाची सर्व कागदपत्रे कर्मचाऱ्यांना जोडावी लागेल त्याच प्रमाणे मुलगी अपंग असेल तरी त्याबाबतचे सर्व प्रमाणपत्रे, जन्माचा दाखला व तत्सम कागदपत्रे कर्मचाऱ्यांना त्यांच्या निवृत्ती वेतन पत्रिकेसोबत जोडावे लागणार आहे.

# फटाके फोडणाऱ्या बुलेटचालकावर कारवाईचा धडाका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

गेल्या काही दिवसांपासून नागपूरकर बुलेटस्वारांच्या फटाक्यांनी त्रस्त झाले होते. अनेक जेष्ठांनी आणि महिलांनी पोलिसांकडे तक्रारी केल्या होत्या. तसेच काही रुग्णालयांनीही पोलिसांकडे बुलेटच्या फट्ट आवाजाबाबत आक्षेप घेतला होता.

त्यामुळे पोलीस आयुक्तांनी बुलेटच्या फटाक्यांना गांभीर्याने घेत सायलेंसरमध्ये बदल करुन फटाके फोडणाऱ्या बुलेटचालकावर कारवाईचा धडाका सुरु केला. पाच दिवस राबविलेल्या मोहिमेत पाचशेवर सायलेंसर जप्त केले. संविधान चौकात जप्त सायलेंसरवर रोडरोलर फिरवून ते नष्ट करण्यात आले. विशेष म्हणजे, काही सायलेंसर एवढे मजबूत होते की, अनेकदा रोडरोलर फिरवूनही ते वाकले नाही. पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांच्या



उपस्थितीत सायलेंसर नष्ट करण्यात आले.

अलिकडे बुलेट चालविण्यापेक्षा फटाके फोडण्याकडे तरुणाईचा कल अधिक वाढला आहे. बुलेटच्या सायलेंसरमध्ये बदल करून रस्त्याने फटाके फोडत जातात. बुलेटच्या फटाक्यामुळे रस्त्यावर वाहन चालवणाऱ्या किंवा पायी जाणाऱ्यांच्या हृदयात मोठी धडकी भरते. अचानक फट्ट असा आवाज झाल्याने समोरचा वाहनचालक दचकतो, त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही गंभीर बाब लक्षात घेता वाहतूक पोलीस उपायुक्त अर्चित चांडक यांनी शहरातील सर्व दहा परिमंडळात मोहिम राबविण्याचे निर्देश दिले.

५ ते ९ जानेवारी या पाच दिवसात वाहतूक पोलिसांनी फटाके फोडणाऱ्या बुलेट चालकांवर कारवाई केली. बदल करून लावण्यात आलेले ४४० सायलेंसर जप्त केले आणि संविधान चौकात रोडरोलरने सायलेंसर तसेच वाहन चालकांवर दंड ठोठावला. सध्या काही वाहन पोलिसांच्या ताब्यात असून मुळ सायलेन्सर आणल्यानंतरच वाहन देण्यात येतील. यानंतरही सायलेंसरमध्ये बदल करून वाहन चालविल्यास पुन्हा अशाच प्रकारची कारवाई राबविण्यात येणार आहे. शहरात अशा प्रकारची ही पहिलीच कारवाई आहे.

४४० वाहन चालकांकडून तब्बल ३ लाख ९७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात याप्रसंगी सह पोलीस आयुक्त निसार तांबोळी, पोलीस उपायुक्त अर्चित चांडक, सहायक आयुक्त कल्पना बाविस्कर, पोलीस निरीक्षक आणि अंमलदार उपस्थित होते. टिळक विद्यालय, धंतोली येथील विद्यार्थीसुंध्दा उपस्थित झाले होते.

### गॅरेजमालकांना नोटीस बजावणार

शोरूममधून बुलेट खरेदी केल्यानंतर काही मेकॅनिककडे जाऊन त्यात आवश्यक ते बदल करून घेतात. अशा गॅरेजमालकांना नोटीस बजावण्यात येणार सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन पाळावे. नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाते. असा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

### वाहतूक परिमंडळनिहाय कारवाई

सायलेंसरमध्ये बदल करून फटाके फोडणाऱ्या बुलेटचालकावर वाहतूक परिमंडळ निहाय कारवाई करण्यात आली. एमआयडीसी- ४२, सोनेगाव- ४०, सीताबर्डी- ५२, सदर - ७१, कॉटन मार्केट- ३७, लकडगंज - ३१, अजनी ३६, सक्करदरा- ३९, इंदोरा- ३३ आणि कामठी परिमंडळाअंतर्गत ५९ वाहनांवर कारवाई करण्यात आली.

# महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना

## ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळवा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. 1 जानेवारी ते 31 मे 2025 या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.

ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी 1 एप्रिल 2024 पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे 1 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024 या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही. ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे.

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ॲपची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर 0.25 टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात 70 टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत तर नागपूर परिमंडलात मासिक सरासरी 9.69 लाख ग्राहक 229 कोटी 18 लाख रुपयांचा ऑनलाईन पद्धतीने वीज बिलांचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी आणि ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर एप्रिल, मे व जून 2025 या प्रत्येक महिन्यात एक प्रमाणे तीन लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येणार आहेत. प्रत्येक लकी ड्रामध्ये पाच विजेत्यांना स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच ही बक्षिसे दिली जाणार आहेत. योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळास द्यावी, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# पोलिस ठाण्याचे शस्त्रागार पाहून विद्यार्थी चकीत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

मुलाने हट्ट धरला की पोलिस पकडून नेतात, अशी भीती आई दाखवते आणि मुलगा शांत होतो. त्यामुळे बालपणापासूनच मुलांच्या मनात पोलिसांविषयी भीती असते. पोलिस नागरिकांचे मित्र आहेत. ते सुद्धा कोणाचे वडील आहेत. त्यांना सुद्धा मुले आहेत. पोलिस सज्जनांचे रक्षणच करते हे सांगण्यासोबतच पोलिस ठाण्याची ओळख करून देण्यासाठी अंबाझरी ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गोल्हे यांनी विद्यार्थांना ठाण्यात बोलावून त्यांच्याशी सकारात्मक संवाद साधला. ठाण्यातील शस्त्रागार, पोलिस कोठडी आणि पोलिसांची कामाची पद्धत पाहून विद्यार्थी चकित झाले सोबतच त्यांना प्रेरणा मिळाली. विशेष म्हणजे सहृदयता पाहून पोलिसांविषयी आदराची भावना निर्माण झाली.

पोलिस स्थापनादिनाचे औचित्य साधून अंबाझरी ठाण्याचे वपोनि गोल्हे यांनी वाल्मिकीनगर हिंदी माध्यमिक शाळा, गांधीनगर येथे कार्यक्रम आयोजित केला. यावेळी मुलांना पोलिस स्थापना दिनाचे महत्त्व पटवून सांगितले. तसेच गुड आणि बॅड टच विषयी सखोल माहिती देण्यात आली. कुटुंबात, समाजात वाईट पद्धतीने कोणी स्पर्श करीत असेल तर आई बाबांना सांगा. यावेळी महिला सक्षमीकरणाची माहितीही देण्यात आली. अलिकडे सायबर गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे, त्याअनुषंगाने माहिती देण्यात आली. विशेष म्हणजे स्पर्धेच्या युगात टिकाव धरून राहण्यासाठी मुलांनी स्पर्धा परिक्षांकडे वळावे असे आवाहन गोल्हे यांनी केले. 25 जानेवारीला आयोजित टायगर रन मॅरेथॉनची माहिती देण्यात आली. यावेळी सी. पी. अँड बेरार विद्यालय, रविनगर, या शाळेतील विद्यार्थ्यांना अंबाझरी ठाण्यात बोलावून सकारात्मक संवाद साधला.

# वृद्ध आई-वडिलांना घरातून हाकलले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

ज्या वृक्षाच्या सावलीत ते मोठे झाले, ज्या वृक्षाची फळे चाखली, आज तेच वृक्ष त्यांना नकोसे झाले आहेत. फळ देत नाही म्हणून त्या वटवृक्षाविषयी अत्यंत घृणा निर्माण झाली आहे. वटवृक्ष कधी कोसळून पडतील, याची ते प्रतीक्षा करीत आहेत. चांदोबाची गाणी ऐकून झोपी जाणाऱ्यांना आज एक शब्दही ऐकण्याची इच्छा नाही. ज्याला बोट धरून चालणे शिकविले, त्याच मुलाने आधार सोडला, हे शब्द आहेत एका वृद्ध मातेचे.

पोलिस आयुक्तालयातर्फे आई-वडिलांचा व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम 2007 संबंधी तक्रारी व समस्यांचे निवारण आणि तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन कार्यक्रम पोलिस भवनात आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी मोठ्या प्रमाणावर आलेल्या वरिष्ठ नागरिकांनी तक्रारी मांडल्या. चोवीसपैकी तीन तक्रारींचा निपटार जागीच करण्यात आला. डोळे मिटेपर्यंत जी प्रेम करते, तिला आई म्हणतात आणि डोळ्यात प्रेम न दाखविता जो प्रेम करतो त्याला वडील म्हणतात.

परमेश्वराच्या रूपात असलेल्या आई-वडिलांशी अतिशय निर्दयपणे वागणाऱ्या मुलाची तक्रार देण्यासाठी वृद्ध माता पोलिस आयुक्त कार्यालयात आली आणि ढसाढसा रडून वेदना सांगत होती. तिच्या तोंडून शब्दही निघत नव्हता. सुशीला जैस्वाल (76) रा. गिट्टीखदान असे त्या वृद्ध मातेचे नाव आहे. त्यांना दोन मुले आहेत. एक लष्करातून निवृत्त झाला आहे, तर दुसरा ऑटोरिक्षा चालवतो. दोघेही मिळून आईचा सांभाळ करू शकतात. मात्र, त्यांना जन्मदाती आई नकोशी झाली आहे. पर्याय नसल्याने सुशीलाची लहान बहीण कल्पना तिचा सांभाळ करते. पण तिलाही मयार्दा आहेत. भूक हा आजार असेल तर अन्न हे उपचार आहे.

मात्र, सर्व काही असतानाही तो उपचार मला मिळत नाही अशी खंत व्यक्त करीत उलट मारहाण केली जाते, अशी तक्रारही तिने यावेळी केली. अलीकडेच मुलाने मारहाण केल्याने बहीण कल्पना हिने रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयातून सुटी झाल्यावर मुलाच्या घरी सोडले. मात्र, मुलगा पुन्हा बहिणीच्या घराबाहेर सोडून निघून गेला.

## सून व मुलाविरुद्ध गुन्हा दाखल

वृद्ध वडिलांना मारहाण करीत घरातून हाकलणारा मुलगा आणि सुनेविरुद्ध अजनी पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. घर ताब्यात घेण्याच्या उद्देशातून अनेक दिवसांपासून मुलगा आणि सून वृद्ध आई-वडिलांना त्रास देत आहेत. या प्रकरणी पोलिसांनी ताराचंद बोरकर रा. कुंजीलालपेठ यांच्या तक्रारीवरून सून आणि दोन मुलांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# शेतातून कापूस चोरणारा आरोपी हिंगणा पोलिसांच्या जाळ्यात




■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ९ :

शेतातून कापूस चोरून विकण्याच्या तयारीत असलेल्या एका आरोपीला हिंगणा पोलिसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले आणि तब्बल २० दिवसानंतर शेतकऱ्याला त्याचा ४०० किलो कापूस परत मिळवून दिला.

आरोपी सचिन गुलाब मेश्राम (वय २४ )वर्ष रा. आठवा मैल वाडी नागपूर (मूळ गाव कुही,जि नागपूर असे आरोपीचे नाव असून तो मिनी ट्रकचा चालक आहे. तो अमरावती कडून गाडी घेऊन घराकडे परत येत असताना मंगरूळ येथील शेतकरी विलास थोटे यांनी खैरी शिवारातील शेतात कापूस वेचून गठ्ठे बांधून ठेवला होता. आरोपीने तो कापूस आपल्या मिनी ट्रकमध्ये भरून आठवा मैल येथील त्याच्या किरायाच्या खोलीत नेऊन ठेवला. इकडे शेतातून कापूस चोरीला गेल्याची तक्रार हिंगणा पोलिसांना मिळताच ते चोराच्या शोधात होते. एक मिनिट्रक चालक कापूस विकायला ग्राहक शोधत असल्याची पोलिसांना गुप्त माहिती मिळाली. त्या आधारे हिंगणा पोलीस ठाण्यातील कर्मचारी ग्राहक बनून तिथे गेले व आरोपीसह त्याच्या खोलीत ठेवलेले १२ कापसाची गाठोडे ज्याचे ४०० किलो वजन आहे. असा २८ हजाराचा मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेला एक मिनी ट्रक क्रमांक एम एच४०एफ सी ५०५२ किंमत ९ लाख एकूण ९२८००० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी विरोधात अप. क्र.487/24 कलम 303(2) भा.न्या.सं. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल, उपायुक्त लोहित मतानी, सहा पोलीस आयुक्त सतीश गुरव यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार जितेंद्र बोबडे व ठाण्यातील तपास पथक प्रमुख सपोनि संतोष राठोड, अनिल झाडें, संजीव तायडे यांनी हा गुन्हा उघडकीस आणला. पुढील तपास सुरु आहे.

## पोलीस अधिकारी ज्येष्ठांच्या दारी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

आज एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढती आहे. ही समस्या केवळ आपल्या देशाची नाहीतर जागतिक समस्या बनलेली आहे. अशा पार्श्वभूमीवर नागपूर परिमंडळ ४ च्या पोलिसांनी वृद्धांना मदत करण्यासाठी त्यांची काळजी घेण्यासाठी पुढाकार घेतला आहे. ज्येष्ठांच्या अडीअडचणीला पोलीस धावून जाणार आहे. या उपक्रमांतर्गत हुडकेश्वर,अजनी विभाग, सहायक पोलिस आयुक्त, विनायक कोते यांनी फेस्कॉम, पूर्व विदर्भ प्रादेशिक विभागाचे सचिव डॉ. दीपक शेंडेकर यांच्या मदतीने लोकमंच ज्येष्ठ नागरिक मंडळ, म्हाळगी नगर येथील सदस्यांची भेट घेतली. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांना मदतीचे आश्वासन दिले. ज्येष्ठांमधे आत्मविश्वास जागविला.

# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातर्फे वाचन संस्कृतीचा गजर करणाऱ्या भव्य ग्रंथदिंडीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ९ :

शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी नववर्षाच्या मुहूर्तावर वाचन संकल्प महाराष्ट्राचा व्यापक उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाने उत्साही सहभाग घेतला आहे- वाचन पंधरवड्याच्या निमित्ताने विश्वविद्यालयाने विविध वाचन केन्द्री वाचन प्रोत्साहक , वाचक व लेखक अनुबंध जोपासणारे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. यामध्येच भव्य ग्रंथदिंडीचेही आयोजन डॉ. जिचकार ज्ञानस्रोत केंद्र अर्थात ग्रंथालय विभागातर्फे आज दि १० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता रामटेक येथील विश्वविद्यालय परिसरात करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात असलेल्या श्रीमन्त वाचन संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी, वृद्धिंगत करण्यासाठी आणि पुढील पिढीत संक्रमित करण्यासाठी या ग्रंथदिंडीचे आयोजन विश्वविद्यालयाने विशेषत्वाने केले आहे. या ग्रंथदिंडीचे उद्घाटन कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या विशेष उपस्थितीत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या शुभहस्ते होणार आहे. या ग्रंथ दिंडीत रामटेक व आसपासच्या शाळा व महाविद्यालयातील २००० विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी होणार आहेत. ही ग्रंथदिंडी विश्वविद्यालयाचे मुख्यालय ते रामटेक बस स्थानकापर्यंत काढली जाणार आहे. वाचन संस्कृतीचा प्रसार प्रचार सह विद्यार्थ्यांच्या मनावर वाचनाचे संस्कार व्हावे यासाठी हा विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे.

ग्रंथदिंडीचा प्रारंभ मान्यवरांच्या शुभहस्ते मराठी साहित्याचे लेणे असलेल्या ज्ञानेश्वरी सह विविध ग्रंथांच्या पूजनाने होईल. त्यानंतर ग्रंथदिंडी मार्गस्थ होईल. ग्रंथ दिंडी दरम्यान विद्यार्थ्यांकडून लेझिम नृत्य सादरीकरण, भक्तीगीतांचे गायन तसेच वाचन आणि प्राचीन ज्ञानाचे महत्त्व पटवून देणाऱ्या विविध घोषवाक्यांची घोषणा करण्यात येईल.

कुलगुरू प्रो हरेराम त्रिपाठी आणि कुलसचिव डॉ. देवानंद शुक्ल यांच्या प्रेरणेने तसेच प्रो. कलापिनी अगस्ती यांच्या मार्गदर्शनाखाली, ग्रंथपाल डॉ. दीपक कापडे यांच्या नेतृत्वाखाली आणि विश्वविद्यालयातील सर्वांच्या सहभागानेही भव्य वाचन दिंडी काढण्यात येणार आहे. रामटेक मधील सर्वांनी या ग्रंथदिंडीत उत्साहाने सहभागी व्हावे तसेच रस्त्यात या ग्रंथदिंडीचे स्वागत करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन कुलसचिव डॉ. शुक्ल आणि आयोजक डॉ. कापडे यांनी केले आहे.

# अन्नपुर्णा मारोतीची प्राचीन आकर्षक भव्य मुर्ती

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. ९ :

भिवापूर पासून ४ किमी दूर पुर्वेस मरू नदी परिसरात प्रसिद्ध अन्नपुर्णा मारोतीचे देवस्थान असून सध्या भाविकांची दर्शना करीता एकच गर्दी पहावयास मिळत असून याठिकाणी तालुक्यातील नागरीक कुटूंबियासह सोबत निसर्ग रम्य वातावरणात वनभोजना चा अस्वाद घेतानाचे चित्र पहावयास मिळत असते.

अन्नपुर्णा मारोतीचे देवस्थान मरू नदीच्या पायथ्याशी असून हे स्थळ भंडारा जिल्हयातील पवनी तालुक्यात येत असल्यामुळे हे ठिकाण दुर्लक्षीत आहे. त्यामुळे येथिल परिसराचा विकास व्हावा अशी मागणी भाविका होत आहे. येथे अन्नपुर्णा माँतेचे लहान मंदिर आहे. नवरात्रोत्सवात काही भाविक येथे घटाची स्थापना करीत असतात. या अन्नपुर्णा माँते च्या नावावरच अन्नपुर्णाची जागृत मारोती म्हणुन सर्वदुर परिचीत आहे. प्राचीन अन्नपूर्णाच्या मारोती अशी माहिती सांगितली जाते. की रानाळा तलावात एक मुर्ती पाण्यात तरगतांना दिसली.

काही नागरिकांनी या मुर्तीला बैलगाडीमध्ये आणण्यात येत असतांना अन्नपुर्णा माँते जवळच ही बैलगाडी थांबली व ती पुढे जात नव्हती. अखेर नागरीकांनी या मारोती च्या मुर्तीची स्थापना केली. त्यामुळे या अन्नपुर्णाचा मारोती म्हणुन सर्वत्र ओळख झाली आहे.



याठिकाणी लटारू शिवराम वानखेडे यांनी या मारोती जवळ वयाच्या बऱ्याच वर्षापर्यंत सेवा दिली. त्याचे निधन १५ वर्षापूर्वी झाले. ते १०० वर्षापेक्षा जास्त वर्ष जीवत होते. ते जंगलातून जळीबुटी आणून काही रोगावर चमत्कारीक औषधी उपचारही करीत होते.

अन्नपुर्णाच्या मारोतीची मुर्ती उघड्यावर असल्यामुळे काही भाविक मंडळींनी येथे मंदिराचे बांधकाम, पाण्याच्या सोईकरीता हॅन्डपप लावले सुरक्षा करीता भिंत तयार करण्यात आले. सदरचा परिसर निसर्गरम्य वातावरणाचा असल्यामळे अन्नपूर्णाच्या मारोतीवर श्रद्धा असलेल्या भाविकांची शानिवारी व मंगळवारी भक्ताची पाऊले येथे वळू लागली आहे.

त्यामुळे या दोन दिवसी जणू काही जत्रा भरल्याचे चित्र परिसरात दिसू लागले आहे. सदर मंदिरांच्या बांधकामात नरेश वानखेडे, अनिल राठोड, गोलु पिंपळकर, किशोर नागोशे यांनी पुढाकार घेत लोकवर्गणीतून मंदिराचे बांधकाम पुर्ण केले. यात माजी आमदार राजु पारवे, माजी आमदार सुधीर पारवे यांचे ही मोलाचे सहकार्य लागले असून आझाद चौकातील बऱ्याच नागरीकांचे हातभार लागला आहे.

## निधन

### सरस्वतीबाई राखुंडे



■ नागपूर : नगर पिपला रोड नागपूर येथील लक्ष्मण गणेश राखुंडे व विजय गणेश राखुंडे याच्या आई सरस्वतीबाई राखुंडे यांचे आज गुरुवार ला 09 जानेवारी रोजी सकाळी 11:00 वाजता. दुःखद निधन झाले. त्या मृत्युसमयी 83 वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, सून व चार नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे. अँतिम संस्कार मानेवाडा घाटावर दि.१० जाने. सकाळी 11 वाजता करण्यात येणार आहे.

## कन्हान येथे बाबु एल.एन. हरदास यांना विनम्र अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ९ :

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे अनुयाई आणि जय भीम घोषणेचे जनक बाबु एल एन हरदास यांना समता सैनिक दल कन्हान, कांद्री च्या सैनिकांनी विनम्र अभिवादन करुन जयंती साजरी केली. सोमवार (दि.६) जानेवारी बाबु एल एन हरदास यांच्या जयंती निमित्त समता सैनिक दल कन्हान, कांद्रीच्या सैनिकांनी हरदास घाट कन्हान नदी येथे बाबु एल एन हरदास यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

## आधार ला मोबाईल लिंक करा अन्यथा योजनाचा लाभ घेता येणार नाही : तहसीलदार कोडपे

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ९ :

रामटेक तालुक्यातील संजय गांधी व श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांनी त्यांचा मोबाईल नंबर आधारला लिंग करण्याचे आवाहन रामटेक चे तहसीलदार रमेश कोळपे यांनी केले आहे. या संदभार्तील सूचना नायब तहसीलदार मुकूंद भुरे यांना देण्यात आली आहे.

रामटेक तालुक्यातील संजय गांधी योजना विभागातील श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजना व संजय गांधी निराधार वेतन योजना अंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थ्यांचे अनुदान जानेवारी २०२५ पासून डीबीटीद्वारे वितरीत करण्यात येणार आहे.

त्यामुळे लाभार्थ्यांनी आधार कार्ड व बँक खाते हे मोबाईल नंबरशी लिंक करण्याबाबतची कार्यवाही स्थानीक आधार सेवा केंद्र येथून पूर्ण केली जाणार आहे.

तसेच शिल्लक लाभार्थ्यांनी आधार कार्ड व बँक पासबूकची झेरॉक्स प्रत मोबाईल क्रमांकासह तलाठ्यांकडे ३१ जानेवारी २०२५ पूर्वी जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही प्रक्रिया पूर्ण न करण्या-या लाभार्थ्यांचे अनुदान जमा होणार नसल्याचे नायब तहसीलदार मुकुंद भुरे यांनी सांगीतले आहे.

## स्व. मातादिनलालजी जैस्वाल शाळेत आनंदमेळावा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

दाभा येथील साईनगर मधील स्व. मातादिनलालजी जैस्वाल शाळेत बुधवार ८ जानेवारी रोजी आनंदमेळाव्याचे आयोजन विश्वनाथबाबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्यामकुमार जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली स्व. मातादिनलालजी जैस्वाल संस्थेचे अध्यक्ष राजेश जैस्वाल, सचिव जयकिशोर जैस्वाल, मराठी माध्यमचे मुख्याध्यापक बंडूजी जैस्वाल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शाळेतील वर्ग ५ ते वर्ग ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या पदार्थांचे व खेळाचे स्टॉल लावून आनंदमेळाव्याचा आनंद घेतला.

विद्यार्थ्यांना व्यवहारीक ज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने आनंदमेळाव्याचे आयोजन केल्याचे मुख्याध्यापिका नेहा वासाडे यांनी सांगीतले.क र्यक्रमाला पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहुन स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेऊन मुलांचा उत्साह वाढवला. आयोजनासाठी मुख्याध्यापिका नेहा वासाडे, उपमुख्याध्यापिका सुधा बांगर यांच्या मार्गदर्शनात सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# येरला ग्रामपंचायतमध्ये कामबंद आंदोलन




■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ येरला ग्रामपंचायत मध्ये गुरुवार ९ जानेवारी रोजी कामबंद आंदोलन करुन घटनेचा निषेध करण्यात आला. अखिल भारतीय सरपंच परिषदेने ही बंदची हाक दिली. दरम्यान, सरपंच आणि कर्मचारी संरक्षण कायदा लागू करा, यासह विविध मागण्यांसाठी राज्यातील ग्रामपंचायतींचे कामबंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अशी माहिती सरपंच अनिल काळमेघ यांनी दिली. शासनाने दोषींवर त्वरित कार्यवाही करावी असे सवार्नुमते ठरले. यावेळी येरलाचे सरपंच अनिल काळमेघ, उपसरपंच राजेंद्र अखंड , ग्रा.पं. सदस्य प्रशांत तभाने, छत्रपती झाडे, तेजराज बोढे, लता कुंभरे, कल्पना हेलोंडे, पूनम दहाट, ललिता टेकाम उपस्थित होते.

## भगवती गर्ल्स ज्युनिअर कॉलेजची नंदनवन पोलिस स्टेशनला भेट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

पोलिस स्थापना दिनानिमित्त नंदनवन पोलिस स्टेशनला भगवती गर्ल्स ज्युनिअर कॉलेजच्या मुलींनी भेट दिली. या प्रसंगी नंदनवन पोलिस स्टेशनचे पी आय कोळी यांनी मुलींना मार्गदर्शन केले.

तसेच पोलिस स्टेशनचा कारभार कसा चालतो. गुन्हे नोंदणी विभाग, तपासणी विभाग, दस्तावेज तपासणी विभाग, कंट्रोल रूम, कैदी विभाग,यांच्या कामाकाजा विषयी माहिती दिली. सायबर गुन्हे व हेल्प लाईन नंबर बद्दल माहिती दिली. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी कॉलेजच्या प्राचार्य, बोहरुपी डॉ. दीपा हटवार संजय नागेश्वर,वंदना रेवतकर यांचे सहकार्य लाभले.

# महाविद्यालयातील करिअर कट्टा संसद चमुचे केले आमदारांनी अभिनंदन

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ९ :

राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयातील महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र द्वारा आयोजित करिअर कट्टा या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी चालविल्या जाणा-या मार्गदर्शन केंद्राचे बारामती पुणे येथे आयोजित दि. 12 व 13 जानेवारी 2025 चे अधिवेशनात महाविद्यालयातील करीअर कट्टा संसद चमू सहभागी होत आहे.



अंतिम वर्षाच्या (पदविच्या) दहा विद्याथ्यीर्नींचा यात समावेश आहे. राज्य स्तरावरील अधिवेशनात होत असलेल्या या सहभागाबाबत विभागाचे नवनिर्वाचित आमदार मा. संजय मेश्राम यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या हितासाठी तळमळीने वेळोवेळी त्यांचे पाठीशी ऊभे राहण्यात त्यांना हिताचा सल्ला देण्यात नेहमीच अग्रणी राहिले. ग्रामीण भागातील अभ्यासू व होतकरू विद्यार्थ्यांची त्यांनी घेतलेली दखल सर्वांना ज्ञात आहे. या त्यांच्यातील जाणिवेची याही वेळी त्यांनी ओळख दिली.

अधिवेशनादरम्यान कुठली गरज भासल्यास आपणांस कळवावे असे विद्यार्थ्यांचे कौतुक करतांना ते म्हणाले. महाविद्यालयातील करीअर कट्टा चमुची निवड व त्यांच्या यशस्वी सहभागाकरीता समन्वयक डॉ प्रविण लामखाडे, सहसमन्वयक डॉ गायत्री कुकडे यांनी परीश्रम घेतले निवडीबद्दल महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी अभिनंदन केले.

## ३० लाखांचा नायलॉन मांजा केला नष्ट

नागपूर : परिमंडळ 3 अंतर्गत येणाऱ्या सर्व ठाण्यांकडून जप्त करण्यात आलेला नॉयलॉन मांजा आणि प्लॅस्टिक पतंगसह एकूण 30 लाख रुपये किंमतीचा माल नष्ट करण्यात आला.

महाराष्ट्र पोलिस रेजिंग-डे निमित्त शहर पोलिसांनी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत परिमंडळ 3 अंतर्गत पाचपावली, शांतीनगर, कोतवाली, गणेशपेठ आणि तहसील पोलिसांकडून पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत जप्त करण्यात आलेला नायलॉन मांजा, चकरी, पतंग आदी साहित्य नष्ट करण्याची परवानगी न्यायालयातून घेण्यात आली. परिमंडळ क्र. 3 च्या पोलिस उपायुक्त महक स्वामी, एसीपी श्वेता खाडे आणि तहसीलदार संतोष खांडरे यांच्या उपस्थितीत पाचपावली परिसरात 30 लाखांचा माल एकाचवेळी रोडरोलरखाली नष्ट करण्यात आला. नष्ट झालेला सर्व माल भांडेवाडी डम्पिंग यार्डमध्ये पाठविण्यात आला आहे.


**जाहीरनामा**

नायब तहसीलदार भिवापुर तथा कार्यकारी दंडाधिकारी, कार्यालय भिवापूर
कार्यालय दुरध्वनी :- ०७११६-२४२००४
ई-मेल : tahsilbhiwapur@gmail.com
क्र. प्रस्तु.२/तह. भिवा/कावि-०८/२०२५
दिनांक :- ०८/०१/२०२५

वाचा :- १) भारत सरकार निधी वन्यविभाग यांचे कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र २) जन्म मृत्युनोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ (२०२३ चा २०) च्याखंड १ आणि उपखंड २ ३) मा. जिल्हादंडाधिकारी नागपूर यांचे सुधारित आदेश क. अका/डी-१/जन्म-मृत्यु आदेश/कावी-१५८/२०२४ दिनांक ११/०५/२०२४

ज्याअर्थी अर्जदार श्री / श्रीमती. शांताबाई शामराव नन्नावरे रा. वडाळा ता. चिमुर, जि. चंद्रपूर यांनी त्यांचे नामे कुमारी. झिंगाबाई नारायण डडमल रा. मांगरुड जन्माची नोंद ग्राम पंचायत मांगरुड येथे दप्तरी घेणे करिता निदेर्शित करणे कामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांनी शपत पत्र सादर केले असुन शपतपत्रानुसार त्यांचा जन्म दिनांक १५/०७/१९६८ रोजी मौजा मांगरुड ता. भिवापूर जि. नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी. नायब तहसीलदार, भिवापूर उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीच्या जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह नायब तहसीलदार, भिवापूर यांचे न्यायालयात स्वतः जातीने वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरित पुरावा प्रापा न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

- स्वा -
नायब तहसीलदार
भिवापुर

**जाहीरनामा**

कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय
प्र.क्र. / एम आर सी-८१/२०२४
मौजा भिलेवाडा ता. रामटेक
जिल्हा नागपूर

ज्याअर्थी प्रकाश वसंता जुवार राह.पो.भिलेवाडा ता. रामटेक जि. नागपूर यांनी स्वतः नामे प्रकाश वसंता जुवार याचा जन्म दिनांक १३.०६.१९९१ रोजी मौजा भिलेवाडा ता. रामटेक जि. नागपूर येथे झाला असुन जन्मची नोंद निबंधक, ग्रामपंचायत भिलेवाडा येथे केली नाही. त्याबाबत निबंधक, ग्रामपंचायत भिलेवाडा यानी दिनांक २०.१२.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे प्रकाश वसंता जुवार यांचा जन्म दिनांक १३.०६.१९९१ बाबत निबंधक, ग्रामपंचायत भिलेवाडा येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद प्रकाश वसंता जुवार यांचा जन्म दिनांक १३.०६.१९९१ बाबत निबंधक, ग्रामपंचायत भिलेवाडा येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक १७/०१/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तकार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा, आज दिनांक ३०/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.
स्थळ :- रामटेक
दिनांक : ३०/१२/२०२४

स्वा/-
(भोजराज बडवाईक)
नायब तहसिलदार, रामटेक

**-: जाहिरनामा :-**

कोर्ट विद्यमान सुनिल साळवे नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपुर शहर, यांचे कार्यालय, जिल्हा नागपूर.
Email: www.tahsildarngpcity@gmail.
Ph No. 0712-2561975
क.ली/प्रस्तु-२/तह.नाग (शहर)/प्र.क्र. ३९५/कावि -२९/२०२४
दि.:०७/०१/२०२५

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५/२०२३ दिनांक १५.१०.२०२३ ५) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि १५८/२०२४ दिनांक ११.०५.२०२४ ६) श्री सुरज भोलाजी बैसवारे, रा. बैराजी पुरा, नाईक तलाव ईतवारी नागपूर यांचा अर्ज दिनांक २६/१२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार श्री सुरज भोलाजी बैसवारे, रा. बैराजी पुरा, नाईक तलाव ईतवारी नागपूर यांनी यांचा मुलाच्या जन्मची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू कु. रुतेश सुरज बैसवारे यांचा जन्म दिनांक १५/०९/२००६ रोजी राहत्या घरी नाईक तलाव, ईतवारी नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २,३,४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्व:त जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

नायब तहसिलदार
जिल्हा नागपूर.

**जाहिर सुचना** RTK-88/25 Dt. 9/1/2025

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक यांच्या न्यायालयातील एम.जे.सी. नं. २१/२०२२

पेशी ता. ११/०२/२०२५ प्रोसेस नं.......... दि............
अर्जदार :- १. श्री सुनिल महादेव धामगाये, वय ५७, रा. आमगाव त. रामटेक जि. नागपुर
२. शांता संजय साहारे, वय ४३, बौध्दविहार जुनी कामठी रोड शांती नगर कावळपेट नागपुर-४०००२
३. सुनिता पुरुषोत्तम डोंगरे, वय ३९, रा. राधादेवी दवामी छिंदवाडा लोहंगी एम.पी-४८०१०६
---- विरुध्द ----
प्रतिवादी : कोणीही नाही
मयतदार : श्रीमती कौशल महादेव धामगाये मयत दि. ३०/०८/२०२४
ग्राम पंचयात नवरगाव रामटेक

सदरहू अर्जदाराने इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ चे कलम ३७२ अन्वये या न्यायालयात सक्सेशन सर्टीफिकेट मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने मयतदार श्रीमती कौशल महादेव धामगाये यांचे वारस क्र. १ श्री सुनिल महादेव धामगाये रा. आमगाव त. रामटेक जि. नागपुर २. शांता वि. संजय साहारे बौध्दविहार जुनी कामठी शांती नगर कावळपेट नागपुर-४०००२ ३. सुनिता पुरुषोत्तम डोंगरे रा. राधादेवी दवामी छिंदवाडा लोहंगी एम. पी.-४८०१०६ यांनी मयतदाराच्या बँक ऑफ इंडिया शाखा शितलवाडी ता. रामटेक जि. नागपूर याच्या बचत खाता न. ८७४४१०१०००२९२१ जमा रक्कम १७,१७०.३६/- रुपेय काढण्या विषयक सक्सेशन सर्टीफिकेट मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख ११/०२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर मयतदाराच्या नावे असलेल्या जमा रक्कम बाबत जर कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारेखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला सक्सेशन सर्टीफिकेट मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि ०८/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिला.

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक

**जाहिर सुचना** RTK-87/25 Dt. 9/1/2025

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक यांच्या न्यायालयातील एम.जे.सी. नं. ०१/२०२२

पेशी ता. १७/०२/२०२५ प्रोसेस नं.......... दि............
अर्जदार - १. श्रीमती जयवंती वि. गोपीचंद सलामे, वय - ७६, व्यवसाय - घरकाम
२. श्री. ताराचंद गोपीचंद सलामे वय - ५९
३. श्रीमती कौसल वि. सहदेव कोकोडे वय - ५२
४. श्री बलदेव गोपीचंद सलामे वय - ४७
५. श्री. जलदेव गोपीचंद सलामे वय - ४४
६. श्रीमती वच्छला वि. राजेंद्र मडावी वय - ३८
सर्व रा. सालई मेटा पो. सिवनी त. रामटेक जि. नागपुर
--विरुध्द --
प्रतिवादी:- कोणीही नाही
मयतदार : गोपीचंद कवडू सलामे मयत दि. ३०/०५/२०२४
सालई मेटा पो. सिवनी त. रामटेक जि. नागपुर

सदरहू, अर्जदाराने नियम २ प्रकरण १ मुंबई विनीमयम अधिनियम १८२७ सह कलम ३९० भारतीय वरसाहक्क अधिनियम १९२५ अंतर्गत या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र निळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने मयतदार गोपीचंद कवडू सलामे यांचे वारस क्र. १ श्रीमती जयवती वि. गोपीचंद सलामे २.श्री ताराचंद गोपीचंद सलामे ३. श्रीमती कौसल वि सहदेव कोकोडे ४ श्री बलदेट गोपीचंद सलामे ५ श्री जलदेव गोपीचंद सलामे ६. श्रीमती वच्छला वि राजेंद्र मडावी सर्व रा सातई मेटा पो सिवनी त. रामटेक जि नागपुर यांची कायदेशीर वारस असल्याबाबत वारतान प्रमाणपत्र मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख १७/०२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर मयतदाराच्या कायदेशीर वारसान प्रमाणपत्र बाबत जर कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्यांनी आपला उजर पेशी तारेखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. ०८/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिला.

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक

# सावनेरला मॉडेल सिटी बनवणार : आ.डॉ.आशिष देशमुख

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. ९ :

"आपण सर्वांनी मला खूप खूप आशीर्वाद दिले. त्या प्रेमासाठी, त्या आशीर्वादासाठी, त्या एवढ्या सगळ्या मतदानासाठी मी तुमच्यापुढे हात जोडून इथे आभार व्यक्त करतो. यापुर्वी सावनेर विधानसभा क्षेत्रात जोर जबरदस्तीचं, दबावाचं, गुंडागर्दीचे, अवैध व्यवसायाचे, चुकीच्या लोकांना सोबत घेऊन जनसामान्यांना त्रास देण्याचे राजकारण झाले.



आता आपल्याला सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्रात चांगल्या संस्कृतीचं, चांगल्या विचारांचं, चांगल्या विकास कामांचं राजकारण करायचं आहे. मी तुम्हाला आवर्जून सांगू इच्छितो की, तुमचा भाऊ म्हणून, तुमचा मुलगा म्हणून मी प्रेमाने, जिव्हाळ्याने, आपुलकीने तुमची सर्वांची सेवा करीन. आपल्या प्रत्येक मताची परतफेड विकासकामांच्या माध्यमातून, जनहित कामांच्या माध्यमातून येणाऱ्या काळामध्ये करून दाखवण्याची जिद्द माझ्या मनामध्ये आहे. त्यासाठी दिवस रात्र आपण मेहनत करतो आहे. सावनेर-कळमेश्वर क्षेत्रामध्ये असलेल्या पोटेन्शिअलच्या माध्यमातून या विदर्भातच नव्हे तर या महाराष्ट्रामध्ये या विधानसभा क्षेत्राला एक नंबर करण्यासाठी आपण सर्वजण काम करू.

मला इथे विचारण्यात आले की, समजा केदार साहेब लढले असते तर काय झालं असतं? मी तुम्हाला सांगू इच्छितो की, आमची नाराजी वहिनींबद्दल नाही. त्या 26 हजार मतांनी पडल्या. पण साहेब उभे राहिले असते तर 50 हजार पेक्षा जास्त मतांनी पडले असते. एका व्यक्तीमुळे आपल्या सावनेरला महाराष्ट्रामध्येच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये खाली पाहण्याची वेळ आली.

आपल्याला आता नव्या दमाने, नव्या जिद्दीने विकासाचा संकल्प घेऊन या क्षेत्राचे नाव मोठे करायचे आहे. चांगलं काम करू, लोकांची चांगली सेवा करू आणि त्यामुळे तुम्हाला गर्व होईल की, तुम्ही सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्राचे निवासी आहात.

निवडणुकीनंतर मुंबई येथे मंत्रालयातल्या बऱ्याच अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि आपल्या या सावनेरला येणाऱ्या काळामध्ये सावनेर मॉडेल सिटी बनवायचे प्रयत्न सुरू केले. मागच्या 30 वर्षापासून भकास झालेल्या आपल्या सावनेर शहराची परिस्थिती बदलायची आहे. ती बदलण्याच्या दृष्टीने आपल्या सावनेरमध्ये चांगले असे मार्केट, नदीचे सौंदर्यीकरण, मुलांना खेळण्यासाठी चांगल्या सुविधा, क्रीडा संकुल, वाचनालय यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहे.

सावनेरचा डीपी मंजूर करतो आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपूर जिल्ह्यातील असल्यामुळे आपल्याला हवी ती मदत त्यांच्याकडून घेता येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, परीवहन मंत्री नितीन गडकरी आणि संपूर्ण केंद्र व राज्य सरकार हे त्यानिमित्ताने आपली ताकद आहे. आणि याच भरोशावर तीस वर्षापासून मागास राहिलेल्या आपल्या सावनेरला येणाऱ्या काळामध्ये सावनेर मॉडेल सिटी नक्कीच बनवायचे आहे.

गुमगाव येथे मॉईलची खाण आहे. या भागात फेरो अलॉईजचा कारखाना निर्माण करण्यासाठी यशस्वीरित्या प्रयत्नशील आहे. या कारखान्यासाठी सहमतीदेखील मिळाली आहे. यासाठी कमी दरात वीज उपलब्ध करून दिली तर कारखान्यासाठी फार मोठी मदत होईल. त्यामुळे खापा भागातील आपल्या तरुणांना, तरुणींना नक्कीच रोजगार मिळेल. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना रोजगार, बाजारपेठ आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्याचा आपला प्रयत्न आहे.

पाटणसावंगीचा टोल महिन्याभरात हटणार. 17 जानेवारीला नगर परिषद सावनेर येथे जनता दरबार आयोजित करणार. दर शुक्रवारी सावनेर येथील कार्यालयात स्वतः उपलब्ध राहणार. येणाऱ्या काळात नगर परिषद, जिल्हा परिषद व पंचायत समित्या जिंकणार. जनतेच्या सूचनांनुसार विकास कामे करणार", असे प्रतिपादन सावनेर-कळमेश्वर क्षेत्राचे भाजपाचे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी केले. 08 जानेवारी 2025 ला सावनेर येथे आयोजित आभार सभेत ते बोलत होते.

आभार सभेच्या सुरूवातीला भाजप पदाधिकारी द्वारे आ.डॉ. आशिषराव देशमुख यांचे भला मोठा हार घालून स्वागत करण्यात आले. यावेळी मंचावर माजी जिप अध्यक्ष अशोक धोटे डॉ. आयुश्री देशमुख, भाजप सावनेर विधानसभा प्रभारी डॉ. राजीव पोतदार, सावनेर विकास आघाडीचे नेते अँड अरविंद लोधी अँड. प्रकाश टेकाडे, किशोर चौधरी, नागपूर जिल्हा सचीव रामराव मोवाडे, सावनेर शहर अध्यक्ष राजू घुगल, माजी नगरसेवक सुजीत बागडे, आशीष फुटाने अँड. शैलेष जैन, माजी जि.प. उपसभापती मनोहर कुंभारे, तुषार उमाटे, पियुष बुरडे, प्रफुल मोहटे, महेश चकोले, दिगांबर सुरतकर, भाजप उपाध्यक्ष राजु भुजाडे दिलीप धोटे सह अनेकांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचा यशस्वीतेसाठी सुधाकर तिबोले, बंटी महाजन, मनीष खंगारे, विनोद बागडे सचीन उइके, अनंता पडाळ, यांनी मोलाचे परीश्रम केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहराध्यक्ष राजु घुगल, संचालन सोनु नवधिंगे व आभारप्रदर्शन अँड शैलेश जैन यांनी केले. आभार सभेला हजारों संख्येने भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# दत्तवाडीत भव्य कलश यात्रेने पावन प्रज्ञा पुराण कथेचा प्रारंभ



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

दत्तवाडीतील श्री संत गजानन महाराज मंदिर प्रांगणात उभारलेल्या मंडपात गायत्री प्रज्ञा मंडळ वाडी ने आयोजित केलेल्या २४ कुंडीय गायत्री महायज्ञ व पावन प्रज्ञा पुराण कथेची स्थापना झाली. बुधवार ८ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता भव्य मंगल कलश यात्रा व श्री संत गजानन महाराज पालखीची मिरवणूक काढण्यात आली.

शांतिकुंज हरिद्वार येथून आलेले कथवाचक श्री योगीराजजी बल्की व त्यांच्या संचाने दिव्य मंत्रोपचाराने संपूर्ण वातावरण गायत्रीमय करीत शेकडो कलश धारी महिला व झेंडे धारी पुरुषांनी दत्तवाडी परिसरातील सत्यसाई सोसायटी, इंद्रायणी सोसायटी, त्रिलोक नगर, वेना नगर, मारोती नगर, सुरक्षा नगर, सदाचार सोसायटी, गजानन सोसायटीतुन भव्य कलश यात्रा काढली. कलश यात्रेत संत गाडगे बाबा, प्रभू रामचंद्र, सीता माता, हनुमान, गायत्री माता, भारत माता इ वेशभूषा केलेली सजिव पात्रे लक्ष वेधक होती.

श्रीमद पावन प्रज्ञा पुराण ग्रंथाचे सपना मधु माणके व मधू माणके पाटील यांनी सपत्नीक पूजन करून कथेचा प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाला गायत्री शक्ती पिठाचे व्यवस्थापक प्रेमसिंग बैस सहित प्रज्ञापीठ नागपूरच्या सक्रिय महिला मंडळाची मोठया प्रमाणावर उपस्थिती होती.

पुढील पाच दिवस हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिपक बिडवाईक, बंडूभाऊ मेश्राम, निर्मलाताई राऊत, सुरेखा रिंके, गणेश सालोडे, अनिता रावळकर, घनश्याम शर्मा व मंडळाचे अनेक कार्यकर्ते प्रयत्नरत आहे.

# रेल्वे लाभार्थ्यांसाठी वर्धा मध्ये 'स्वस्थ बाळ' स्पर्धेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी यांच्या सहकार्याने 8 जानेवारी 2025 रोजी "स्वस्थ बाळ" स्पर्धेचे आयोजन केले. हे कार्यक्रम वर्धा येथील सेंट्रल रेल्वे संस्थानात आयोजित करण्यात आले, आणि याचे मुख्य उद्दिष्ट वर्धा परिसरातील रेल्वे कुटुंबातील बालकांच्या आरोग्य व कल्याणाविषयी जागरूकता निर्माण करणे होते.





विनायक गर्ग, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नागपूर विभाग आणि डॉ. जी.एस. मन्जुनाथ, मुख्य वैद्यकीय अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दोन वय गट - 0 ते 2 वर्षे आणि 2 ते 5 वर्षे - अशा दोन गटांत बालकांच्या वाढीचा आढावा घेण्यात आला.

स्पर्धेचा मुख्य उद्दिष्ट बालकांच्या वजन, उंची आणि संपूर्ण विकासाचे मूल्यांकन करणे होते. सहभागी पालकांना त्यांच्या मुलांच्या आरोग्याच्या संदर्भात तज्ञांचा मार्गदर्शन मिळालं, ज्यामुळे त्यांना त्यांच्या मुलांचे आरोग्य आणि प्रारंभिक वैद्यकीय देखभाल सुनिश्चित करण्यास मदत मिळाली.

डॉ. मंगेश चौधरी, (बाल रोगतज्ञ)/नागपूर यांनी या कार्यक्रमात प्रेरणादायक भाषण दिले, ज्यामध्ये त्यांनी नियमित आरोग्य तपासणी, वेळोवेळी लसीकरण, आणि बालकांच्या योग्य वाढीसाठी एक आरोग्यपूर्ण व पोषक वातावरण राखण्याच्या महत्त्वावर प्रकाश डाला. त्यांनी तपेदिक आणि इतर सामान्य आजारांची प्रतिबंधक उपाययोजना कशा कराव्यात याबद्दल देखील मार्गदर्शन केले आणि पालकांना त्यांच्या मुलांच्या आरोग्याच्या बाबतीत सक्रिय उपाययोजना करण्यासाठी प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाचा समारोप पुरस्कार वितरण समारंभाने झाला, ज्यामध्ये डॉ. अमर तक्षांडे, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी यांच्या बालरोग विभागाचे प्रमुख, विजेत्यांना पारितोषिक वितरण केले. सर्व सहभागी मुलांना प्रमाणपत्रे देण्यात आली, ज्यामुळे त्यांच्या सहभागाची कदर केली गेली आणि त्यांच्या कुटुंबांना आरोग्य व कल्याणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रेरित केले.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सबा अक्तर, यांनी केले, आणि डॉ. चैतन्य, मंजुषा मटे, राहुल तायडे, पूजा थूल, सठवाने, मिस सुरभी मित्रा, संजय सावले, आकाश धोते आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी यांची समर्पित टीम यास यशस्वी बनवण्यासाठी पुढाकार घेतला या स्पर्धेत 57 रेल्वे लाभार्थ्यांनी सहभाग घेतला, ज्यामुळे त्यांना मुलांच्या आरोग्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली आणि रेल्वे कुटुंबातील एकजुटीची भावना निर्माण झाली.

# चतुरस्त्र अभिनेत्री स्मिता पाटील महाराष्ट्रासाठी अभिमान : डॉ. अविनाश आवलगावकर





■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

मराठीच नव्हे तर हिंदी, तेलगू, बंगाली, गुजराती आदी विविध भाषांमधील चित्रपटातील अजरामर भूमिका करणाऱ्या चतुरस्त्र अभिनेत्री स्मिता पाटील ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी व्यक्त केले. रत्ना कम्युनिकेशनच्या वतीने बाबुराव धनवटे सभागृहात स्मिता स्मृती माझे कुटुंब या विशेषांकाचे प्रकाशन आज झाले. अ.भा. बाल रंगभूमीच्या अध्यक्षा नीलम सामंत, उद्योजिका अनघा सराफ, वनराईचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी, अजय पाटील, बालरंगभूमी नागपूर शाखेच्या अध्यक्षा आभा मेघे, डॉ. कोमल ठाकरे, शुभदा फडणवीस, रेखा दंडिगे, विवेक रानडे व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. आवलगावकर म्हणाले, स्मिता पाटील या महाराष्ट्रातील प्रतिभावान अशा लाडक्या कलावंत होत्या. विशेषांकाचा आशय व प्रगटीकरण उत्तम आहे.

## श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुकाचा दर्शन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

श्री हनुमान मंदिर, अभ्यंकर नगर येथे श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुका चा दर्शन सोहळा आज सकाळी १०:०० वाजता संपन्न झाला. श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुका दर्शनार्थ ठेवण्यात आल्या होत्या. चारशे वर्ष जुना इतिहास असलेल्या पादुकांच्या दर्शनाला भाविकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. शास्त्रोक्त पद्धतीने यजमान अभय चोरघडे व अंजली चोरघडे यांनी पूजन केले.

आरती व प्रसाद वितरण करण्यात आला. मंदिराचे गुरुजी शंभू टोणपे,पीएमजी सोसायटीचे अध्यक्ष सुनील बोक्षे, सचिव अतुल घाडगे नागेश कांनगे, चांदे, पानसे, पितळे यांनी दर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उषा देव, रश्मी जोशी, प्रशांत जोशी, श्रीकांत पांडे, मिलिंद शुक्ला यांनी अथक परिश्रम घेतले.

# अनसूया मातेच्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

२१८ संत गजानन महाराज श्रद्धास्थान वऱ्हाडपांडे यांच्या मंदिरात रेशीमबागेत शुक्रवारी १० जानेवारीला पारडसिंगा निवासीनी अनसूया मातेचा २८वा पुण्यतिथी महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. सकाळी ८.३० वाजता माऊलीचा पालखी सोहळा होईल. त्यानंतर १० वाजता सर्व भाविकांतर्फे माऊलीला मंत्रोपचाराने अभिषेक, त्यानंतर १०.३० वाजता संतकवी कमलासूत रचित महाशक्ती अनसूया माता चरित्र ग्रंथाचे पारायण, माऊलीला शेज आणि मंगल आरती, दुपारी १ ते ६ महाप्रसाद वितरित करण्यात येईल. संध्याकाळी ६.३० वाजता आपणा सर्वांना माऊलींचे दर्शन व्हावे. यासाठी, संतकवी कमलासूत उपाख्य चंद्रशेखर वराडपांडे रचित गीतं आणि माऊलीचा समाधी सोहळा व्हिडिओद्वारे दाखविण्यात येणार आहे. सर्व भाविकांनी माऊलीच्या पुण्यतिथी उत्सवात सहभागी होऊन प्रसादाचा लाभ घ्यावा, अशी विनंती श्रद्धास्थानाचे आयोजक गिरीश वऱ्हाडपांडे यांनी केली आहे.

# डॉ. तुळसा डोंगरे ह्या पालीचे चालते बोलते विद्यापीठ होत्या : डॉ. नीरज बोधी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

पाली प्राकृत व बौद्ध अध्ययन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे स्मृतीशेष डॉ. तुळसा डोंगरे यांच्या श्रद्धांजली सभेचा कार्यक्रम 8 जानेवारी रोजी नागपुरातील आंतरराष्ट्रीय बौद्ध अध्ययन केंद्रात संपन्न झाला. डॉ. तुळसा डोंगरे गेल्या 28 वर्षापासून नागपूर विद्यापीठातील पाली प्राकृत व बौद्ध अध्ययन विभागामध्ये अंशकालीन अधिव्याख्याता म्हणून कार्यरत होत्या. त्यांचे 1 जानेवारी 2025 रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या प्रित्यर्थ विभागामध्ये श्रद्धांजली सभेचा कार्यक्रम घेण्यात आला.



श्रद्धांजली सभेचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत प्रा. ताराचंद खांडेकर होते. श्रद्धांजली सभेला सामाजिक कार्यकर्त्या तक्षशिला वाघधरे, ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत डॉ. धनराज डाहट, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. पुरणचंद्र मेश्राम, प्राकृत विभागाचे विभाग प्रमुख डॉ. नीरज बोधी उपस्थित होते.

आपल्या शोक संवेदना व्यक्त करीत असताना धनराज डाहट यांनी डॉ. तुळसा डोंगरे या समाजोन्मुख व्यक्तित्व होत्या यावर प्रकाश टाकला. मा. तक्षशिला वाघधरे यांनी तुळसा डोंगरे यांचे आंबेडकरी चळवळीतील योगदान सांगितले. खऱ्या अर्थाने त्या लोकांच्या हृदयामध्ये निवास करणाऱ्या होत्या. डॉ. पुरणचंद्र मेश्राम यांनी शोक संवेदना व्यक्त करताना म्हणाले की डॉ. तुळसा डोंगरे या पाली व बौद्ध अध्ययन ला संपूर्णपणे समर्पित असे व्यक्तित्व होते. यासोबतच त्यांनी सामाजिक बांधिलकी सुद्धा तेवढ्याच निष्ठेने आणि समर्पित वृत्तीने जपली. त्यांचे जीवन व कार्य पाली प्राकृत व बौद्ध अध्ययन विभागासाठी आणि संपूर्ण आंबेडकरी समाजासाठी निरंतर प्रेरणास्पद राहील.

विभाग प्रमुख डॉ. नीरज बोधि यांनी आपले वक्तव्य मांडतांना म्हणाले की डॉ. तुळसा डोंगरे या निष्काम कर्मयोगी होत्या. खरे तर त्या पालीच्या चालते बोलते विद्यापीठ होत्या. त्यांचे असे अनपेक्षित जाणे विभागाची आणि समाजाची फार मोठी व कधीही न भरून निघणारी हानी आहे. त्यांचे सामाजिक व धार्मिक जीवनातील योगदान अधोरेखित करून डॉ. डोंगरे मॅडमच्या जीवन व कायार्चा संपूर्ण गोषवारा त्यांनी आपल्या वक्तव्यातून प्रकट केला. यावेळी संपूर्ण सभागृह शोकाकुल झाले होते.

आदरांजली सभेचे अध्यक्षीय उद्बोधन सादर करीत असताना मा. ताराचंद खांडेकर म्हणालेत की डॉ. तुळसा डोंगरे यांच्या जीवन व कार्यावर गौरवग्रंथ प्रकाशित व्हायला पाहिजे. त्यांच्या या प्रस्तावाला आदरांजली सभेतील उपस्थित सर्व मान्यवर, समाजातील विचारवंत, कार्यकर्ता व विभागातील आजी-माजी विद्यार्थी या सर्वांनी अनुमोदन दिले.

याप्रसंगी भिक्खू महेंद्र कौसल, अंबर सहारे, अर्चना लाले, किशोर भैसारे, प्रकाश वाहाणे, भीमराव कांबळे, राजन वाघमारे, संगीता बनकर, उत्तम शेवडे, विनायक जामगडे आदि विभागातील आजी-माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शोक संवेदना व्यक्त केल्या.

# ज्येष्ठ नागरिक मंडळाचा वार्षिक उत्सव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

बजाजनगर ज्येष्ठ नागरिक मंडळाचा वार्षिक उत्सव ज्ञानेश्वर मंदिर येथे पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ महानगर संघचालक राजेश लोया हे होते. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली अतिथींचे स्वागत मंडळांचे अध्यक्ष डॉ. सुधीर बोधनकर यांनी केले. मंडळाचा वार्षिक अहवाल सचिव मृदुला पंडित यांनी सादर केला. या वार्षिक उत्सवात ज्यांनी वयाची ७५,८० वर्षे पूर्ण केली आणि ज्यांच्या विवाहाची 50 वर्षे पूर्ण झाली आहेत. अशा सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

राजेश लोया यांच्या भाषणानंतर स्नेहल मंडले यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जया चौधरी यांनी केले कार्यक्रमाला मंडळाचे जेष्ठ सदस्य उपस्थित होते. पसायदान होऊन कार्यक्रम संपला.

## नरेंद्रनगर मंदिर समिती तर्फे विविध कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

ऊज्वल सोसायटी, नरेंद्रनगर येथील श्री वीर हनुमान मंदिरात,मंदिर समितीने ११ जानेवारीला अखंड ज्योत स्थापना करण्याचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.सकाळी ६.१५ ला श्री हनुमानला रूद्राभिषेक करून ,७.१५ ला अखंड ज्योत प्रज्वलन व स्थापना करण्यात येईल,त्यानंतर ७. ३० वाजता श्री हनुमान चालीसा पठन, भीमरूपी स्तोत्र,श्रीराम नामजप, उदबोधन व आरती होईल, तरी सर्व भाविकांना विनंती आहे की आरती साठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

यावेळी नागपूर महानगर पालिका द्वारे नियमित आरोग्य मोफत सेवा सत्र घेण्यात येणार आहे. हे सेवा सत्र दर महिनाच्या दुसरा बुधवारी वेळ सकाळी १० ते दुपारी १२ दरम्यान नेहमीकरिता आयोजित करण्यात आले आहे. वीर हनुमान मंदिर उज्वल सोसायटी नरेंद्रनगर येथे गरोदर महिलांना उपयुक्त माहिती, शून्य महिनापासून ते १६ वर्षापर्यंत सर्व लसीकरण, गरोदर मातेचे AMC कार्ड इत्यादी सर्व सोयी उपलब्ध राहील हाची नोंद घ्यावी व लाभ घ्यावा.

# संस्कृत विश्वविद्यालयात दुर्मिळ ग्रहयोगदर्शन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग ज्योतिष विभागाद्वारे विश्व विद्यालयाच्या रामटेक परिसरात आकाशदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम ७ तारखेला घेण्यात आला होता.

कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी यांच्या अध्यक्षतेत एक छोटेखानी कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो कृष्णकुमार पांडेय यांनी केले. प्रास्ताविकात प्रो पांडेय यांनी विश्वविद्यालयात वेदांग ज्योतिष विभागाद्वारे अशी विशेष खगोलीय पर्वणी असेल तेव्हा आकाशदर्शन सोहळ्याचे आयोजन केले जात असल्याचे सांगितले. ज्योतिषशास्त्र हे प्रत्यक्ष शास्त्र आहे.



अष्टमी तिथी ही जया तिथी म्हणून ओळखली जाते. या दिवशी अमृतसिद्धी योग, सर्वार्थसिद्धी योग आणि रवियोग असतात. विद्यार्थ्यांना ग्रह गोलांचे केवळ ग्रंथीय ज्ञान न मिळता खगोलीय शास्त्र कशाप्रकारे ग्रह नक्षत्र इ द्वारे कार्य करते त्याचे प्रत्यक्ष प्रयोगीय अध्ययन करणे महत्त्वाचे ठरते.कुलगुरू हरेराम त्रिपाठी आपल्या उद्बोधानात म्हणाले की, वेदांग ज्योतिष विभागाने या आकाश दर्शन कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल मी प्रो पांडेय यांना विशेष धन्यवाद देतो. शास्त्रीय ग्रंथांमध्ये जे शिकवले जाते ते प्रत्यक्ष पाहायला, अनुभवायला मिळाले तर शिकणे तर पक्के होतेच पण खगोलशास्त्रीय दृष्टिही विकसित होते. वर्तमानासह भविष्याचा वेध घेणारे दिशा देणारे हे शास्त्र आहे. खगोलप्रेमींसाठी ही विशेष पर्वणी होती.

पृथ्वीवरुन पश्चिमेस शुक्राची तेजस्वी चांदणी, त्याच्या जरा वर शनी ग्रह, आकाश मध्यात अष्टमीचा अर्धा चंद्र, त्याच्या जवळच ठळक दिसणारा रोहिणी जवळचा गुरु आणि पूर्व क्षितिजावर उदित लालसर मंगळ ग्रह असे एकूण ५ ग्रह आकाशात दिसले; तसेच अष्टमी चंद्राचा आणि कुंभ राशिस्थ शुक्र शनी युतीचा दुर्मिळ क्षणही अनुभवायला मिळाला. आकाश दर्शन कार्यक्रमाला कुलसचिव डॉ.देवानंद शुक्लजी, प्राचीन भारतीय विज्ञान आणि मानव शास्त्र संकाय के अधिष्ठाता प्रो. कृष्णकुमार पाण्डेय, अन्य सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक, वेदांग ज्योतिष विभाग प्रमुख डॉ. दिनकर मराठे आणि वेदांग ज्योतिष विभागाचे प्रो. प्रसाद गोखले, सहा .प्राध्यापक डॉ.आशीष जे., डॉ.अंबालिका सेठिया, डॉ.हृषीकेश साहू, श्री.अनुज प्रदीप शर्मा, कल्याणी डहाळे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रचलित धोरणानुसार टप्पा वाढ अनुदान मंजूर करा : आ. सुधाकर अडबाले



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ८ :

अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रचलित धोरणानुसार टप्पा वाढ अनुदान मंजूर करावे, वेतनेत्तर अनुदान आदी विषयांवर माझा लढा सुरू असून तो भविष्यात देखील सुरू राहील, असा विश्वास आमदार सुधाकर अडबाले यांनी व्यक्त केला. सुराबर्डी येथील महात्मा फुले विद्यालय व तुकारामजी पिसे कनिष्ठ महाविद्यालयात रौप्य महोत्सव वर्ष निमीत्य सांस्कृतिक, कला, क्रीडा महोत्सव व स्वप्नपूर्ती स्मरणिका विमोचन सोहळ्याचे उद्घाटन आमदार सुधाकर अडबाले यांनी केले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मेघराज हटवार होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून दिलीप गोंडनाले, माजी सरपंच राजु राव ,विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, महेश पाठक, अजय आदमने, सुरेश कामनापुरे, सुनील ठाणेकर, प्राचार्य विजय पिसे, रवींद्र वराडपांडे, अजय भोयर, रोकडे उपस्थित होते.

यावेळी परीक्षा, कला व क्रीडामध्ये विशेष नैपुण्य प्राप्त केलेल्या आजी-माजी विद्यार्थी यांचा गुण गौरव व बक्षिस वितरण सहित माजी विद्यार्थी मेळावा घेण्यात आला. आयोजनासाठी शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# नागपूर मोतीबाग नॅरो गेज रेल्वे संग्रहालयातील स्मरणिका स्टॉल पर्यटकांसाठी ठरणार आकर्षक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

मोतीबाग येथे असलेले नॅरो गेज रेल्वे संग्रहालय हे नागपूर शहराच्या मध्यभागी असलेले एक अतिशय सुंदर पर्यटन स्थळ म्हणून तसेच सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी आणि पर्यटकांना रेल्वे इतिहासाशी संबंधित मनोरंजक माहिती देणारे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. हे देशातील प्रमुख आणि प्रसिद्ध संग्रहालयांपैकी एक आहे जे नॅरो गेजच्या आठवणी आणि इतिहास जतन करते.



या संग्रहालयात नॅरोगेज स्टीम आणि डिझेल इंजिन, नॅरोगेज डबे आणि मालगाडीचे डबे या ऐतिहासिक वारसा असलेल्या वस्तूंच्या आकर्षक प्रतिकृती संग्रहालय परिसरात विविध ठिकाणी लावण्यात आल्या आहेत. दक्षिण पूर्व मध्य रेल्वे प्रदेशातील वन पर्यटन लक्षात घेऊन, प्रतिकृतींमध्ये वन्य प्राण्यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे जेणेकरुन लहान मुले आणि प्रौढांमध्ये आकर्षण राहील. त्यामुळे संग्रहालय परिसराचे सौंदर्य अतिशय आकर्षक व मनमोहक झाले आहे. सिंह, सांबर, हरीण, चितळ, क्रेन आदींच्या प्रतिकृतींसोबत सेल्फी फोटो काढून पर्यटकांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. याशिवाय पर्यटक या संग्रहालयातील टॉय ट्रेनच्या आनंदी राइडचा आनंद घेत आहेत, तसेच हिरवीगार हिरवळ, लहान मुलांसाठी विविध प्रकारचे झुले आणि राइड्स उपलब्ध आहेत.

या संग्रहालयात लवकरच 'स्मरणिका स्टॉल'च्या रूपात आणखी एक आकर्षण जोडले जाणार आहे. नॅरोगेज कोचमध्ये सुंदर इंटीरियर दिले जाईल आणि ते वातानुकूलितही असेल. यामध्ये रेल्वे विभागाशी संबंधित विविध स्मृतीचिन्हे जसे की, रेल्वे इंजिन आणि डब्यांची मॉडेल्स, की चेन, फ्रीज मॅग्नेट, पेंटिंग्ज, चित्रे, टी-शर्ट्स, कॅप्स आदी वस्तू पर्यटकांना विक्रीसाठी उपलब्ध असतील. या स्मृतीचिन्हांमुळे संग्रहालयात येणाऱ्या पाहुण्यांसाठी संग्रहालयाच्या आठवणी ताज्या राहतील आणि त्यांच्या घराचे सौंदर्यही वाढेल. हा स्मरणिका स्टॉल खासगी एजन्सीमार्फत चालविला जाणार आहे.

पाहुण्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी कामठी रोडवर वाफेच्या इंजिनाच्या आकारातील संग्रहालयाचा फलकही लावण्यात येत आहे. फायबरपासून बनवलेला हा आकर्षक साइन बोर्ड पर्यटकांसाठी 'सेल्फी पॉइंट'ही ठरणार आहे. यासोबतच या संग्रहालयात असलेले देशातील एकमेव फिरते रेस्टॉरंट पुन्हा सुरू करून खाद्यपदार्थांची सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असून त्यासाठी निविदाही मागविण्यात आल्या आहेत.

# नागपूर विमानतळ विस्तार, प्रशासन मिशन मोडवर

## जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांची बैठक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :




विदर्भासह मध्य भारताच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या विस्तारीकरणाचे काम गतीने करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कृतिगट स्थापन करण्यात आला असून प्रलंबित कामासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

नागपूर विमानतळ विस्तारीकरणाचा मुद्दा राज्य शासनाने प्राधान्यक्रमाने हाती घेतला आहे. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्याकडे मिहान इंडियाची जबाबदारी देण्यात आली आहे. इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी विमानतळ विस्तारीकरणाबाबत मिहान इंडियाच्या कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक झाली. भारतीय विमानतळ प्राधिकरणांतर्गत असलेल्या नागपूर विमानतळाला मिहान इंडिया लिमिटेड कंपनीला हस्तांतरित करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता लवकर मिळावी यासाठी प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. त्याचा आढावा बैठकीत घेण्यात आला. भारतीय वायुसेनेच्या स्थलांतरित जागेवरील रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याबाबतही या बैठकीत कालमर्यादा आखून देण्यात आली. एकदा काम सुरू केल्यानंतर पुढे कुठल्याही प्रकारची अडचण जाऊ नये यादृष्टीने ज्या काही गोष्टी प्रलंबित आहेत त्याची एक महिन्याच्या आत पूर्तता करून कायदेशीर बाबी पूर्ण करण्याचे निर्देश इटनकर यांनी दिले. विस्तारित विमानतळ प्रकल्पाच्या कामामध्ये अडथळा ठरणाऱ्या सुमारे एक किलोमीटर लांबीच्या उच्चदाब विद्युत वाहिनीचे स्थलांतर कालमर्यादेत पूर्ण करण्याचे आश्वासन अधीक्षक अभियंता अमित परांजपे यांनी दिले.

या बैठकीला मिहान इंडिया लिमिटेडचे संचालक अनिलकुमार गुप्ता, जीएमआरचे कार्यकारी संचालक एस.जी.के. किशोर, भारतीय वायुसेनेचे स्टेशन कमांडर शिव कुमार, पोलीस उपायुक्त लोहित मतानी, वरिष्ठ विमानतळ संचालक आबिद रुही, एमएडीसीचे प्रकाश पाटील, मुख्य अभियंता एस.के. चटर्जी, भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या समन्वय प्रमुख लॅली मेरी फ्रान्सिस, महानगर पालिकेचे वरिष्ठ अधिकारी प्रमोद गावंडे, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता अमित परांजपे व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शिवणगाव येथील अतिक्रमण गतीने काढण्याचे निर्देश या बैठकीत देण्यात आले. पयार्यी गावठानात रितसर जागा बहाल करूनही जे लोक स्थलांतरित झाले नाहीत त्यांचे तत्काळ स्थलांतर केले जाणार आहे. सर्व विभाग प्रमुखांची या प्रकल्पाला गती देण्यासाठी महिन्यातून किमान दोन वेळा व गरज पडेल तशी बैठक बोलावून तत्काळ निर्णय घेतले जातील, असे इटनकर यांनी स्पष्ट केले. विमानतळ विस्तारीकरण प्रकल्पांतर्गत अधिसूचित क्षेत्रातून खाजगी वाहतूक पूर्णतः बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे महापालिकेची आपली बस आता विमानतळाच्या जागेतून जाणार नाही.

# आज महिलांमध्ये अखंड रामायण पठण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :



श्री शक्ती दुर्गा सार्वजनिक मंडळ नारी रिंगरोडच्या वतीने अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या अभिषेक सोहळ्याच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त 10 जानेवारी रोजी सकाळी 10 वाजल्यापासून अखंड रामायण पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. रामायण पठणाच्या वेळी विविध प्रकारची वेशभूषा केलेले छोटे बाल-गोपाळ कार्यक्रमस्थळी थेट झाक्यांच्या स्वरूपात सादर केले जातील. रामायण पाठ यशस्वीतेसाठी अध्यक्ष प्रेमराज पाटील, सचिव कैलाश यादव, उपाध्यक्ष राममूर्त यादव, कोषाध्यक्ष लालजी यादव, उपखजिनदार राजमणी प्रजापती, राजेंद्र प्रसाद द्विवेदी, सहसचिव महेश यादव आदी परिश्रम घेत आहेत.

# अतिक्रमण विरोधात कारवाईला गती

## पोलिस आयुक्त डॉ. सिंगल यांनी केली कारवाईची पाहणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

नागपूर महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध भागात सुरु असलेल्या अतिक्रमण विरोधी कारवाईला गती देण्यात आली आहे. मनपा आणि पोलिस प्रशासनाद्वारे संयुक्तरित्या सुरु असलेल्या कार्यवाहीमध्ये गुरुवारी (ता. ९) धरमपेठ, धंतोली, गांधीबाग झोनमधील विविध बाजार भागांमध्ये अतिक्रमण विरोधी कारवाई करण्यात आली. गांधीबाग झोनमधील कारवाईदरम्यान पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी पाहणी केली. त्यांच्या निर्देशानुसार महाल, कल्याणेश्वर मंदिर, बडकस चौक या परिसरातील अतिक्रमण हटविण्यात आले.

याप्रसंगी पोलिस उपायुक्त अर्चित चांडक, मनपा उपायुक्त प्रकाश वराडे, अतिक्रमण विभागाचे सहायक आयुक्त हरीश राऊत, उपायुक्त व गांधीबाग झोनचे सहायक आयुक्त गणेश राठोड, कोतवाली पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक उपस्थित होते.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार प्रवर्तन विभागाद्वारे शहरात विविध ठिकाणी अतिक्रमण कारवाईला सुरु आहे.

गुरुवारी (ता. ९) मनपाच्या प्रवर्तन विभागातर्फे पोलीस विभागाच्या मदतीने अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यात आली. पथकाद्वारे शहरातील गिट्टीखदान, सेमिनरी हिल्स, तेलंखेडी, सीताबर्डी मेन रोड, धंतोली, यशवंत स्टेडियम, महाल, कल्याणेश्वर मंदिर, बडकस चौक या भागामधील अतिक्रमण हटविण्यात आले.

# बीट क्वॉईनच्या नावावर ५२.८२ लाखांचा चुना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

बीट क्वॉईनमध्ये गुंतवणूक केल्यास बक्कळ नफा मिळण्याचे आमिष दाखवून सायबर गुन्हेगारांनी एका इंजिनिअरींग कंपनीच्या मालकाला 52 लाख 82 हजार रुपयांचा चुना लावला. याप्रकरणी पोलिसांनी महेश ज्ञानेश्वर निघडे (45) रा. अयोध्यानगरच्या तक्रारीवरून कार्तिक शिवास्वामीसह 4 जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महेश निघडे यांची जाई इंजिनिअरींग नावाची कंपनी आहे. 6 सप्टेंबरला ते घरी मोबाईलवर फेसबुक बघत असताना त्यांना वितमग फॉरेक्स ट्रेडिंगची जाहीरात दिसली.

त्यांनी तिथे दिलेल्या लिंकवर क्लिक केल्यावर त्यांच्या मेल आयडीवर मेल आला. त्यात बिटक्वॉईनमध्ये गुंतवणुकीवर बक्कळ नफा मिळण्याबाबत माहिती देण्यात आली होती. तिथे दिलेल्या लिंकवर निघडे यांनी नोंदणी करून ॲप डाऊनलोड केले. त्यानंतर कार्तिक शिवास्वामी नावाच्या व्यक्तीने त्यांच्याशी संपर्क करून स्कायपी ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर महेश यांनी त्यांना विविध खात्यातून 42 लाख 82 हजार रुपये पाठविले. काही दिवसात ॲपमध्ये त्यांना 1 कोटी 99 लाख 92 हजार रुपयांचा फायदा झाल्याचे दाखविण्यात आले. मात्र, ते पैसे विड्राल होत नसल्याने त्यांनी कंपनीच्या सल्लागारांना मॅसेज केला. 20 सप्टेंबरला त्यांना लुकाज अल्ट्रीज नावाच्या व्यक्तीचा फोन आला. त्याने पैसे ट्रान्सफर करण्यासाठी 1 हजार 124 डॉरलची मागणी केली.

# कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या १५ गोवंशांची सुटका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

सदर पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर गड्डीगोदाम परिसरात धाड टाकून कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या 15 गोवंशांची सुटका केली. पोलिसांनी तीन जणांवर गुन्हा नोंदवून त्यांचा शोध सुरू केला आहे. निजीम कुरेशी, साबीर कुरेशी आणि नासिर कुरेशी तिन्ही रा. कसाई मोहल्ला, गड्डीगोदाम अशी आरोपींची नावे आहेत. गड्डीगोदाम परिसरातील लाल शाळेजवळ वरील आरोपींनी गोवंशांना कत्तलीसाठी निर्दयतापूर्वक बांधून ठेवले असून त्यांना चारा आणि पाण्याचीही व्यवस्था केली नसल्याची माहिती बुधवारी सकाळी पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंचासह तेथे धाड टाकली. झडतीमध्ये 15 गोवंश आढळून आली. मात्र आरोपी पोलिसांच्या हाती लागले नाही. पोलिसांनी गोवंशांची सुटका करून त्यांना गोरक्षण सभकडे पाठविले.

# वायसीसीईमध्ये डिजिटल परिवर्तनवर सखोल मंथन



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (वायसीसीई) स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने "सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये डिजिटल परिवर्तन आणि शाश्वत उपाय" या विषयावर आयोजित केलेल्या अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम (एसटीटीपी) मध्ये संखोल मंथन झाले. वायसीसीईचे प्राचार्य डॉ. यू. पी. वाघे यांनी प्रास्ताविकातून सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये डिजिटल परिवर्तन स्वीकारण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उद्घाटन सत्रात प्रमुख अतिथी म्हणून सीएसआयआर नीरीचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. गजानन के. खडसे उपस्थित होते. त्यांनी समकालीन प्रकल्पांमध्ये शाश्वत उपायांची आवश्यकता अधोरेखित केली. आठवडाभर चाललेल्या या कार्यक्रमात अभ्यासपूर्ण व्याख्याने, प्रत्यक्ष कार्यशाळा आणि केस स्टडीज यांचा समावेश होता. सहभागींना अत्याधुनिक ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्ये त्यामुळे अनुभवता आली. विभागप्रमुख व संयोजक डॉ. एस. पी. राऊत, सहसंयोजक डॉ. बी. पी. नांदुरकर आणि संघटन सचिव डॉ. जे. एम. राऊत यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या एसटीटीपीला सहभागींनी उत्तम प्रतिसाद दिला.

# कबड्डी, सॉफ्टबॉल, बास्केटबॉल स्पर्धा १२ जानेवारीपासून

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ९ :

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या सातव्या खासदार क्रीडा महोत्सवांतर्गत रविवार १२ जानेवारी २०२५ पासून विदर्भस्तरीय कबड्डी, सॉफ्टबॉल आणि बास्केटबॉल स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

विदर्भस्तरीय कबड्डी स्पर्धा १२ ते २१ जानेवारी या कालावधीत इनडोअर स्टेडियम मानकापूर येथे होणार आहे. सीनियर पुरुष, महिला तसेच ज्युनियर आणि सबज्युनियर मुले, मुलींच्या गटात ही स्पर्धा होईल. स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ५ लाख ५८ हजार रुपयांचे रोख पुरस्कार प्रदान करण्यात येतील. स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी स्पर्धेचे सह निमंत्रक डॉ. विवेक अवसरे (9422859805) व समन्वयक विनोद बघेल (9423405320) यांच्याशी संपर्क साधावा. सॉफ्टबॉल स्पर्धा १२ ते १७ जानेवारी या कालावधीत विभागीय क्रीडा संकुल मानकापूर येथे पार पडेल. २३ वर्षाखालील पुरुष, महिला, १७ वर्षाखालील व १४ वषार्खालील मुले आणि मुली या गटात ही स्पर्धा होईल. स्पर्धेतील विजेत्यांना एकूण २ लाख ६४ हजार रुपयांचे रोख पुरस्कार प्रदान करण्यात येतील. स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी स्पर्धेचे सह निमंत्रक सतीश वडे (9096597000) व समन्वयक नवनीत श्रीवास्तव (9923444999) यांच्याशी संपर्क साधावा.

१२ ते १७ जानेवारी या कालावधीमध्ये बास्केटबॉल स्पर्धा डीएमके शंकर नगर आणि नासा सुरेंद्र नगर येथे होतील. ज्युनियर मुले, मुली आणि सबज्युनियर मुले, मुली या गटात स्पर्धा होईल.

# संस्था आणि शाळेद्वारे ४४ वा वार्षिक उत्सव उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

कामठी सिटिझन्स एज्युकेशन अँड कल्चरल सोसायटी द्वारे चालवली जाणारी शाळा विशेष संवाद प्रदात्याद्वारे 28 डिसेंबर 2024 रोजी संस्था आणि शाळ्याच्या वतीने कल्लन मियां अन्सारी हायस्कूल आणि खुदाईजा कमर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन, कळमना कामठी व वांजरा रोड, नागपूर-26 च्या वतीने 44 वा वार्षिक उत्सव 2024-2025 साजरा करण्यात आला. ज्या अंतर्गत अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्ती आणि सामाजिक कार्यक्रम आयोजित केले गेले.

कार्यक्रमाची सुरुवात कुराण आणि नाट शरीफ यांच्या शपथ आणि स्वागत गीताच्या पठणाने आणि भारतीय संविधानाने करण्यात आली. यानंतर, शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि शाळेतील विद्यार्थ्यांनी उस्ताद महोतरम यांना सलाम केला, असे म्हणू नका की माज्या समस्या देवापेक्षा मोठ्या आहेत, विनोदी बातम्या, रोजचे प्रश्न आणि उत्तरे, 30 हदीस शरीफ, इतका आनंद, मजेदार नृत्य, हेच वय चुकीचे आहे चुकून, हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन हे आपापसात आहेत भाई भाई, सोशल मीडिया ड्रामाचा दुष्परिणाम जाहिल घराणा नाटक, मिमिक्री, असे अनेक काही भक्तीगीतांप्रमाणे रंगीत कार्यक्रम सादर केला.

विद्यार्थ्यांच्या पालकांनीही कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन 270 विद्यार्थी सहभागी झाले होते. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिक ट्रॉफी, पदके, चषक आणि ढाल देण्यात आले. या सोबतच 19 सेवानिवृत्त शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना ट्रॉफी आणि सन्मान प्रमाणपत्रे वाटप करण्यात आले. कार्यरत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही ट्रॉफी वाटण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शहराचे ज्येष्ठ नेते, माजी आमदार एस.क्यू. जमा यांनी पाहुण्यांच्या ठेवीचे संस्थेने स्वागत केले आणि शाळा सचिव रिझवान अहमद कमर यांनी केले. सचिवांनी त्यांच्या अहवालात सांगितले की, आमची संस्था आणि शाळा 1981 मध्ये भारताच्या माजी पंत. दिवंगत इंदिरा गांधीजींच्या आवाहनावर स्थापन झाली होती. यानंतर या 44 वर्षांत अनेक केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, राज्यमंत्री, खासदार, अमदार इत्यादींनी वेळोवेळी संस्था आणि शाळा भेट दिल्या आहेत.

तेव्हापासून 44 वर्षात अल्पसंख्याक समाजातील हजारो विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देऊन संस्थेने व शाळेने समाजाला अनेक डॉक्टर, अभियंते, वकील, राजकारणी, यशस्वी उद्योजक, अधिकारी दिले आहेत.

आपले विद्यार्थी परदेशात जाऊनही नोकरी आणि व्यवसायाच्या क्षेत्रात आपल्या देशाचा गौरव करत आहेत. आमच्या शाळेतही विद्यार्थी गुणवत्तेत स्थान मिळवतात. सचिवांनी आपल्या अहवालात म्हटले आहे की, अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शाळेत नेण्यासाठी संस्था आणि शाळेने स्वतः तीन बसेसची व्यवस्था केली आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांना मोफत बससेवा दिली जाते.




याशिवाय सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, प्रत, वह्या, शाळेची दप्तर, पोषण आहार, संगणक शिक्षण, धार्मिक व आसरी प्रशिक्षण आदी सुविधा संस्था व शाळेतर्फे दिल्या जातात. शाळेत २८ सीसीटीव्ही कॅमेरे, वायफाय, संगणक प्रयोगशाळा, वाचनालय, स्वयंपाकघर, क्रीडा साहित्य आदींची पुरेशी व्यवस्था करण्यात आली आहे. सध्या शाळेत सुमारे ९०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

1981 पासून आजतागायत ही शाळा भाड्याच्या इमारतीत सुरू असल्याचे सचिवांनी आपल्या अहवालात सांगितले. आमची संघटना गेल्या 22 वर्षांपासून शासनाकडे शाळेसाठी जागेची मागणी करत आहे. क्षेत्राचे आमदार नितीन राऊत यांनी कॅबिनेट मंत्री असताना एनआयटी सुरू केली होती. तसेच संस्था व शाळेला 2 ते 3 एकर जागा देण्याचे पत्र दिले. पण एन.आय.टी त्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. सचिव पुढे म्हणाले की, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि आमदार नितीन राऊत यांनी शाळेच्या आजूबाजूचा रस्ता व गटर लाइन दुरुस्तीसाठी एनआयटीशी संपर्क साधला आहे. आणि नागपूर महामंडळाच्या अधिकाऱ्यांना पत्र दिले. मात्र त्यावर आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

अल्पसंख्याक समाजातील गरीब मुलांसाठी भव्य इमारत बांधून डिजिटल वर्ग खोल्या व सर्व सुविधांसह आधुनिक उपकरणांसह दर्जेदार शिक्षण देण्याचे उद्दिष्ट पूर्ण करता यावे, यासाठी संघटना सचिवांनी शासनाकडे शाळेसाठी जागेची मागणी केली. कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांनी या संदर्भात संस्था व शाळेला आपण सर्व मिळून प्रयत्न करू असे आश्वासन दिले शासन प्रशासनाकडून शाळेसाठी जागा मिळवून देण्यासाठी तसेच शाळेच्या आजूबाजूला रस्ता व गटर लाईनचे बांधकाम करण्यासाठी संस्था व शाळेला पूर्ण सहकार्य करू.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार एस. जामाने केले. ब्लॉक 15 चे अध्यक्ष मूळचंद जी मेहर यांचे प्रतिनिधी म्हणून उत्तर नागपुरचे आमदार नितीन राऊत, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांचे प्रतिनिधी अमूल डांगे, शिक्षण विभागाचे प्रतिनिधी चोपकर, पोलीस विभागाचे प्रतिनिधी हरमेश सर यांच्यासह नगरसेवक मन्सूर खान, नगरसेवक शेषराव गोतमारे, नगरसेवक मोहम्मद अशफाक (डब्लू) ), नगर सेवक इरफान अहमद कमर,यावेळी नगरसेवक जुल्फेकार अहमद भुट्टो, नगरसेवक महेश पाटील, नगरसेवक अमानुल्ला खान, नगरसेवक सिराज अहमद नेते, नगरसेवक जलील अन्सारी, नगरसेवक मोहम्मद इब्राहिम, नगरसेवक राजकिरण बर्वे, हैदर अली दोसानी, आसिफ शेख मांडवा, हाजी शफुल हक, पंकज बावनकुळे, अहमद खान. अशरफ खान, गोपाल पट्टम, रहीम खान, आरिफ पठाण, मुस्तफा मुनीर, अहमद खान कादरी, आरिफ बशीर, डॉ असद हयात, गियासुद्दीन अशरफी, मास्टर इस्तियाक कामिल, मास्टर शमसुल हक, मास्टर उबेदुररहमान शेख, इंतेसार अनीस (जंगेजभाई) नरेश वहाणे जी, हाजी इब्राहिम मास्टर, हाजी शकील मेहराम, हाजी शकील वाहराम, हाजी खलील अंजुम मोहम्मद इस्लाम (इटारसी ग्रुप) मोनिस अख्तर, इफ्तेखार लीडर, कौसर भाई, कमाल अख्तर, खालिद अन्सारी, मास्टर झियाउद्दीन, सय्यद मुजीब, इरफान खान एनबीएन न्यूज हाजी खालिदचे एमजी, मास्टर एजाज अन्वर, मास्टर सय्यद मुजीब, मास्टर मोहम्मद काशिफ, मास्टर वसीम खान, मास्टर झियाउद्दीन, मास्टर हाजी रियाझ मास्टर नसीम खान, मास्टर मेहंदी हसन, शाहिना नूर मोहम्मद, विनोद कस्त्री, खुर्शीद अहमद, पत्रकार सोहेल अख्तर सानी, मास्टर वसीम अर्शद, हाजी वसीम बाबू, डॉ.सय्यद सबाहुद्दीन, अधिवक्ता नईम अख्तर, अधिवक्ता शारीक जामा, अब्दुल नियाज (नानू नेता), मास्टर हाजी मुश्ताक मन्सूरी रियाज अन्सारी (राजा मोहम्मद राजा), डॉ. खलील, साकिब अहमद रमजान, फहिमुद्दीन अभियंता, मा नजमुसाकिब, हाजी सलीम (बाबुलाल), हाजी मकबूल अंबर, हाजी शाहीद, अशफाक अहमद (गुड्डू), झुबेर फय्याज, मोहम्मद अक्रम अन्सारी, रुबिना परवीन (गुड्डोबाजी) नारायण संध्या गुप्ता, मुझफ्फर खतीब, हाजी मजहर खान, हाफिज हाउद्दीन, न्युज अकरम अन्सारी. , याकूत अल्तमश, अशफाक अहमद, मोहम्मद तौसिफ, मोहम्मद शाहिद अन्सारी, मोहम्मद शोएब अन्सारी, इम्रान, फुरकान, अदनान, युसूफ, रेहान, आमिर, दानियाल, फैजान, सुफियान, तौसिफ, शाहिद, खालिद, आफाक, अनिश, अहफाज, बादशाह, शेख कय्युम, बंटी , इम्रान अन्सारी, आसिफ बशीर, भंते जी, तहसीन, फज्जू, राफिया, शाहेदा, शबिना, जरीना, रिबा, इल्मा, नुसरत, राणा, रमिजा, सामिया, नमिरा, निदा, जोकेरा, अम्मारा, मसिरा, रिशा फातिमा, या व्यतिरिक्त शाळेच्या कर्मचाऱ्यांमध्ये शहनाज परवीन जी.जे. रंगारी, शबाना अंजुम, हाजी शाहिद अख्तर, जाहेदा बेगम, रुबिना परवीन, सीमाब शानी, नाहिद अफरोज, अस्लम छावरे, वासिक खान, जफर इक्बाल, नाझिश्ता, हाफिज रेहान रझा, आलेमा रुमाना परवीन, बाजी व्यतिरिक्त मोठ्या संख्येने पालक आणि समाजातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका शबिना यास्मीन व शिक्षक व सहसचिव रेहान अहमद कमर यांनी केले. आभार शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद एहतेशम यांनी केले. संस्था व शाळेच्या व्यवस्थापनाच्या वतीने हाजी अब्दुल जलील, हाजी नईमुद्दीन मोहम्मद ताज कमर, अजीज अहमद, हाजी खलील, साकिब अहमद रमजान, आरिफ पटेल आदी अधिकारी व सदस्य तसेच शाळेच्या सर्व समित्यांचे सदस्य उपस्थित होते.